**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: कॅबिनेट मंत्री सभागृहात नसणे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

**सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(दुपारी 12.01 ते 12.11 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ D/ पूर्वी श्री.भारवि.... 12:10

:: **स्थगितीनंतर** ::

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात नव्हे तर देशाच्या इतिहासात फार मोठी गंभीर घटना राज्यामध्ये घडलेली आहे. या राज्याचे निवडणूक आयुक्त, श्री.नंदलाल यांनी राज्याच्या माननीय मुख्यमंत्री महोदयांवर गंभीर आरोप केले आहेत. श्री.नंदलाल जसे राज्य निवडणूक आयुक्त आहेत तसेच, मतदारसंघाच्या पुनर्रचना आयोगाचे सदस्य सुध्दा आहेत. त्यांनी काल पत्रकार परिषद आयोजित करुन असे आरोप केले आहेत की, मतदारसंघांच्या पुनर्रचना होत असताना लातूर मतदारसंघ राखीव झालेला आहे आणि या मतदारसंघाचे आरक्षण बदलावे म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्यावर एका मंत्र्यामार्फत दडपण आणले होते. परंतु आपण त्या दडपणाला बळी पडलो नाही, अशा प्रकारचा गौप्यस्फोट श्री.नंदलाल यांनी काल पत्रकार परिषदेमध्ये केला आहे. त्यांनी केवळ एवढेच सांगितले नाही तर, या मतदारसंघांच्या पुनर्रचनेवरुन दोन महिन्यापूर्वी दोन वेळा धमक्याचे फोन सुध्दा आलेले आहेत आणि त्या बाबतची माहिती पोलीस आयुक्तांना दिल्याचेही त्यांनी सांगितले. त्यांनी तिसरा आरोप असा केला आहे की, वन खात्याचा प्रधान सचिव असताना 2001 मध्ये रायगड जिल्हयात माफिया व राजकीय नेत्यांनी हडप केलेली सुमारे एक हजार कोटी रुपये किंमतीची 60 हजार एकर जमीन पुन्हा शासनाच्या नावावर करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. त्यावेळी राजकीय नेते संतप्त झाले. त्यामुळे एक मंत्री आणि सहा आमदारांनी आपल्या बदलीची मागणी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे केली. त्यांनी असाही आरोप केला आहे की, माननीय मुख्यमंत्री आपल्याला जाणूनबुजून त्रास देत आहेत. त्यातल्या त्यात त्यांनी असेही सांगितले की, निवडणूक आयोगासाठी पुरेशी आर्थिक तरतुदही करण्यात आलेली नाही. कर्मचारी वर्ग वाढवून दिला जात नाही. पुढील वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्यामुळे आयोगाने राज्य सरकारकडे प्रवासभत्त्यासाठी 8 लाख रुपयांची तरतूद मागितली होती. प्रत्यक्षात तीन लाख रुपये एवढीच तरतूद करण्यात आली आहे. महोदय, श्री.नंदलाल यांनी उघड केलेल्या अनेक गोष्टींमुळे राज्य निवडणूक आयुक्त विरुध्द राज्य सरकार असा संघर्ष राज्यामध्ये सुरु झाला आहे. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका स्वतंत्रपणे व्हाव्यात, पारदर्शकपणे व्हाव्यात अशा पध्दतीची भूमिका राज्य निवडणूक आयुक्तांनी घेतली होती. परंतु या भूमिकेच्या विरुध्द निवडणूक आयुक्तांना अशी भूमिका घेता येणार नाही असे बोलले गेले. हिंदुस्थानातील सर्व राज्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका राज्य निवडणूक आयोगाकडून घेतल्या जातात. परंतु महाराष्ट्र राज्य हे एकच राज्य असे आहे की, या राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारित आहेत. त्यामुळे विरोधी पक्षाच्या ताब्यात नगरपालिका असतील, नगरसेवक असतील त्या नगरसेवकांचे सभासदत्व रद्द करणे, निवडणूका लांबणीवर टाकणे, मनमानी निवडणूका घेणे असे प्रकार होत होते. या निवडणूका पारदर्शकपणे न घेता राजकीय हेतू डोळयासमोर ठेवून घेतल्या जातात. त्यामुळे नगरसेवकांचे सभासदत्व अन्यायकारक रद्द केले जाते. निवडणूक आयुक्तांनी अशा पध्दतीचे आदेश काढले आहेत की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका राज्य निवडणुक आयोगामार्फत व्हाव्यात. याचा परिणाम असा झाला की, श्री.नंदलाल यांच्याविरुध्द विधानसभा सभागृहामध्ये हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल झाला आहे. त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु या प्रकरणी घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणी पूर्णपणे चर्चा होणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. तिचा कोणत्याही सरकारशी, विधानसभेशी, विधानपरिषदेशी, लोकसभेशी वा राज्यसभेशी संबंध नाही. ज्यावेळी स्वायत्त संस्थेविरुध्द घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतो त्यावेळी त्या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

तरी, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी येऊन यासंबंधीचा खुलासा करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, निवडणूक आयुक्तांनी माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप केलेले आहेत. त्यांनी या संदर्भात निर्णय केलेला आहे. निवडणूक आयुक्तांवर हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल झालेला आहे. तरी, सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन सभागृहाच्या माध्यमातून या विषयावर चर्चा व्हावी, अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये आपल्यासमोर प्रस्ताव मांडलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे. सभापती महोदय, भारतीय लोकशाहीमध्ये आपले विधानमंडळ हे कायदेमंडळ आहे. कायदा करण्याचा आपल्याला अधिकार आहे. या राज्यामध्ये विविध प्रकारचे कायदे आपण तयार करतो आणि त्या कायद्याप्रमाणे एक्झिक्युटिव्ह विंग अंमलबजावणी करते. निवडणुकांसंदर्भात देखील कायदा करण्याचा अधिकार आपल्याला आहे. परंतु याचे कार्यन्वयन कोणी करावे याबाबतीत गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रामध्ये वाद सुरु झाला आहे. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका तसेच सन्माननीय सदस्यांची पात्रता-अपात्रता या संदर्भातील सर्व निर्णय राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. म्हणून महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांनी या संदर्भात सर्व महानगरपालिका, नगरपालिका यांना काही डायरेक्शन इश्यू केल्या आहेत. त्यांनी या निवडणुका त्यांच्या डायरेक्शनप्रमाणे घेतल्या गेल्या पाहिजेत, असे आदेश दिले आहेत. महानगरपालिका, नगरपालिका यांची परवा नागपूर येथे स्टॅन्डींग कमिटीची निवडणूक झाली, त्या निवडणुकीमध्ये श्री. नंदलाल साहेबांनी एक आदेश पाठविला होता. त्यासंदर्भात महाराष्ट्राच्या सरकारने रात्री 11 वाजता एक बैठक घेतली. हे नागपूरच्या मंत्र्यांना माहित नाही. सभापती महोदय, कॅबिनेट मिटींग झाली. त्यावेळी कमिशनरांना फॅक्स पाठविला. त्यामध्ये या राज्याच्या नगरविकास खात्याचे सचिव श्री. नाना पाटील यांनी सांगितले की, " राज्य सरकारच्या सूचना आहेत की, निवडणुका ह्या गुप्त मतदान पध्दतीने न घेता हात वर करुन घ्याव्यात. " श्री. नंदलाल साहेबांनी आदेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

दिला होता की, निवडणुका गुप्त मतदान पध्दतीने घेतल्या पाहिजेत. मी म्हणतो की, निवडणुका हात वर करुन का घेतल्या पाहिजेत ? सभापती महोदय, त्या ठिकाणी सत्ताधारी पक्षांमध्ये अंतर्गत भांडणे होती. सभापती महोदय, हा निर्णय रात्रीचा घेण्यात आला. नरखेड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष हे भाजपचे होते, त्यांना देखील असेच डिसक्वॉलिफाय केले. त्या संदर्भात राजकीय दबाव आणण्यात आला. सभापती महोदय, मी दोन नगरसेवकांबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. या संदर्भात कलेक्टरला पत्र दिले की, नगररचनाकाराच्या रिपोर्टमध्ये अनधिकृत बांधकाम केले असल्यामुळे या संदर्भात आपण हिअरिंग घेऊन संबंधिताला डिसक्वॉलिफाय करा. परंतु कलेक्टरने या संदर्भात हिअरिंग घेतली नाही. प्रश्न लागल्यानंतर काल 12 वाजता हिअरिंग घेतली. सभापती महोदय, आपण शासनाच्या आदेशांप्रमाणे निवडणूक घ्यायचो. महापौरांची देखील महापौर निवडणूक व्हायची. हे कायदेमंडळ असल्यामुळे आपल्याला यासंबंधी कायदे करण्याचे अधिकार आहेत. सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. आपण सभापती आहात. आपण सभागृहात वैधानिक कामकाज करतो. या सभागृहात कायद्यांवर चर्चा झाली पाहिजे व त्यांच्या अंमलबजावणीवर देखील चर्चा झाली पाहिजे. तसेच संविधानावर देखील चर्चा झाली पाहिजे. हेच या ठिकाणचे सर्वात महत्वाचे काम आहे. एक फार मोठा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. तरी, या संदर्भात या कायदेमंडळामध्ये चर्चा होऊन आपण निर्णय देण्याची गरज आहे. आपल्याला सांगावयाचे होते की, नागपूरची निवडणूक असेल, नरखेडची निवडणूक असेल त्या ठिकाणी अनेक वेळा गैरवापर होतो. 11 नगरपालिका, 3 महानगरपालिका यामध्ये भाजपाचे महापौर आहेत.

**सभापती** : नियम 289 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्या अनुषंगाने आपण बोला. आता आपण या संदर्भातील प्रिॲम्बल सांगितले आहे, त्यावर आपण बोला.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या संदर्भात एक महत्वाची गोष्ट मी सांगू इच्छितो की, राज्य निवडणूक आयोगाला पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचे अधिकार भारतीय घटनेने दिलेले आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

भारतीय घटनेच्या कलम 243 के मध्ये असे म्हटलेले आहे की, " Elections to the Panchayats -- The superintendence, direction and control of the preparation of electoral rolls for, and the conduct of, all elections to the Panchayats shall be vested in a State Election Commission consisting of a State Election Commissioner to be appointed by the Governor. (2) Subject to the provisions of any law made by the Legislature of a State the condition of service and tenure of Office of the State Election Commissioner shall be such as the Governor may by rule determine: Provided that the State Election Commissioner shall not be removed from his Office except in like manner and on the like ground as a Judge of a High Court and the conditions of service of the State Election Commissioner shall not be varied to his disadvantage after his appointment." याबाबत संसदेला "impeachment" चे अधिकार आहेत= राज्य विधिमंडळाच्या अखत्यारितील हा प्रश्न नाही. या ठिकाणी त्यांच्यावर हक्कभंग आणला गेला. तो का आणला ? कोणी आणला ? तो का स्वीकारला याबाबत मला काहीही म्हणावयाचे नाही. याबाबत प्रा. चांदूरकर मला भेटले व त्यांनी मला सांगितले की, आमच्या पक्षाने मला आदेश दिला की तुम्ही हक्कभंगाचा प्रस्ताव आणा. मी त्यांना सांगितले की, हा हक्कभंग होत नाही. अशा प्रकारे सगळया गंभीर गोष्टी या राज्यामध्ये होत आहेत, या राज्याचे माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम व माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी श्री. नंदलाल यांची भेट घेऊन त्यांना सांगितले की...

**सभापती** : हा विषय माहाराष्ट्र विधान परिषद नियम 289 खाली कसा काय येतो याबाबत आपण बोलावे, इतर बाबतीत आपणाला नंतर बोलता येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

......2....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील दोन मंत्री महोदयांनी लातूर मतदारसंघ राखीव करु नका याबाबत निवडणूक आयुक्तांवर दडपण आणले आहे. माननीय मुख्यमंत्री यांचे सचिव श्री. सरंगी यांनी निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांना "सहयाद्री" अतिथीगृह येथे चहापानासाठी बोलावून घेतले व लातूर मतदारसंघ राखीव करु नये, अशा प्रकारचा दबाव आणलेला आहे. त्यांना धमक्यांचे फोन करण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था चांगली राहिलेली नसल्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन नियम 289 द्वारे दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी असा जो प्रस्ताव मांडला आहे त्याला मी समर्थन देत आहे.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, नियम 289 ची सूचना दिल्यानंतर ती मंजूर झाली काय ? ती मंजूर झाली किंवा नाही हा पहिला प्रश्न आहे. वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्यावरुन या सभागृहात चर्चा होऊ शकते काय ? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी खरी माहिती असल्याशिवाय आरोप करीत नाही, सन्माननीय मंत्री श्री. पतंगराव कदम व श्री. बाळासाहेब थोरात यांना बोलवावे, त्यांनी जर म्हटले की, आम्ही नंदलाल यांची भेट घेतली नाही तर मी सभागृहाची माफी मागेल. माननीय मुख्यमंत्री यांचे सचिव श्री. सरंगी यांनी श्री. नंदलाल यांना चहापानाला बोलाविले होते, ही सत्य माहिती आहे.

......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा विषय चर्चेला आलेला आहे, नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी भूमिका विरोधी पक्ष नेते श्री. पांडुंरग फुंडकर व माजी विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी मांडली. याबाबत त्यांनी युक्तीवाद केलेला आहे. मला असे वाटते की, प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन हा विषय चर्चेला घ्यावा. आज आरक्षणाच्या संदर्भातील विषय नाईलाजाने व खेदाने येथे मांडावा लागत आहे. सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी यामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. परंतु लोकशाहीचे स्पिरीट कसे असते हे त्यांना माहिती नाही. सदर मुद्दे उपस्थित करीत असतांना त्यामध्ये वैयक्तिक प्रश्न नाहीत, परंतु हे राज्य चांगल्या दृष्टीने चालावे यासाठी हे मुद्दे उपस्थित करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

आज आपल्याला काही मुद्दे कटू वाटत असतील परंतु त्यावर चर्चा होणे राज्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. कडू औषध घेतल्याशिवाय रुग्ण सुध्दा बरा होत नाही. परंतु आपण सत्तेमध्ये असल्यामुळे आपल्याला गोड डोस घ्यायला मिळतात ही गोष्ट वेगळी आहे. सभापती महोदय, मूळ विषय अतिशय मर्यादित आहे. आज महाराष्ट्र राज्याचे निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांनी काल घेतलेल्या प्रेस कॉन्फरन्समध्ये राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप केले आहेत. त्यांनी केलेले आरोप अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत. अधिवेशन सुरु असताना महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप करण्यात आल्यामुळे या संदर्भात सभागृहामध्ये स्पष्टीकरण होणे अत्यावश्यक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांवर करण्यात आलेले आरोप खरे आहेत किंवा नाहीत ? या गोष्टीचा नीट खुलासा होणे आवश्यक आहे. म्हणून या ठिकाणी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. या चर्चेमध्ये आमचा कोणताही स्वार्थ नाही, उद्देश नाही. परंतु विरोधी पक्षात असल्यामुळे आम्हाला प्रत्येक गोष्टीत लक्ष घालावे लागते. या चर्चेच्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांवर झालेल्या आरोपांबाबत करण्यात आलेला खुलासा समाधानकारक असेल तर काही हरकत नाही. परंतु हा खुलासा समाधानकारक नसेल तर पुढे काय करायचे ? हा प्रश्न निर्माण होतो. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा घेण्यात यावी.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन उपस्थित करण्यात आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा घ्यावी अशाप्रकारची मागणी केली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व मधुकर सरपोतदार यांनी सुध्दा हा विषय किती महत्वाचा आहे ? याबाबत आपल्या भाषणातून विचार व्यक्त केलेले आहेत. देशामध्ये व महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाला शंभर वर्षे झाल्याचे एकीकडे सांगितले जाते. त्यामुळे लोकशाही जपण्याच्या दृष्टीकोनातून या अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावी यासाठी सत्ताधारी पक्षाच्यावतीने कुणीतरी उभे राहायला पाहिजे होते. आज महाराष्ट्र राज्याचे निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांच्याकडून राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर आरोप करण्यात आले आहेत. या संदर्भात मी काल टी.व्ही. वर सुध्दा बातमी पाहिली. राज्याचे निवडणूक आयुक्त स्वायत्त आहेत, स्वतंत्र्य आहेत. त्यांनी केलेले आरोप फेटाळण्यात आले. श्री.नंदलाल यांनी काल सांगितले की, या राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांनी मुख्यमंत्री पदाचा वापर करुन प्रस्तावित पुनर्रचनेत आरक्षित झालेला लातूर मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी आरक्षित करु नये, यासाठी अन्य मंत्र्यांकडून दबाव आणला जात असल्याचे सांगितले होते. तसेच श्री.नंदलाल यांनी वन सचिव असताना 6,000 हेक्टर्स जमीन सोडवण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे त्यांची बदली झाल्याचे वक्तव्य केले होते. या सर्व प्रकरणाशी संबंधित कोणते आमदार व मंत्री आहेत ? याबाबतची सर्व माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या विषयावर चर्चा घेण्यात यावी.

-----------

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ MAP/ KGS. श्री. सांगळे नंतर --- 12:30

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी या ठिकाणी, आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून राज्य निवडणूक आयुक्तांनी माननीय मुख्यमंत्र्यांवर केलेले आरोप या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर तातडीने चर्चा घडवून आणावी यासाठी नियम 289 खाली जो प्रस्ताव आणलेला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, या सदनामध्ये प्रश्नोत्तराचा तास हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या तासामध्ये राज्यातील निरनिराळे सामाजिक महत्त्वाचे प्रश्न चर्चेला येत असतात. त्यामुळेच सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना अन्य मार्गाने देखील त्यांना महत्त्वाच्या वाटत असलेल्या विषयासंबंधात चर्चा येथे उपस्थित करता येऊ शकते. त्यासाठी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याची गरज नाही असे माझे स्पष्ट मत आहे. श्री.नंदलाल हे स्थानिक निवडणूक आयोगाचे आयुक्त आहेत आणि उद्या मतदारसंघांच्या संबंधात लिमिट-डिलिमिटेशन होणे ही लोकशाही प्रक्रिया आहे आणि त्या संबंधातील प्रोसेस होत असताना लोकांना देखील त्याबाबत हरकत घेण्याचा पूर्ण हक्क आहे, अधिकार आहे. त्यासाठी उद्या राज्य निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांनी काय म्हटले आहे त्यावर येथे तातडीने चर्चा करण्याइतका तो विषय महत्त्वाचा, म्हणजे प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून चर्चा करण्या इतका महत्त्वाचा विषय तो नाही म्हणून प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून नियम 289 खाली चर्चा घडवून आणणे बरोबर होणार नाही. त्या विषयी अन्य मार्गांनी, अन्य नियमाखाली आपण चर्चा करू शकतो. तरी सभापती महोदय, आपण आजचा हा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करू नये अशी माझी आपणास विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे तो महत्त्वाचा आणि गंभीर आहे हे मान्य केलेच पाहिजे, त्याबद्दल दुमत नाही. परंतु त्याच्या पाठीमागे अन्य काही हेतू आहे काय हेही पाहिले पाहिजे. खरे तर असे आहे की, चार वर्षानंतर पहिल्यांदा कोकणा विषयी चर्चा येथे होणार आहे. अशा वेळेस निवडणूक आयुक्तांच्या वक्तव्याचा विषय घेऊन बाकी सगळे सभागृहापुढील विषय बाजूला सारून, प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून चर्चा करावयाची हे बरोबर वाटत नाही. माझे या संदर्भात असे मत आहे की, यावर चर्चा झाली पाहिजे, त्याबद्दल दुमत नाही. पण प्रश्नोत्तराचा तास तसेच सभागृहाचे इतर सगळे कामकाज बाजूला ठेवून त्यावर चर्चा करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. राज्य निवडणूक आयुक्तांनी जे आरोप केलेले आहेत, ते माननीय मुख्यमंत्र्यांनी डायरेक्ट तसे म्हटले आहे असेही

....... एफ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

अजिबात नाही. म्हणून माझी विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास आणि सभागृहाचे इतर कामकाज रितसर वेळेनुसार घेतले जावे, आणि त्यानंतर या विषयावर चर्चा करण्यासाठी रात्रीचे 12.00 झाले तरी चर्चा करावी, त्यास आमची हरकत नाही. तेव्हा आजच्या कामकाज पत्रिकेनुसार कामकाज करून, आधी कोकणासंबंधातील चर्चा करावी आणि मग राज्य निवडणूक आयुक्तांचे वक्तव्या संबंधात चर्चा करावी असे माझे स्पष्ट मत आहे.

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे आणि प्रश्नोत्तराचा तास थांबवून त्या विषयी चर्चा करावी म्हणून आग्रह धरलेला आहे त्या संबंधात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते येथे मांडली आहेत. खरे म्हणजे हा सारा प्रकार दुर्दैवी आहे. तो चांगला प्रकार झालेला आहे असे कोणीही म्हणणार नाही. खालच्या सदनामध्ये एका सन्माननीय सदस्यांनी राज्य निवडणूक आयुक्तांविरोधात हक्कभंगाची नोटीस पाठविली. ती योग्य आहे की अयोग्य आहे हे तपासण्याचे काम सभाध्यक्षांचे आहे. त्यांनी ते तपासले आणि तो विषय त्यांनी हक्कभंग समितीकडे पाठविण्यास परवानगी दिली. आता ती समिती त्यावर जो काही निर्णय घ्यायचा तो घेईल. आता पक्षाने तसे करण्यास सांगितले किंवा आणखी कोणी सांगितले ते सारे बाहेरचे आहे. परंतु सभागृहामध्ये जे सांगितले तो सन्माननीय सदस्यांच्या अधिकारानुसार केलेला प्रस्ताव असतो. या सगळ्या प्रक्रियेमध्ये, आज श्री.नंदलाल यांनी केलेले वक्तव्य जे काही आहे त्यासंबंधात वर्तमानपत्रातून मी वाचले आहे. हे खरे आहे की, त्यांनी जे आरोप-प्रत्यारोप केलेले आहेत, मतदारसंघांचे रिझर्वेशन बदलण्यास विरोध केला वगैरे सांगितले म्हणजे ही सगळी प्रोसेस, मतदारसंघ किंवा त्याचे आरक्षण बदलण्याची ही प्रक्रिया गेल्या 5-6 महिन्यांपासून चालू आहे. ....

( सन्माननीय सदस्य श्री.गडकरी खाली बसून काही बोलतात .... )

( यानंतर श्री. सरफरे नंतर .... जी 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

एखाद्या गोष्टीबाबत आक्षेप घेणे, आणि तो आक्षेप घेत असतांना त्यासंबंधी प्रत्येकाने आपापली मते प्रदर्शित करणे यामध्ये चुकीचे आहे असे मला वाटत नाही. त्याबाबत प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय घडली आहे यासंबंधीचे उत्तर देण्याचा त्यांना अधिकार असल्यामुळे त्यांनी आपले उत्तर दिले आहे. नक्षलग्रस्तांच्या विषयासंदर्भात दिल्लीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली असून त्या बैठकीसाठी माननीय मुख्यमंत्री दिल्लीला गेले आहेत. माझे असे म्हणणे आहे की, त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांवर डायरेक्ट आरोप केलेले असतील तर माननीय मुख्यमंत्री त्याबाबत उत्तर देतील. परंतु त्याकरीता प्रश्नोत्तराचा तास थांबवून चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे. आणि आपण या विषयावर कितीही चर्चा केली तरी माननीय मुख्यमंत्री जोपर्यंत सभागृहामध्ये उपस्थित होऊन त्यासंबंधीचा खुलासा करीत नाहीत तोपर्यंत प्रश्नोत्तराचा तास थांबविणे योग्य होणार नाही. या ठिकाणी चाललेला हा प्रकार योग्य नसला आणि झालेली टीका ही योग्य नसली तरी प्रश्नोत्तरांचा तास न थांबविता सभागृहाचे कामकाज पुढे सुरु करावे. आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करतो की, प्रश्नोत्तराच्या तासावर चर्चा...

श्री. नितीन गडकरी : म्हणजे आमच्या प्रस्तावावर नंतर चर्चा करावी असे आपले म्हणणे आहे कां?

श्री. छगन भुजबळ : मी असे म्हटलेले नाही. माननीय मुख्यमंत्री हे दिल्लीला गेले आहेत. त्यांच्याविरुध्द जर खरोखरच आक्षेपार्ह असेल तर...

श्री. नितीन गडकरी : प्रश्नोत्तराच्या तासानंतर या विषयावर चर्चा करण्यास सत्ताधारी पक्ष तयार आहे...

श्री. छगन भुजबळ : मी असे कुठेही म्हटलेले नाही...

(गोंधळ)

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आणि त्यांनी अशी मागणी केली आहे की, या अनुषंगाने दिलेल्या आमच्या प्रस्तावावर तातडीने चर्चा करण्याकरीता प्रश्नोत्तराचा तास आज तहकूब करावा. सर्वसामान्य नियम असा आहे की, आजचे जे कामकाज आहे, त्या कामकाजाच्या अनुषंगाने जर अतिशय तातडीचा प्रस्ताव आला तर अन्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावर विचार करता येणे शक्य आहे अशापध्दतीचा त्यांनी पाठविलेला प्रस्ताव आहे असे मला वाटत नाही व आजच्या कामकाजाशी या विषयाच्या प्रस्तावाचा संबंधही नाही म्हणून मी असे म्हणेन की, लोकशाहीच्या अनुषंगाने सगळयात लोकशाहीमध्ये महत्वाचे जे आयुध आहे ते म्हणजे.........

(माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी बसून बोलतात...)

ते जे आयुध आहे...

(गोंधळ)

ते आयुध म्हणजे प्रश्नोत्तरे. प्रश्नोत्तराचा तास हा मूलभूत आणि महत्त्वाचा विषय असल्यामुळे 289 नियमाखालचा जो प्रस्ताव दिला आहे त्याला मी अनुमती नाकारतो. आणि प्रश्नोत्तराची बाब मी या ठिकाणी पुकारतो. प्रश्नोत्तरे.

(गोंधळ)

प्रश्न क्रमांक 14172...

मी पुन्हा सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अन्य आयुधामार्फत जर एखादा प्रस्ताव आपण दिलात तर मी ती बाब तपासून निर्णय घेईन.

(गोंधळ)

. (विरोधी पक्षाकडील माननीय सदस्य घोषणा देतात.)

----

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**गोवंडी (मुंबई) येथे तडीपार आरोपींना अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना केलेली मारहाण**

**(१) * १३०७८ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथे तडीपार आरोपींना अटक करण्यासाठी आलेल्या पोलिसांना त्यांनी मारहाण केल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर तडीपार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरीता :** (१) होय, पोलीस शिपाई विजय घाडगे यांना मारहाण करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) व (४) पोलीस शिपाई श्री. विजय घाडगे यांना महत्वाची खबर मिळाल्याने ते तडीपार आरोपीस पकडण्याकरिता गेले असता, आरोपी व त्याच्या आई वडिलांनी श्री. घाडगे यांना अटकाव करुन मारहाण केली. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन देवनार पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. २१/०६, भा.दं.वि.सं.कलम ३३२, ३५३, ३४१, ५०४, ३४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील निष्पन्न ३ आरोपींपैकी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित एका तडीपार आरोपीचा शोध चालू आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, पोलीस दलामध्ये एखाद्या गुन्हयाच्या संदर्भात कारवाई करण्याची एक कार्यपध्दती ठरविण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे या संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस कॉस्टेबलने कारवाई केली पाहिजे. या कार्यपध्दतीप्रमाणे संबंधित पोलीस कॉस्टेबलने त्या गुंडाविरुध्द कारवाई कां केली नाही? ज्या गुंडाला अटक करण्यासाठी हे कॉस्टेबल गेले होते, त्यांना तशाप्रकारची परवानगी देण्यात आली होती काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13078 (पुढे सुरु...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दोन वर्षासाठी आरोपीला तडीपार केलेले होते. सदर आरोपीला पकडण्यासाठी पोलीसाच्या गणवेशामध्ये गेले तर तो पळून जाईल म्हणून पोलीस शिपाई हा सिव्हील ड्रेसमध्ये गेलेला होता.

...अडथळा....

श्री.संजय दत्त : ज्या आरोपीचा शोध चालू आहे, त्याला केव्हापासून तडीपार करण्यात आलेले आहे ? तडीपाराचे स्वरुप काय आहे, याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

(विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात.)

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय 19-6-2004 पासून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेले होते. सदर आरोपीवर तीन चार चोरीचे गुन्हे होते म्हणून त्यास तडीपार केलेले होते.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**महाराष्ट्र राज्य लॉटरी विभागातील कर्मचाऱ्यांनी 19 लाख रुपयांचा केलेला गैरव्यवहार**

**(2) * 13816 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य लॉटरीची बक्षिसे मिळालेल्या क्रमांकाची बनावट तिकीटे तयार करुन या विभागातील कर्मचाऱ्यांनी 19 लाख रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयंत पाटील** : (1) नाही. तथापी विक्री न झालेल्या तिकीटातून बक्षिसपात्र तिकीटे काढून ती विक्री झाल्याचे दाखवून बोगस विक्रेत्यामार्फत दोन सोडतीच्या प्रत्येकी एक या प्रमाणे दोन तिकीटांच्या बक्षिसांची मागणी शासनाकडे केली होती.

(2) जून, 2005 मध्ये बक्षिस पात्र तिकीटांची संशयीत चोरीची बाब प्रथम शासनाच्या निदर्शनास आली. त्यावर शासनातर्फे त्वरेने चौकशी करण्यात येऊन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शिवडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तसेच बक्षीसपात्र 14 लाख रुपयाच्या बक्षीसाच्या रकमेचे प्रदान देखील थांबविण्यात आले आहे. प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वत: मा. मंत्री (वित्त) यांनी मा. उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन या प्रकरणी गुन्ह्याचा तपास मुंबई पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आला आहे. त्यांच्याकडून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक 93/05 व गुन्हा रजिस्टर क्रमांक 94/05 असे सर्व गुन्हे दिनांक 19.8.2005 रोजी दाखल करण्यात आले आहेत. सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना या प्रकरणी त्यांना पोलिसांनी अटकही केली असून त्यांना जामिनावर सोडण्यात आले आहे, तथापी संबंधित उपसंचालक (वित्त व लेखा), लेखाधिकारी, उपलेखाधिकारी व हमाल अशा एकूण सहा अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

(3) सदर बाब उघडकीस आल्यावर 19 लाखांपैकी 14 लाख रुपयाचे प्रदान थांबविण्यात आले आहे. उर्वरित रकमेच्या अनुषंगाने गुन्हा अन्वेषण विभाग (आर्थिक) यांच्यामार्फत चौकशी चालू आहे व संबंधितांवर दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**इंदापूर (जि. पुणे) येथे गावठी सावकारांचा कर्जदारांना होणारा त्रास**

**(3) * 13176 डॉ. निलम गोऱ्हे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे बाबा धापटे या इसमाची माहे जानेवारी, 2006 वा त्या सुमारास गावठी सावकारीतून अमानुष हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या शहरात गावठी सावकारांनी कर्ज परत न करणाऱ्या कर्जदारांना पळवून नेणे, घर स्वत:च्या नावावर करुन घेणे, कोरे धनादेश घेणे, स्टॅम्पपेपरवर सही घेणे, सही न दिल्यास मारहाण करणे असे प्रकार वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत स्थानिक पोलिसात तक्रार केल्यास त्यांच्याकडून कोणतीच कारवाई होत नाही, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली काय व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (1) होय.

(2) याबाबत सदर गुन्ह्याव्यतिरिक्त आरोपीने एका व्यक्तीस डांबून ठेवल्याबद्दल त्यांचेविरुध्द आणखी एक गुन्हा इंदापूर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला आहे.

(3) व (4) याबाबत स्थानिक पोलीसांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर सखोल चौकशी केली असून गुप्त माहिती काढून सावकारी व्यवसाय करणाऱ्या व कर्जदारांना त्रास देणाऱ्या 7 सावकाराविरुध्द इंदापूर पोलीस ठाणे येथे भादंविस खाली विविध कलमांतर्गत व मुंबई सावकारी अधिनियमान्वये 7 गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**कणकवली (जि. सिंधुदुर्ग) येथे अमिषे दाखवून**

**धर्मांतरांचे घडत असलेले प्रकार**

**(4) * 13888 श्री. अनिल परब , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली शहरातील एका हॉटेलमध्ये अमिषे दाखवून धर्मांतरांचा प्रकार घडत असल्याचे माहे जानेवारी, 2006 च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी पोलिसांनी तपास केला आहे काय,

(3) असल्यास, या संदर्भात किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. आर. आर. पाटील** : (1) अशाप्रकारची घटना घडल्याबाबत कणकवली पोलीस ठाण्यात आतापर्यंत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नाही.

(2) व (3) प्रस्तुत प्रकरणी कोणाचीही तक्रार नसल्यामुळे अटक किंवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**इयत्ता 8 वी,10 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी राबविण्यात येणारी सावित्रीबाई फुले योजना**

**(5) * 13228 श्री. संजय दत्त , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय **विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) इयत्ता 8 ते 10 मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसुचित जातीच्या मुलींचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी सन 2003-2004 या शैक्षणिक वर्षापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ही योजना विमुक्त जाती भटक्या जामातीतील तसेच आर्थिकदृष्टया मागासलेल्या मुलींनाही लागू करण्यात आली आहे काय,

(3) उक्त योजनेअंतर्गत मुलींना किती शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे व शिष्यवृत्ती कोणत्या अटीवर देण्यात येते,

(4) सदर योजनेची शिष्यवृत्ती, उत्तर नागपूर येथील शाळांना दिली जात नाही हे खरे आहे काय,

(5) असल्यास, प्रश्न भाग (1) व (4) बाबत चौकशी केली आहे काय,

(6) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम,श्री.सुरुपसिंग नाईक यांच्या करिता** : (1) होय.

(2) विमुक्त जाती, भटक्या जमाती मधील मुलींना ही योजना लागू आहे. मात्र सर्व मुलींना 12 वी पर्यंत मोफत शिक्षण देण्यात येत आहे.

(3) इ.8वी ते 10 मधील विद्यार्थीनींना दरमहा रु.100/- प्रमाणे 10 महिन्यांसाठी पुढील अटी व शर्ती नुसार देण्यात येते.

1) ही योजना गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त आहे.

2) या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट रहाणार नाही.

3) या शिष्यवृत्तीसाठी गुणांची अट रहाणार नाही.

फक्त विद्यार्थीनींची उपस्थिती नियमित असणे आवश्यक राहील. शाळेमध्ये जेवढी उपस्थिती असेल त्यानुसार शिष्यवृत्ती देण्यात येते. इ. वी ते 10 मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र. 13228 (पुढे सुरु....

जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थीनींसाठी 10 महिन्याकरिता मंजूर करण्यात येते.

4) ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपुरतीच म्हणजेच 10 महिन्यांकरीताच मंजूर करण्यात येते.

5) शिष्यवृत्ती वाटप केल्याचे विनियोग दाखले हे पुढील वर्षी प्रस्ताव सादर करतांना देणे आवश्यक आहे.

6) ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी संबंधित मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

7) ही शिष्यवृत्ती वर्षातून तीनदा म्हणजेच जून व जुलै या महिन्यांकरीता दिनांक 26 जुलै, रोजी, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांकरीता 22 सप्टेंबर रोजी व ऑक्टोबर ते उर्वरित कालावधीसाठी 3 जानेवारी या ठराविक दिवशीच संपूर्ण राज्यात मुलींना देण्यात येते.

8) मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती दिनांक 26 जुलै, 22 सप्टेंबर व 3 जानेवारी या दिवशी मुलींना संबंधित ग्रामपंचायतीकडून वितरीत करण्यात येते.

9) सदर योजना विमुक्त जाती भटक्या जमातीच्या माध्यमिक आणि आदिवासी कल्याण विभागाच्या माध्यमिक मान्यताप्राप्त विनाअनुदानित अनिवासी माध्यमिक शाळेतील उक्त प्रवर्गाच्या मुलींना देखील अनुज्ञेय आहे.

(4) नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, 2005-2006 या आर्थिक वर्षात या योजनेचा फायदा राज्यातील किती विद्यार्थ्यांना देण्यात आलेले आहे ? यासाठी शासनाला या आर्थिक वर्षत किती रक्कम अदा करावी लागली ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : लाभार्थी जवळजवळ 2 लाख 62 हजार 401 आहेत. एकूण 29 कोटी रुपयाची तरतूद केलेली होती त्यापैकी 26 कोटी 42 लाख रुपये खर्च केलेले आहेत.

....(घोषणा देण्यात येतात)...

----

7...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

## गडचिरोली जिल्ह्यातील कसुरवाडी येथील जिल्हा परिषद शाळा नक्षलवाद्यांनी जाळल्याबाबत

**(६) * १६७४१ श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. अनिल परब , श्री. विलास अवचट , श्री. अनंत तरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील कसुरवाडी येथील जिल्हा परिषद शाळा नक्षलवाद्यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २००६ रोजीच्या रात्री २.०० वाजण्याच्या सुमारास जाळली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत शाळेचे किती नुकसान झाले,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) अद्याप कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) दि. १५-२-२००६ चे रात्री गडचिरोली जिल्ह्यातील कसुरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील कागदी रेकॉर्ड नक्षलवाद्यांनी जाळले, हे खरे आहे,

(२) सुमारे ३,०००/- रुपयांचे (रु.तीन हजारचे) नुकसान झाले आहे.

(३) व (४) एटापल्ली दलमच्या नक्षलवाद्यांविरुध्द कलम, ४३५,१४७,१४८,१४९,१२०(ब) भादंवि, सहकलम ३/२५ भाहका ३, ४ सामानुका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

...(अडथळा)...

....(घोषणा देण्यात येतात.)...

8.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**मानखूर्द येथून रसायन असलेला टँकर चोरणाऱ्या**

**दरोडेखोरांना करण्यात आलेली अटक**

**(७) * १३३७९ श्री. विलास अवचट , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखूर्द येथून १८ लाख रुपये किंमतीचे रसायन असलेला टँकर जबरदस्तीने चोरणाऱ्या पाच दरोडेखोरांना नवी मुंबई खंडणी विरोधी पथकाने दिनांक १९ जानेवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास अटक केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचे विरुध्द कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे व त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आर.आर.पाटील** : (१) होय, हे खरे आहे.

सदर घटना दिनांक १८.१.२००६ रोजी घडलेली आहे.

(२) व (३) सदर आरोपींविरुध्द ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २२/०६ कलम ३४२,३९५ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील पाचही आरोपींना अटक करण्यात आली असून ते सर्व अद्यापही न्यायालयीन कोठडीत आहेत.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

--

....(अडथळा)...

...(घोषणा देण्यात येतात.)...

9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MA

**मसुरा-बांदिवडे खाडीवर पुल बांधण्याबाबत**

**(8) * 14706 श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. विनायकराव मेटे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मसुरा-बांदिवडे खाडीवर पूल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वारंवार शासनाकडे करुन सुध्दा अद्याप तेथे पूल बांधण्यात आला नाही हे खरे आहे काय,

(2) त्या खाडीवर पूल नसल्यामुळे विद्यार्थी,रुग्ण व वृद्धांना नाईलाजास्तव छोटया होडयांमधून प्रवास करावा लागत असून होडयांचे अपघात होऊन बऱ्याच व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(3) यापूर्वी या पूलासाठी 2 लक्ष रुपयांची तात्पुरती तरतूद करण्यात आली होती त्यानंतर यावर काहीही तरतूद करण्यात आली नाही त्यामुळे परिसरातील नागरिकांत तीव्र असंतोष पसरला आहे हे ही खरे आहे काय,

(4) या पुलाच्या बांधकामावर अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे व पुलाच्या बांधकामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे.

(2) मागील 10 वर्षात होडी अपघात होऊन कोणी मृत्यूमुखी पडल्याचे नोंद नाही.

(3) व (4) या पूलासाठी रु.920 लक्ष एवढा खर्च अपेक्षीत असून अपुऱ्या अनुदानामुळे काम हाती घेतलेले नाही. पुरेशा निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया गेली चार वर्षे बांधकाम मंत्री आणि राज्य मंत्री यानी मसुरा-बांदिवडे खाडी पुलाच्या बांधकामासंबंधी निधीची तरतूद करण्यात येईल आणि ताबडतोब प्राधान्याने पुलाचे काम घेण्यात येईल, अशाप्रकारचे आश्वासन सभागृहामध्ये दिलेले आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य "वेल"मध्ये येऊन घोषणा देतात.)

माझा सन्माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, या वर्षी या पुलासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद करण्यात आलेली आहे ? हा पूल केव्हा करणार आहात ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, या पुलाचे काम हे जिल्हा स्तरावरील आहे. डी.पी.डी.सी.मध्ये त्यास मान्यता दिली, तर त्यास विभागामार्फत मान्यता देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.14706 (पुढे सुरु....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झालेले नाही. मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर नाही. डी.पी.डी.सी.चे बजेट 18 कोटी रुपयाचे आहे. त्यातील 920 लक्ष एवढी रक्कम ते देणार आहेत काय ? मंत्री महोदय दिशाभूल करीत आहेत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14706 ..... श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

माननीय मंत्रिमहोदय दिशाभूल करीत आहेत. या पुलासाठी बांधकाम खात्याच्या माध्यमातून प्रयत्न करुन या पुलाचे भूमिपूजन लवकरात लवकर करणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, हा ग्रामीण मार्ग आहे आणि या पुलासाठी, दोन गावांसाठी एवढा निधी शासनाकडे उपलब्ध होत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, यापूर्वी या सभागृहामध्ये सन्माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते. आता दोन गावांसाठी पूल होऊ शकत नाही असे म्हणत आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की, या पुलासाठी निधी उपलब्ध करुन लवकरात लवकर या पुलाचे बांधकाम करु. ते आश्वासन माननीय मंत्रिमहोदय विसरले काय ? हा पूल दोन गावांसाठी आहे असे माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत. 25 हजार लोकवस्ती तसेच तेथील खाडी जोडण्याचे काम या पुलाच्या कामामुळे होणार आहे. हा पूल शासन लवकर करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हे जिल्हास्तरीय काम काम आहे. या कामासाठी डीपीडीसी पैसे मंजूर करीत असते. या कामासाठी फक्त 21 हजार रुपयांची तरतूद आहे. प्रश्नाधीन पूल हा मसुरे व बांदिवडे गावादरम्यान वाहणाऱ्या कालावल खाडीवर प्रस्तावित आहे. या पुलामुळे (ग्रामीण मार्ग 1) भटवाडी ते बांदिवडे (खुर्द) व मसुरे डांगमोडे रस्ता ( ग्रामीण मार्ग 46) हे रस्ते जोडले जातात. या पुलाच्या कामाला शासन निर्णय क्र. व्हीआर. 2999/ प्र.क्र. 395/ नियोजन-3, मंत्रालय, मुंबई, दि. 4.2.1999 अन्वये रुपये 9 कोटी 20 लक्ष रुपये रकमेला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामामध्ये (1) पूल 225 मीटर (2) नवीन जोडरस्ते बांधकाम 1400 मीटर (3) मोऱ्यांचे बांधकाम (4) संकीर्ण बाबी (5) भूसंपादन इत्यादी बाबींचा समावेश आहे. या पुलाचा उपयोग मालवण तालुक्यातील खाडीचे पलीकडील गावांना मावलण या तालुक्याच्या ठिकाणी जवळचा मार्ग म्हणून उपयोग होणार आहे. तसेच खाडीच्या अलीकडील गावांना खाडीपलीकडील गावी जाण्यासाठी उपयोग होणार आहे. या पुलाच्या कामाचे सविसतर नकाशे व अंदाजपत्रकाची चालू दरसूचीनुसार तांत्रिक छाननी चालू आहे. पुलाच्या जोडरस्त्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

ता.प्र.क्र. 14706 ..... श्री. छगन भुजबळ .....

भूसंपादनाची आवश्यकता असून बांदिवडे बाजूकडील 1 हेक्टर 12.3 आर व मसुरे बाजूकडील 11.40 आर एवढ्या जमिनीची आवश्यकता आहे. याबाबत दि. 22.7.2004 रोजी भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यातील त्रुटीपूर्ततेबाबत कार्यवाही सुरु आहे. या कामावर वर्षनिहाय अनुदान देण्यात आले आहे. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकूण 61 कोटी रुपयांची कामे अर्थसंकल्पात आहेत आणि तरतूद 39.50 लाख रुपयांची आहे. एकूण रक्कम फार मोठी आहे. राज्याची एकूण अंदाजपत्रकीय कामे 5600 कोटी रुपयांची असून आपले बजेट 1295 कोटी रुपयांचे आहे. सभापती महोदय, याबाबतीतमध्ये हा एवढा मोठा खर्च त्वरित करता येणे शक्य होणार नाही. एक बाब आम्ही तपासून पाहणार आहोत. हा व्हिलेज रोड आहे. त्याला अपग्रेड करुन एमडीआर झाला तर तसे झ ााल्यानंतर सीआरएफ मध्ये प्रस्तावित करुन हे काम करु शकलो तर त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत. याबाबतीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे आग्रही आहेत याची मला कल्पना आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 14706 .......) (श्री. छगन भुजबळ....)

सभापती महोदय, लोकसंख्या कमी असली किंवा जास्त असली तरी या क्षणाला असलेले बजेट लक्षात घेऊन आपल्याला कामे हाती घ्यावी लागतात.

---

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून व्यासपीठाजवळील मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

**रॉकेल भेसळ प्रकरण उघडकीस आणणाऱ्या दैनिक सांजवार्ताच्या कार्यालयावर रॉकेल भेसळ टोळीने केलेला हल्ला**

**(९) * १३३९७ श्री. श्रीकांत जोशी , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. मधुकर चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे डिसेंबर, २००५ च्या शेवटच्या आठवडयात रॉकेल भेसळ प्रकरण उघडकीस आणणाऱ्या दैनिक सांजवार्ताच्या औरंगाबाद येथील कार्यालयावर रॉकेल भेसळ करणाऱ्या टोळीने हल्ला केला हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रॉकेल भेसळ करणाऱ्या टोळीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आर.आर.पाटील** : (१) दिनांक १७.१.२००६ रोजी दैनिक सांजवार्ताने रॉकेलचा काळा बाजार होत असल्याची बातमी प्रसिध्द केल्याने आरोपींनी दिनांक १७.०१.०६ रोजी सांजवार्ताच्या कार्यालयावर हल्ला केला.

(२), (३) व (४) याप्रकरणी दिलेल्या फिर्यादी वरुन दिनांक १७.१.२००६ रोजी क्रांतीचौक पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. २७/०६, भा.दं.वि.सं.कलम १४३, १४७, ३३६, ४२७ व १३५ मुं.पो.का. अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील निष्पन्न आठ आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांच्याविरुध्द दिनांक २७.०२.०६ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

( प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/

**पुणे शहरातील खडकी येथील मिलिटरी डेअरी फार्मच्या जागेत**
**अल्पवयीन मुलाची केलेली निर्घृण हत्या**

**(१०) * १४४७६ श्री. शांताराम करमळकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्रीमती संजीवनी रायकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खडकी येथील मिलिटरी डेअरी फार्मच्या मोकळया जागेत दिनांक १५ जानेवारी,२००६ रोजी वा त्या सुमारास अल्पवयीन मुलगा राजू जगन आढवाल (वय १५) याची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्या अनुषंगाने संबंधित हत्या करणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. आर. आर. पाटील** : (१) होय. हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १०/२००६ भा.दं.वि.सं. कलम ३०२ प्रमाणे नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात सर्वतोपरी प्रयत्न करुनही अद्याप आरोपी निष्पन्न झालेला नाही. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

( प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वसई सागरशेत येथे पडलेला सशस्त्र दरोडा

**(११) * १३५२१ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे , श्री. अनंत तरे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई सागरशेत येथे दिनांक ३ जानेवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास पडलेल्या सशस्त्र दरोड्यात प्रतापराय खोखाणी यांच्या बंगल्यावर सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा टाकून सुमारे ६.५० लाखाचा ऐवज लुटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेच्या अनुषंगाने पोलिसांनी केलेला तपास पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, पोलिस तपासात किती आरोपींना ताब्यात घेतले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३.१.०६ रोजी पहाटे ५ अज्ञात दरोडेखोरांनी तोंडावर कपडा गुंडाळून हातात घातक शस्त्रे घेऊन खोकानी बंगला, सागरशेत वसई या बंगल्याच्या गेस्ट रुमचे मागील खिडकीची ग्रील उचकटून त्यावाटे आत प्रवेश केला. फियार्दीस मारहाण करुन फिर्यादीच्या आई-वडील, पत्नी, २ मुले यांचे हातपाय बांधून त्यांना कोंडून व घरातील रोख रक्कम रुपये ३,५०,०००/- व सोन्या चांदीचे दागिने १ घड्याळ, ५ मोबाईल फोन व सॅन्ट्रो कार असा एकूण रु. १०,२१,५००/- किमतीचा ऐवज लुटून नेला. सदर घटनेबाबत दिलेल्या फिर्यादी वरुन वसई पो.स्टे. येथे गु.र.न.१/०६ भा.दं.वि.स.३९५,३९७,३४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात ११ आरोपी निष्पन्न झालेले असून त्या पैकी ५ आरोपींना अटक करुन त्यांच्या कडून रु.४,९९,००० च्या ऐवज व सॅन्ट्रोकार असा एकूण ७,०३,०००/- रु. ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे. उर्वरीत ६ फरार आरोपीना शोध घेवून चोरीस गेलेला ऐवज हस्तगत करण्याचे प्रयत्न कसोशिने चालू आहेत.

श्री. संजय दत्त : या गुन्ह्याच्या प्रकरणातील 11 आरोपीपैकी ज्या 5 आरोपींना अटक केलेली आहे त्याची जामिनावर सुटका करण्यात आलेली आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : खोकानी बंगला, सागरशेत वसई या ठिकाणी सशस्त्र दरोडा पडलेला होता. या प्रकरणी भा.दं.वि.सं. कलम 395, 397 आणि 342 खाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामधील आरोपी पुढील प्रमाणे आहेत. 1) विकास गोडाजी चव्हाण, वय-20, राहाणार अशोक नगर, उंबरगा, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर. 2) शेट्या गोपीनाथ चव्हाण, वय-34, राहाणार सदर...

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून व्यासपीठाजवळील मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

...5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहामध्ये सुरु असलेल्या घोषणाबाजीमुळे सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्याने मी सभागृहाची बैठक 15 मिनिटासाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 52 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

----

...नंतर श्री.कानडे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ MHM/ पूर्वी श्री. शिगम 13:05

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सदस्यांना ....

**सभापती** : मी आपले म्हणणे नियम 289 च्या अनुषंगाने ऐकून घेतले आहे. आता पुढील कामकाजाला सुरुवात करु या.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे आम्ही सर्व सन्माननीय सदस्य सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाचे माननीय सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात.)

------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. दयानंद मस्के ( गृहनिर्माण व बंदरे राज्यमंत्री ) : सभापती महोदय, , मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळाचे सन 1996-97, 1997-98, 1998-99, 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-03 व 2003-04 या वर्षांचे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र सागरी मंडळाचे सन 1996-97, 1997-98, 1998-99, 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-03 व 2003-04 या वर्षांचे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

प्रा. बी.टी. देशमुख (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा चवथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा चवथा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------------

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. वसंत चव्हाण (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजनेचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजनेचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----------------

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : महोदय, श्री. अरुण गणपत काकडे, सारखी, ता. तिवसा, जि. अमरावती, श्री. दत्तात्रय शंकर राऊत, कारखेड, ता. चिखली, जि. बुलडाणा आणि श्री. संदीप उत्तम सावे, मौ. वडनेर, ता. नांदुरा, जि. बुलडाणा या तीन शेतकऱ्यांनी नुकत्याच आत्महत्त्या केल्या आहेत व एकूण आत्महत्त्या एकूण 448, ही बाब मी या औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

----------------

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 14 एप्रिल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन तसेच जयंती दिन. हा दिवस संपूर्ण हिंदुस्थानात साजरा होतो. यासंदर्भात त्यांच्या कार्याबद्दल बोलावे तेवढे थोच आहे आणि त्यांच्या कामाची महती व त्यांनी लिहीलेली पुस्तके यांचा संग्रह पुणे महानगरपालिकेने www.brambedkar.com या वेबसाईटच्या माध्यमातून संकलित केला आहे. मी या औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण सातारा येथे सन 1896 ते 1904 या काळात झाले. ते ज्या निवासस्थानामध्ये राहत होते ते म्हणजे सर्व्हे क्र. 1 हे निवासस्थान ज्यांच्या ताब्यात आहे ते श्री. लक्ष्मण आंबे यांनी योग्य मोबदला दिल्यास ती जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी देण्याची तयारी दाखविलेली आहे. या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक व्हावे या अनुषंगाने शासनाने त्याबाबतची प्रक्रिया सुरु केलेली असली तरी त्यासंबंधीची औपचारिकता अजून पूर्ण झ ालेली नाही, अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. त्याचबरोबर सातारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री स्व.श्रीमाबाई आणि मामा स्व.शंकरराव यांच्या माध्यमातून सातत्याने दलिसांची आंदोलने व मोर्चे निघत होते व यामध्ये डॉ. बाबासाहेबांबद्दलचे प्रेम व आस्था दिसून येते. म्हणून शासनाने यासंदर्भात लक्ष घालून एखादी समिती गठीत करावी व या स्मारकासाठी निधीची उभारणी करावी, यासाठी शासनाचे लक्ष वेधण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**सभापती** : यासंबंधीची नोंद माननीय मंत्री महोदयांनी घ्यावी. तसेच विधानमंडळ सचिवालयामार्फत औचित्याच्या मुद्दयाबाबतची माहिती संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात येते.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : महोदय, आज 13 एप्रिल, 2006 म्हणजेच मार्च महिना उलटून 15 दिवस होत आहेत. तरीही अद्याप राज्यात शिक्षकांना त्यांचे पगार मिळालेले नाहीत. इतकेच नव्हे तर एप्रिल पेड इन मे हे पगार सुध्दा होतील की नाही याबाबत शंका आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजिवनी रायकर..

आता शाळांना सुट्टी सुरू होणार आहे. शिक्षकांकडे बाहेरगावी जाण्यासाठी तिकिटे काढायलासुध्दा पैसे नाहीत. इतकी वाईट अवस्था शिक्षकांची पगार न झाल्यामुळे झाली आहे. तेव्हा याची तातडीने दखल घेऊन शिक्षकांना पगार लवकर वितरित करण्याची व्यवस्था शासनाने करावी.

श्री.अजित पवार : होय.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महादेय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मी दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी विशेष उल्लेखाद्वारे हुतात्मा भाई कोतवाल यांच्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. हुतात्मा भाई कोतवाल यांचे माथेरान येथे वडिलापार्जित घर असून ते भाडेकरूंनी बळकाविले आहे. हुतात्मा भाई कोतवाल यांची पत्नी श्रीमती इंदिरा कोतवाल, वय वर्ष 88 हया सध्या लांबच्या नातेवाईकाकडे आश्रित म्हणून राहत आहेत. तेव्हा या प्रकरणाकडे शासनाने तातडीने लक्ष घालून श्रीमती इंदिरा कोतवाल यांना स्वत:चे घर मिळवून देण्यासंबंधीची विनंती केली होती. परंतु, यासंबंधी मला शासनाकडून अद्याप कोणतेही उत्तर आलेले नाही. आता पुन्हा मी यासंबंधीची शासनाने दखल घ्यावी अशी मी विनंती करीत आहे.

श्री.अजित पवार : होय.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्याबद्दल करवीरची खेळाडू कुमारी तेजस्विनी सावंत हिला पाच लाख रुपये आणि 5 टक्के कोटयातून सदनिका देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ठाणे जिल्हयातील मीरा-भाईंदर येथे राहणारी कुमार सिंपल कौर हिलासुध्दा या क्रीडा स्पर्धेत दोन रौप्य पदके मिळाली आहेत. तेव्हा तिचा देखील शासनाने सन्मान करावा अशी मी माननीय पालक मंत्र्यांना विनंती या औचित्याच्या मुद्दाद्वारे करीत आहे.

श्री.मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, सदर विषय मी देखील विशेष उल्लेखाद्वारे सदनामध्ये मांडलेला आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, यासंबंधी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला आणि पत्रकारांना विनंती करीत आहे. काल मुंबईच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत असताना गोपाळराव देशमुख मार्गाचा उल्लेख पेडर रोड असा करण्यात आला. यापुढे शासकीय कामकाजात व वर्तमानपत्रांनी पेडर रोड ऐवजी गोपाळराव देशमुख मार्ग असा उल्लेख करावा. अशाने तरी मराठी माणसांवरील अन्याय दूर होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, श्रीमती अनुजा मोरे या मागासवर्गीय महिलेवर फार मोठा अन्याय झालेला आहे. त्यांना 30 वर्षे सेवा केल्यानंतर शासनाची निम्नश्रेणी लघुलेखनाची 100 शब्द प्रति मिनिट गतीची परीक्षा उत्तीर्ण करण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणे दिनांक 12.8.2005 रोजी त्या परीक्षा उत्तीर्ण झाल्या व तसे कार्यालयास प्रमाणपत्र दिले. तरी सुध्दा लिपिक या पदावर पदावनत करण्याचा आदेश दिनांक 14.3.2006 रोजीच्या पत्रान्वये काढून अधिकाऱ्यांनी मागासवर्गीय महिलेवर अन्याय केला आहे. श्रीमती मोरे यांची 30 वर्षांची सेवा लक्षात घेता व आवश्यक असलेली गुणवत्ता प्राप्त केल्यानंतर सुध्दा श्रीमती मोरे यांना अन्यायास सामोरे जावे लागत आहे हे भयावह आहे. तरी श्रीमती मोरे यांना त्वरित लघुलेखक या पूर्वीच्या पदावर सामावून घेण्यात यावे असे आदेश द्यावेत अशी विनंती या औचित्याच्या मुद्दाद्वारे करीत आहे.

**सभापती** : याची शासनाने नोंद घ्यावी.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 13:20

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याद्वारे मी अतिशय महत्वाच्या बाबीकडे आपले आणि सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. डॉ.मेधा पाटकर यांचे नर्मदा धरणाच्या संदर्भात आमरण उपोषण सुरु आहे. नर्मदा धरणाची उंची 121 मीटर राहणार असे आपण मान्य केले होते. ही उंची 121 मीटर राहिली तर मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राला या प्रकल्पातून साधारणत: 1500 मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे आणि त्या दृष्टीकोनातून या राज्यांकडून गुंतवणूकही करण्यात आलेली आहे. परंतु केंद्र सरकारने या सरोवराच्या उंचीवर पुनर्विचार करण्यासंदर्भात दिनांक 15 एप्रिल, 2006 रोजी संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री आणि कमिटीच्या सदस्यांची बैठक बोलाविली आहे. सन्माननीय मेधा पाटकर यांनी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबतचा जो मुद्दा मांडलेला आहे तो सुध्दा महत्वाचा आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनही युध्द पातळीवर झाले पाहिजे याबद्दल दुमत नाही. या प्रकल्पातून पाणी ऑगस्टपर्यंत येणार आहे.

महोदय, आज सकाळी 7.30 वाजता मला गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.नरेंद्रजी मोदी यांचा फोन आला होता. त्यांनी सांगितले की, आपण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. तसेच त्यांनी असेही सांगितले की, 15 तारखेच्या बैठकीमध्ये उंचीच्या संदर्भात पुनर्विचार झाला तर हजारो-करोडे रुपयांचे नुकसान होईल. सध्या जी उंची ठरविण्यात आली आहे ती लक्षात घेऊन जी वीज निर्माण होणार आहे तिचा आपल्याला एक प्रकारे फायदाच होणार आहे. श्रीमती मेधा पाटकर यांचा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात यावा हा मुद्दा जरी महत्वाचा असला तरी त्यांनी आपला प्राण वेठीस धरता कामा नये. या सरोवरामुळे बाधित होणाऱ्यांचे पुनर्वसन येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत होईल ही जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी असे मला वाटते. त्यांच्या पुनर्वसनासाठी 10-20 कोटी रुपये जास्त लागले तरी चालतील परंतु त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. गरीब वर्गाला न्याय देताना त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रसंगी नियमामध्ये दुरुस्ती करावी. 15 एप्रिलच्या बैठकीमध्ये केंद्र सरकारने नियामक प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार केला तर महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान होईल. आज राज्यामध्ये अगोदरच वीजेची आणि पाण्याची टंचाई आहे. काल वर्तमानपत्रामध्ये वाचावयास मिळाले की, मुख्यमंत्र्यांशी या विषयातील शिष्टमंडळ भेटल्यानंतर त्यांनी शिष्टमंडळाला काही तरी आश्वासन दिले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

परंतु मी या मुद्याद्वारे सांगू इच्छितो की, या प्रकल्पावर महाराष्ट्राचे भविष्य आणि भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे या उंची संदर्भात शासनाने आजच्या आज खुलासा केला पाहिजे. 121 मीटर उंची कमी होता कामा नये याबाबत शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. आज मुख्यमंत्री महोदय माझ्या मते दिल्लीला आहेत. परंतु या ठिकाणी राज्याचे माननीय पाटबंधारे मंत्री, माननीय पुनर्वसन मंत्री, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी निश्चित अशी भूमिका घेतली पाहिजे. 121 मीटर उंची कायम राहील याबाबत शासनाने धोरण आखून, ते 15 तारखेला होणाऱ्या बैठकीमध्ये ठामपणे मांडले पाहिजे, अन्यथा फार मोठा अनर्थ होऊ शकतो.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला, त्या संदर्भात दिनांक 15 एप्रिल, 2006 रोजी सैफुद्दीन सोझ यांच्या अध्यक्षतेखाली संबंधीत मुख्यमंत्री महोदयांची बैठक आहे. वास्तविक पाहता त्या ठिकाणची पाहणी करुनच हा निर्णय झालेला आहे. राज्याचे मुख्यमंत्री त्या बैठकीला जात असताना एकंदरीत राज्याच्या फायद्याचा विचार करुनच आपली भूमिका मांडणार आहेत. आजच्या आज 121 मीटर उंची कमी होणार आहे की, वाढविण्यात येणार आहे याबद्दल भाष्य करणे योग्य होणार नाही. 15 तारखेच्या बैठकीमध्ये काय चर्चा होणार आहे, कशा प्रकारची चर्चा होणार आहे याबाबत आपण आज निश्चित काही सांगू शकत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 15 तारखेच्या बैठकीमध्ये राज्यातील जनतेचे हीत लक्षात घेऊनच, राज्य सरकार स्वत:ची भूमिका मांडेल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.विनोद तावडे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी चेंबूर येथे पाच जणांच्या सशस्त्र टोळीने भर दिवसा हिऱ्यांचे दागिने बनविणाऱ्या एका कंपनीची 1 कोटी 29 लाख रुपयांची रोकड लंपास करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी "मे.प्रिमियर रबर व केबल इंडस्ट्रीज, एम.आय.डी.सी., डोंबिवली, जि.ठाणे ही कंपनी कोणतीही पूर्व सूचना न देता गेल्या अनेक वर्षांपासून बंद असल्यामुळे कामगारांचे होत असलेले हाल " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी " वाशिम नगरपरिषदेच्या वतीने दैनिक मातृभूमी या स्थानिक वर्तमानपत्रात दिनांक 20.3.2006 रोजीच्या सुमारास निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येणे, परंतु त्यात दिलेली कामे यापूर्वीच पूर्ण झालेली असल्याचे लक्षात आल्याने त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेली स्थगिती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " कापूस उत्पादकांना सध्या त्यांच्या भाग भांडवल निधीची रक्कम देण्याचे काम विविध जिल्ह्यांत सुरु असून त्यात होत असलेले गैरप्रकार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे व इतर वि.प.स. यांनी " शासनाने फेब्रुवारी, 2004 मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विविध पदांसाठी नोकरभरतीची प्रक्रिया राबवूनही जून, 2005 पर्यंत 4781 उमेदवारांना नेमणुका न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी " सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्याची माहिती यशदा या संस्थेच्या पाहणीत आढळून येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे. यावर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विवेचन केले आहे, तरी, याचा देखील अंतर्भाव व्हावा हे पहावे.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 अन्वये निवेदने</u>**

**पृ.शी.**: काळम्मावाडी कालव्याला पडलेले भगदाड

**मु.शी.**: काळम्मावाडी कालव्याला पडलेले भगदाड याबाबत सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रामराजे नाईक निंबाळकर ( पाटबंधारे मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी काळम्मावाडी कालव्याला पडलेले भगदाड या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, काळम्मावाडीच्या उजव्या कालव्याला भगदाड पडलेले आहे. ते भगदाड सहा मीटर लांबीचे व 4 मीटर उंचीचे आहे. त्यामुळे ऐनीगाव येथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या कालव्याला पूर्वीही 2-3 कि.मी ला गळती झालेली होती. सभापती महोदय, या काळात जवळपास 13 गावांचे नुकसान झालेले आहे. आटेगाव येथे उजव्या कालव्याची गळती रोखण्याचे काम झाले. परंतु ते काम समाधानकारक झालेले नाही. काळम्मावाडी धरणाच्या या कालव्याला गळती झाल्यामुळे 13 गावातील 214 हेक्टर जमिनीचे नुकसान झालेले आहे. शेकडो एकर जमीन नापीक झालेली आहे. काळम्मावाडी कालवा गळती रोखण्याचे काम परत करावे, अशी तेथील शेतकऱ्यांनी वारंवार मागणी केलेली आहे. सभापती महोदय, असा प्रकार केवळ काळम्मावाडीमध्येच घडतो आहे असे नव्हे तर सांगली येथील शिराळा तालुक्यातील चाकोली गावामध्ये देखील असे प्रकार वारंवार घडत आहे. गावामध्ये पाणी शिरत आहे, शेतीमध्ये पाणी पसरत आहे. शेती नापीक होत आहे. कालव्याच्या गळतीमुळे ज्यांची जमीन नापीक झालेली आहे, अशांना भरपाईची देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, कालवा दुरुस्तीचे काम देखील निकृष्ठ दर्जाचे आहे. त्यामुळे लोहयुक्त अस्तरिकरण करुन गळती रोखावी, ते काम चांगल्याप्रकारे व्हावे, तसेच क्षारपड झालेल्या जमिनीच्या मालकांना भरपाई मिळावी, अशी तेथील शेतकऱ्यांकडून मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे का ? व याबाबतीत आपण कोणती कार्यवाही करणार आहात ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्याप्रमाणे काळम्मावाडी कालव्याला भगदाड पडलेले होते. पाण्याचा प्रवाह थांबवून या संदर्भात काम हाती घेतले होते. ते काम आता पूर्ण झालेले आहे. प्रवाह सिंचन व्यवस्था झालेली आहे. सभापती महोदय, या प्रश्नाचे दोन भाग आहेत. एक म्हणजे प्रत्यक्षात 1 ते 10 कि.मी. पर्यंत असलेले गळतीचे प्रमाण व त्या गळतीमुळे जमीन नापीक होणे व दुसरा भाग म्हणजे ते भगदाड कशामुळे पडले हे पहाणे. सभापती महोदय, या भागातील भूस्तर क्वार्टझाईट - शेलयुक्त अशा दगडांचा आहे. या भुस्तरातील खडक सांधेयुक्त आहे. खडकाच्या नैसर्गिक रचनेमुळे यातून मोठ्या प्रमाणावर पाझर सुरुवातीपासूनच जास्त होत आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ D/ प्रथम श्री. कांबळे.. 13:30

श्री. रामराजे नाईक निंबाळकर...

कालव्याच्या पाण्याची गळती होत आहे ती कालव्याच्या बंधाऱ्यातून किंवा कालव्याच्या लाईनमध्ये काही डिफेक्ट तयार झाल्यामुळे ती होत आहे. 1995 मध्ये गळती प्रतिबंधक उपायोजना करण्यासाठी शासनाने तज्ञ समितीची नियुक्ती केली होती, त्या समितीने 1 किलोमिटर ते 10 किलोमिटर कालव्याचा अभ्यास करुन 4 ते 5 उपाययोजना करण्याच्या सूचना समितीने केलेल्या आहेत. यासाठी 15 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आटेगांव येथील 4 किलोमिटर कालव्याच्या परिसरामध्ये गळती होत आहे अशी तक्रार करण्यात आली होती. त्या गळतीच्या संदर्भात सुध्दा उपाययोजना करण्यात आलेली आहे. आटेगांव येथील गळती आता पूर्णपणे थांबलेली आहे. काळम्मावाडी कालव्याला ऐनीगावाजवळ भगदाड पडलेले नसून कालव्याची लाईन व तेथील जॉईंट येथे पोकळी निर्माण झाली होती. कालवा व नदी पात्र यामध्ये फक्त 10 मिटरचे अंतर होते. कालव्याच्या अस्तरीकरणाच्या सांध्यातून पाझर होता, त्यात मातीचे कण जाऊन पाईपींग झाल्यामुळे तेथील भराव खचून वाहून गेलेला होता, तेथे पोकळी निर्माण झाली होती, सदर ठिकाणाहून पाणी वाहून गेलेले आहे. पंरतु तेथे कोणतीही लोकवस्ती किंवा शेतीचे क्षेत्र नाही, म्हणून तेथे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. शासनाच्या तज्ञ समितीने सुचविलेल्या सिंथेटिक सबस्टंस् चा वापर करुन गळती प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आलेली आहे व आता पूर्णपणे गळती थांबलेली आहे. तसेच सदर ठिकाणी कोणतेही नुकसान झालेले नसल्यामुळे नुकसान भरपाई देणे हे शासनाच्या धोरणात बसत नाही.

-----------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदन क्रमांक 2 च्या संदर्भात**

श्री. अजित पवार : सभापती महोदय, निवदेन क्रमांक 2 च्या संदर्भातील विषय मी राज्यमंत्री यांच्याकडे सोपविला होता. ते कामानिमित्त बाहेर गेल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जर निवेदन सोमवारी घेण्यास मान्यता दिल्यास ते निवेदन सोमवारी घ्यावे. माझी आताही उत्तर देण्यास तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : निवेदन सोमवारी घेण्यास माझी काहीही हरकत नाही.

श्री. गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित असतांना राज्यमंत्री उत्तर देणार होते, आपल्या दृष्टीने कॅबिनेट मंत्री महत्वाचे आहेत, राज्यमंत्री महोदयांकडे मंत्री महोदय एकही फाईल पाठवित नाहीत, आणि उत्तर त्यांनी द्यावे असे म्हटले जाते.

**निवेदन क्रमांक 3 च्या संदर्भात**

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 3 श्री. पांडुरंग फुंडकर.... सभागृहात उपस्थित दिसत नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, निवेदन क्रमांक तीन मध्ये माझे सुध्दा नाव आहे, श्री. पांडुरंग फुंडकर व इतर असे म्हटलेले आहे.

**उपसभापती** : इतर मध्ये तुम्ही नाहीत मी असे म्हटले नाही आपण बोलावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, व्यवस्थेचा भाग म्हणून मी आपल्या लक्षात आणून देतो की, लक्षवेधीमध्ये इतर लोकांची नावे असतात, मी या संदर्भात मागे सुध्दा विचार मांडले होते. म्हणून याबाबत स्पष्ट निर्देश होण्याची आवश्यकता आहे.

**उपसभापती** : ठीक आहे, निवेदन क्रमांक 3 घेण्यात यावे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासनाने महसूल वाढीसाठी दारुचे नवे परवाने जारी करण्याचा घेतलेला निर्णय

**मु.शी.**: शासनाने महसूल वाढीसाठी दारुचे नवे परवाने जारी करण्याचा घेतलेला निर्णय याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक ( उत्पादन शुल्क मंत्री ) : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एका बाजूला डान्सबार बंदीचा निर्णय घ्यावयाचा व दुस-या बाजूला महाराष्ट्रामध्ये हजारोच्या संख्येने नवीन दारुची दुकाने उघडून लोकांना दारु प्यायला प्रवृत्त करायचे, सदर धोरण कशाप्रकारचे आहे हे मला समजत नाही. सभापती महोदय, इतका महत्वाचा निर्णय घेत असताना एक्ससाईज मिनिस्ट्रीला पूर्णपणे अंधारात ठेऊन माननीय वित्त मंत्र्यांनी विधी व न्याय विभागाची परवानगी घेऊन हा मुद्दा अर्थसंकल्पीय भाषणामध्ये टाकून त्यामध्ये सध्याच्या विदेशी मद्य सेवन करण्याच्या परवानगी असलेल्या अनुज्ञप्त्यांतून सीलबंद स्वरुपात विदेशी मद्य घेऊन जाण्यासाठी ग्राहकांना मुभा देणे, देशी दारुच्या किरकोळ विक्री अनुज्ञप्तीमधून सीलबंद बाटलीमध्ये विदेशी मद्याची विक्री करण्यास परवानगी देणे तसेच विदेशी मद्याच्या परवाना कक्षाच्या धर्तीवर देशी मद्याच्या बाबतीत एक नवीन अनुज्ञप्ती सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. या संदर्भात सन 1988 साली उच्च न्यायालयाने नवीन दारुचे परवाने देण्याच्या संदर्भात आदेश दिलेले आहेत. या आदेशामध्ये नवीन दारुचे परवाने देण्यासाठी जाहिरात द्यावी लागेल, काही निकष ठरवावे लागतील. अशाप्रकारे सर्व निकष पाळल्याशिवाय नवीन दारुचे परवाने देता येत नाहीत. परंतु आता बीअरबारला जोडून नवीन दारुचे परवाने देण्याचा निर्णय घेतलेला आहे ही बाब योग्य नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होणार आहे. तसेच राज्य शासनाने नवीन परवाने देण्याबाबतचे धोरण ठरवण्यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यातील जनतेशी चर्चा करणे आवश्यक होते. तसेच या निर्णयाच्या संदर्भात आपण आपल्या पक्षश्रेष्ठींची चर्चा केली आहे किंवा नाही ? याची मला माहिती नाही. या निर्णयामुळे राज्यामध्ये दारुचा महापूर येईल. रस्तोरस्ती दारुची नवीन दुकाने थाटली जाण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे शासनाने महसूल वाढीसाठी नवीन दारुचे परवाने जारी करण्याचे धोरण राबवण्याचा घेतलेला निर्णय महात्मा गांधी यांच्या विचारांच्या विरुध्द आहे. या संदर्भात आपल्या पक्षश्रेष्ठींशी अपेक्षित चर्चा झाली आहे किंवा नाही ? याचा मंत्रिमहोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, जनादेश कधी आघाडी पक्षाला मिळतो,कधी युतीच्या पक्षाला मिळतो. सत्तेवर आल्यावर पाच वर्षांच्या कालावधीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ...

काही निर्णय घेतले जातात, या निर्णयांचे दुरगामी परिणाम पक्षाला भोगावे लागतात. म्हणून आघाडी शासनातर्फे कोणताही निर्णय घेत असताना पक्षश्रेष्ठींसमवेत चर्चा केल्यानंतरच निर्णय घेतला जातो. सभापती महोदय, हा निर्णय फार मोठा व महत्वाचा आहे. अशाप्रकारचा निर्णय घेत असताना आमच्या पक्षाच्या नेतृत्वाबरोबरच मंत्रिमंडळाच्या सहका-यांसमवेत सुध्दा चर्चा करण्यात आली आहे. तसेच अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सुध्दा याबाबतचा उल्लेख आलेला आहे.

यानंतर श्री.सुंबरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

म्हणून या निवेदनामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, विविध संस्था आणि सामाजिक संघटना यांचा त्या विषयीचा एकूणच रोख लक्षात घेता शासन या अनुषंगाने पक्ष आणि मंत्री पातळीवर पुनर्विचार करून या बाबतीत जनतेला आणि एकूणच भविष्यकाळात भारतीय संस्कृतीला बाधा येणार नाही अशा प्रकारचा निर्णय घेणार नाही असे आपण ठरविले आहे.

श्री. नितीन गडकरी : म्हणजे तोपर्यंत याला स्थगिती आहे, माननीय वित्त मंत्र्यांनी बजेटमधून जे गाईड केलेले आहे त्याला स्थगिती आहे असे आम्ही समजायचे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 15 एप्रिल नंतर याची कार्यवाही होणार होती ती होणार नाही एवढेच मी सांगू इच्छितो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी विनंती आहे, माननीय मंत्री महोदयांनी दूरगामी सामाजिक भूमिकेतून आपली भूमिका येथे मांडली आहे. त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. पण तुम्ही या बाबत नंतर निर्णय करणार आहात त्यावेळेस हे अधिवेशन असणार नाही, त्या काळातच नेमका आपण हा निर्णय घेणार व महाराष्ट्रात दारूचा महापूर होण्यास सुरूवात होईल. म्हणून माझी विनंती आहे की, तुमच्या एकूणच भूमिकेचे मी स्वागत केलेलेच आहे तेव्हा आता पक्षाच्या आणि मंत्रिमंडळाच्या पातळीवर देखील याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच विधीमंडळामध्ये देखील याबाबत चर्चा झाला पाहिजे. राज्याचे उत्पन्न वाढले पाहिजे या भूमिकेला कोणाचाही विरोध नाही. परंतु याबाबत निर्णय घेताना आपण विधीमंडळातील लोकप्रतिनिधींचे देखील विचार ऐकून घ्यावेत अशी माझी सूचना आहे. तुम्ही मंत्री आहात, सरकार तुमचे आहे. तुम्ही याबाबत निर्णय घेण्यास समर्थ आहात. परंतु दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेण्यापूर्वी, त्याचे महत्त्व समजून घेऊन, याबाबत सभागृहामध्ये चर्चा करून मगच आपण निर्णय घ्याल का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गडकरी यांना माझ्या भूमिकेविषयी विश्वास आहे. म्हणूनच मी इतकेच सांगेन की, भविष्य काळामध्ये कोठल्याही प्रकारे महाराष्ट्राच्या जनतेच्या जीवनामध्ये वाईट बाबी येणार नाही, भारतीय संस्कृतीला कोठे डाग लागणार नाही असाच निर्णय मंत्रिमंडळ घेईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, आपण सभागृहाला या संबंधात विश्वासात घेतले जाईल असे सांगितले आहे ...

....... आर 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : मी तसे सांगितलेले नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, ठीक आहे. पण टाईम्स ऑफ इंडियामध्ये दोन वेळा बातमी आली आहे '...permit rooms are going to be legal outlets ..' या बाबतीत माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्यालाही विश्वासात घेतले नाही असा आशय त्यात आहे. मुळात या निवेदनात आपण म्हटले आहे की, '.... फक्त अस्तित्वात असलेल्या अनुज्ञप्त्यांच्या आशयामध्ये बदल होणार आहे. ..' तेव्हा हा बदलच आम्हाला समजून घ्यावयाचा आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जे धोरण खात्याकडे आलेले आहे त्यामध्ये अनुज्ञप्तीच्या आशयात बदल घडविण्याचे ध्वनित केलेले आहे. परंतु बदल झालेला नाही. माननीय अर्थमंत्री आणि मी, आम्हा दोघांमध्ये कोठलाही दुरावा नाही. सनदी अधिकाऱ्यांनी चुकीच्या भूमिकेतून त्यांना माहिती दिली. त्याबरोबर मी या अनुषंगाने त्यावेळी आणि आजही माझे मत मांडले आहे. जोपर्यंत महाराष्ट्राच्या हिताची बाब असेल तोपर्यंत त्याला मी पाठींबा देईन, एका मर्यादेपर्यंत याबाबत राज्य सरकार कारवाई करणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे ... एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : आपण 88 बाबत काही सांगितले नाही?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 88 च्या अनुषंगाने त्यावेळी काही लोकांचे लायसन्स रिनिव्हल करण्यासंबंधी परिपत्रक काढण्यात आले. परंतु उच्च न्यायालयाने असे सांगितले की, तुम्ही त्याकरीता जाहीरात दिली पाहिजे. ती जाहीरात दिल्यानंतर लायसन्सधारकाची योग्यता, क्षमता पडताळून त्यांना अनुज्ञप्ती देण्याची कारवाई करावी. त्यामुळे माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे तशाप्रकारची कारवाई करण्याच्या अनुषंगाने पावले उचलली जातील.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी पूर्वी औचित्याच्या मुद्दयाव्दारे प्रश्न उपस्थित केला होता की, शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे कोणत्याही व्यक्तीला दुकानामध्ये देशी दारु उपलब्ध होईल अशाप्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर काही लोकांनी त्या निर्णयाविरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्या संदर्भात सांगोपांग विचार शासनाने करावा अशाप्रकारची मी मागणी केली होती. तिला अनुसरुन माननीय सभापतींनी शासनाने त्यासंबंधी खुलासा करावा असे निदेश दिले होते. तेव्हा त्या संदर्भात वस्तुस्थिती काय आहे? दुकानामध्ये ही देशी दारु विक्रीसाठी खुली झाली आहे काय? नसेल तर त्यासंबंधी निर्णय झालेला नाही असे समजायचे काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जोपर्यंत या विषयावर अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत आज चालू असलेली लायसन्स होल्डर दुकाने आहेत त्यामध्ये काहीही बदल करण्यात आलेला नाही आणि होणार नाही.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठवाडयामध्ये चिकन गुनिया व डेंग्यूच्या साथीने घातलेले थैमान

मु.शी. : मराठवाडयामध्ये चिकन गुनिया व डेंग्यूच्या साथीने घातलेले थैमान याबाबत श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी "मराठवाडयामध्ये चिकन गुनिया व डेंग्यूच्या साथीने घातलेले थैमान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. तथापि, आपल्या परवानगीने निवेदनामध्ये मी पुढील दुरुस्ती करु इच्छिते. निवेदनातील तक्त्यामध्ये "तालुका" ऐवजी "जिल्हा" असे वाचावे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, शासनाने दिलेले निवेदन सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. याठिकाणी जी आकडेवारी देण्यात आली आहे त्यापेक्षा अधिक पटीने रुग्ण मराठवाडयामध्ये आहेत. ही आकडेवारी संपूर्ण मराठवाडयातील असली तरी एका जिल्हयामध्येच एवढे रुग्ण आहेत. चिकन गुनिया आणि डेंग्यू या साथीमुळे संपूर्ण मराठवाडा त्रस्त झाला आहे. मराठवाडयातील कोणत्याही शासकीय दवाखान्यामध्ये या रोगावर औषधे उपलब्ध नाहीत. तसेच, त्या दवाखान्यामध्ये वैद्यकीय अधिकारी हजर राहात नाहीत. मराठवाडयातील ही भयानक परिस्थिती लक्षात घेता या साथीला नियंत्रणात आणण्यासाठी व कठोर उपाय योजना करण्यासाठी या साथीचा पुहा एकदा सर्व्हे केला पाहिजे. आणि प्रत्येक जिल्हयामध्ये या साथीवर लागू पडणाऱ्या औषधांचा पुरवठा करण्यात आला पाहिजे. त्यासाठी आपण उपाय योजना करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, याठिकाणी दिलेले निवेदन हे दोन दिवसापूर्वी चर्चेला येणार होते. परंतु ते नंतर पुढे ढकलण्यात आले. सद्यपरिस्थितीमध्ये मराठवाडयातील जिल्हानिहाय अप डेट आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध असून माननीय सदस्यांचा आग्रह असल्यास मी ती वाचून दाखविण्यास तयार आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण ती आकडेवारी पटलावर ठेवावी. फक्त मराठवाडयामध्ये कोंबडया किती लोक खातात आणि चिकन गुनिया किती लोकांना झाला त्याची आकडेवारी सांगा.

डॉ. विमल मुंदडा : चिकन गुनिया आणि कोंबडयांचा काही संबंध नाही. चिकन गुनिया डास चावल्यामुळे होतो. प्रत्येक जिल्हयाला किती औषधांचा पुरवठा करण्यात आला त्याची माहिती माझ्याकडे असून ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवते. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्हयाला जॉईंट डायरेक्टर व डेप्युटी डायरेक्टर नेमण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे एकूण रुग्णांची संख्या 49107 आहे. चिकन गुनिया रुग्णांच्या रक्ताचे नमुने तपासण्यासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असता त्यापैकी 142 नमुने पॉझिटीव्ह आढळून आले.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी एकूण रुग्ण संख्या 49107 असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात निवेदनामध्ये 49274 छापण्यात आले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे ही माहिती अपडेट आहे, असे कसे म्हणता येईल ?

डॉ.विमल मुंदडा : ही तीन-चार दिवसाच्या अगोदरची माहिती आहे. कारण ही सूचना पुढे ढकलण्यात आलेली होती. त्यामुळे अपडेट माहिती आता देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज मिळालेली माहिती आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, वर्तमानपत्रामधील कटिंग माझ्याकडे आहेत. या ठिकाणी 536 गावामध्ये लागण झाल्याचे सांगितले गेले. परंतु ही संख्या वाढलेली आहे 4,500 गावामध्ये या साथीची लागण झालेली आहे. त्या गावांतील लोकसंख्या 80 लाख आहे. 10 लाख लोकांना तापाची लागण झालेली आहे. आरोग्य अधिकारी हे साथ आटोक्यात आणू शकत नाहीत. हा आजार पसरत चाललेला आहे. लोक मृत्युमुखी पडत आहेत. यासाठी इमर्जन्सी म्हणून टास्क फोर्स नेमून डे टू डे बेसीसवर मॉनिटरींग करण्याची गरज आहे. याकडे सरकार गांभीर्याने लक्ष देऊन डे टू डे मॉनिटरींगसाठी सेल नेमणार आहात काय ?

डॉ.विमल मुंदडा : साथ आटोक्यात आलेली आहे. चिकन गुनिया या आजाराने कोणी मृत्यूमुखी पडत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय आपण मंत्री महोदयांना संरक्षण देऊ नका, आम्हाला संरक्षण द्या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येत आहेत. मंत्री महोदयांनी 200 गावामध्ये ही साथ असल्याचे सांगितले परंतु सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे 4,500 गावामध्ये ही तापाची साथ पसरलेली आहे. यामध्ये 50 लोकांचा मृत्यू ओढवलेला आहे, अशा बातम्या वर्तमानपत्रामधून येतात. या संबंधात वर्तमानपत्राकडून खुलासा घेतलेला आहे काय ? लोकांना सावध करण्याकरिता शासनाने आतापर्यन्त कोणत्या प्रकारची काळजी घेतलेली आहे ? वर्तमानपत्रातून आलेल्या बातम्या असत्य आहेत, असे शासनाचे म्हणणे आहे काय ? तसे असेल तर वर्तमानपत्रांविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात ?

डॉ.विमल मुंदडा : ज्या बातम्या दिल्या जात आहेत, त्या चुकीच्या आहेत. चिकन गुनिया या रोगामध्ये कोणाचाही मृत्यू झालेला नाही. या रोगामध्ये तीन ते चार दिवस अंगात ताप रहातो. औषधोपचाराने 100 टक्के हा आजार बरा होतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

डॉ.दीपक सावंत : 50 लोकांचा मृत्यू झालेला आहे, याबाबत काय म्हणायचे आहे ?

डॉ.विमल मुंदडा :बालानगरमध्ये 3 रुग्णांचा मृत्यू हा ॲक्युट फिवरने झालेला आहे. मी स्वत: मराठ्यातील लातूर, उस्मानाबाद, बीड येथील अफेक्टेड गावांना भेट देऊन आलेली आहे. मराठवाड्यातील जवळपास सगळया जिल्ह्यांना मी भेटी दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी आपण औषधांची फवारणी करतो आहोत, डोअर टू डोअर जाऊन ट्रीटमेंट देत आहोत. त्या भागातील लोकांनी घाबरुन जाण्याचे काहीच कारण नाही. 500 आर.टी. वर्कर्स नेमलेले आहेत. 200 फॉगिंग मशिन्स उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. हा आजार गेल्या 30 वर्षामध्ये आपल्याकडे नव्हता, हे सन्माननीय सदस्यांनाही माहिती आहे. लोकांनी घाबरुन जाऊ नये, म्हणून शासनाने निश्चितपणे प्रयत्न केलेला आहे. काही दिवसातच हा आजार नियंत्रणामध्ये येणार आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये भीतीचे वातावरण आहे.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या चुकीच्या आहेत.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडे जी माहिती आहे ती त्यांनी माझ्याकडे त्यावी. मी त्या त्या भागामध्ये गेल्यानंतर वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्यांबाबत स्वत: खुलासा केलेला आहे. चिकन गुनियामुळे एकही मृत्यू झालेला नाही हे मी स्वत: जाहीरपणे सांगू इच्छिते. सन्माननीय सदस्यांकडे वर्तमानपत्रांची जी कात्रणे आहेत ती त्यांनी माझ्याकडे द्यावीत. त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

**उपसभापती** : यानंतर पाचवे निवेदन घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाकडून जी भूमिका मांडण्यात आली त्यामुळे आमचे समाधान झालेले नाही. त्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हे निवेदन चौथ्यांदा आलेले आहे...

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीचा सभात्याग होत आहे. मी व्यवस्थितपणे उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी आजाराचे भांडवल करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून होऊ नये.

**उपसभापती** : आपण व्यवस्थित उत्तर दिलेले आहे. आपले उत्तर बरोबर आहे. म्हणून मी यानंतर पाचवे निवेदन घेण्यात येईल असे सांगितले आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ D/ MAP

**पृ. शी.** : उरण येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या पोर्ट युजर्स बिल्डींगला लागलेली आग.

**मु. शी.** : उरण येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या पोर्ट युजर्स बिल्डींगला लागलेली आग याबाबत श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, विलास अवचट, अनंत तरे, डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, विलास अवचट, अनंत तरे, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उरण येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या पोर्ट युजर्स बिल्डींगला लागलेली आग या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ D/ MAP

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, न्हावाशेवा येथील जेएनपीटी हे अत्यंत व्यस्त आणि देशातील सर्वाधिक आयात निर्यात होणारे बंदर आहे. या बंदरामध्ये सातत्याने आगी लागतात. मी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर सुध्दा त्या ठिकाणी एक आग लागलेली आहे. या आगीमध्ये प्रत्यक्षात किती आर्थिक नुकसान झाले ? अग्निशमन दलाचे 15 बंब आणि 50 टँकर 9 तास आग विझवत होते. त्या ठिकाणी आग नियंत्रणात आणण्यासाठी हायड्रॉलिक जॅक आणि प्लॅटफॉर्म असलेला बंद आवश्यक आहे. तो त्या ठिकाणी नव्हता ही गोष्ट खरी आहे काय ? अग्निशमन दलाच्या गाडीचा वॉल्व उघडला गेला नाही म्हणून आग ताबडतोब आटोक्यात आणण्यामध्ये अग्निशमन दल अपयशी ठरले ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जेएनपीटीमध्ये ही इमारत 1+ 3 मजल्यांची असून तिसऱ्या मजल्यावर आग लागली होती. ती गोष्ट खरी आहे की, आगीचे 15 बंब आणि 50 टँकर आग विझवत होते. सुरुवातीला फायर ब्रिगेडच्या एका गाडीचा वॉल्व उघडण्यास उशीर झाला हे म्हणणे बरोबर आहे. त्या ठिकाणी अंदाजे 1,34,04,746 रुपयांचे नुकसान झालेले आहे. अजून तपास चालू आहे. त्या ठिकाणी यापेक्षा जास्त नुकसान झाले असण्याची शक्यता आहे.

श्री. अरविंद सावंत : मी मघाशी सांगितले की, ते अत्यंत व्यस्त बंदर आहे. त्या ठिकाणी हायड्रॉलिक जॅक असलेला बंब असण्याची आवश्यकता आहे. ते नसल्यामुळे अग्निशमन दल आग विझवण्यामध्ये अपयशी ठरले. दुर्दैवाने वॉल्व उघडला नाही हे तांत्रिक कारण घडलेले आहे. यासंदर्भात कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी सातत्याने आगी लागतात. दुसरे म्हणजे शस्त्रात्रांचे साठे सापडण्याची प्रकरणे जेएनपीटीमध्ये होत आहेत परंतु कोणीही त्या ठिकाणी खास लक्ष देत नाही. त्या ठिकाणी अद्ययावत अग्निशमन दल आणि पोलीस यंत्रणा या दोन गोष्टींच्या बाबतीत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे परंतु जेएनपीटीवर पूर्णपणे केंद्र शासनाचे नियंत्रण आहे. त्यामुळे त्यांना याप्रमाणे सूचना केल्या जातील किंवा भविष्यात अशी घटना घडली तर काय काय व्यवस्था असली पाहिजे याबाबतीत सविस्तर सूचना त्यांना पाठवण्यात येतील.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : या आगीचा तपास कोणामार्फत करण्यात येत आहे ? जेव्हा जेएनपीटीमध्ये एका कंटेनरमध्ये शस्त्रास्त्रे सापडली होती त्यावेळी विचारलेल्या प्रश्नाला "हा तपास त्यांच्या मार्फत सुरु आहे" असे उत्तर देण्यात आले होते. जेएनपीटी हे महाराष्ट्रातील मोठे बंदर असून त्या ठिकाणी घडणा-या घटनांच्या संदर्भात राज्याच्या पोलीस विभागाला तपास करण्याचे अधिकार नाहीत काय ? मागे कंटेनरमध्ये जी शस्त्रास्त्रे सापडली होती त्याबाबतीत पुढे काय झाले ? राज्याच्या पोलीस खात्याला फक्त आगीचाच तपास करण्याचे अधिकार आहेत काय ? हा तपास केव्हा पूर्ण होईल ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : पोलीस खात्यामार्फत तपास चालू आहे. विक्रम मेहता पोलीस निरीक्षक हे तपास करीत आहेत...

श्री. अनंत तरे : जेएनपीटीमधील कंटेनरमध्ये जेव्हा शस्त्रास्त्रे सापडली त्यावेळी राज्य शासन तपास करु शकत नाही असे उत्तर दिले होते.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : फक्त जळीत प्रकरणी हा तपास चालू आहे. तेथे लागलेल्या आगी बाबत पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यानुषंगाने तपास करण्यात येत आहे..

श्री. अनंत तरे : कंटेनरमध्ये जी शस्त्रास्त्रे सापडली त्याबाबतीत तपास करण्याचे अधिकार राज्य शासनाला आहेत की नाहीत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हा आगीसंबंधी प्रश्न विचारण्यात आलेला आहे...

श्री. दिवाकर रावते : जेएनपीटीतील कोणकोणत्या बाबीसंबंधी शासनाला तपास करण्याचे अधिकार आहेत आणि कोणकोणत्या बाबीसंबंधी तपास करण्याचे अधिकार नाहीत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्या ठिकाणी कशामुळे आग लागली ? त्या आगीमागे घातपाताचा प्रकार आहे काय ? यादृष्टीने पोलीस तपास करीत आहेत...

श्री. दिवाकर रावते : आगीचा तपास करण्याचे अधिकार शासनाला आहेत. जी शस्त्रास्त्रे सापडली त्याबाबतीत तपास करण्याचे अधिकार नाहीत. तर मग जेएनपीटीच्या संदर्भात शासनाला कोणत्या बाबी तपासण्याचे अधिकार आहेत ? पोलीस काय काय तपास करु शकतात ?

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : जेएनपीटीवर पूर्णपणे केन्द्र सरकारचे नियंत्रण आहे. ही आगीची घटना घडल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तत्संबंधीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यानुषंगाने तपास करण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : जेएनपीटीमध्ये जी आग लागली त्या बाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून आगीचा तपास करण्यात येत आहे असे राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. मग जेएनपीटीमध्ये जी शस्त्रास्त्रे सापडली होती त्याबाबतीत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे काय ? शस्त्रास्त्रांच्या बाबतीत तपास करता येणार नाही असे उत्तर राज्यमंत्री महोदयांनी दिले होते....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्यावेळी असे सांगितले होते की, कस्टम खात्याकडून 100 टक्के चेकिंग होते. त्याबाबतीत कस्टम खात्याकडून गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. कस्टम खात्याकडून जोपर्यन्त गुन्हा दाखल होत नाही तोपर्यन्त...

श्री. दिवाकर रावते : मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले त्याची सामग्री कोठून आली ? माझे म्हणणे एवढेच आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये अशा त-हेने शस्त्रास्त्रे येत असतील तर त्याबाबतीत कारवाई करण्याचे पोलिसांचे काम नाही काय ? पोलिसांना फक्त तक्रारीच नोंदविण्याचे अधिकार आहेत काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्यावेळी असे उत्तर दिले होते की, शंभर टक्के चेकिंग हे कस्टमकडून होते. कस्टमचे अधिकारी त्याबाबतीत तपास करीत आहेत. त्यांच्याकडून तपास होऊन त्यांनी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केल्यानंतर त्यानुषंगाने तपास करता येईल. आता आगीच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे....शस्त्रास्त्रे सापडणे हा वेगळा विषय आहे आणि आग लागणे हा वेगळा विषय आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 14:05

**पृ.शी.**: नांदेड शहरात एका अल्पवयीन मुलीस पळवून नेणे.

**मु.शी.**: नांदेड शहरात एका अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.श्रीकांत जोशी,श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.श्रीकांत जोशी,श्री.पांडुरंग फुंडकर, यांनी "नांदेड शहरात एका अल्पवयीन मुलीस पळवून नेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

**निवेदनानंतर**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सूचनेला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की ज्या मुलीच्या प्रश्नावरुन जनक्षोभ उसळला आणि दंगल झाली त्या मुलीने संबंधित मुलाशी लग्न केलेले आहे. आमच्याकडे जी माहिती आहे त्यानुसार या मुलीचे अद्याप लग्न झालेले नसून ती आपल्या आई-वडिलांकडे रहात आहे. माझा प्रश्न असा आहे की, वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यामार्फत या मुलाकडून आणि मुलीकडून प्रतिज्ञापत्र दाखल करुन घेण्यात येईल काय ? वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यामार्फत या मुलीचा जबाब नोंदवून घेतला जाईल काय ? या मुलीचे लग्न झालेले आहे किंवा नाही हे निश्चित समजले पाहिजे. त्याचप्रमाणे येथील एक नगरसेवक सातत्याने अशा प्रकारे चिथावणी देण्याचे काम करीत असतो त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यामार्फत मुलाचा आणि मुलीचा जबाब नोंदवून घेण्यात येईल. माननीय सदस्यांनी एका नगरसेवकाचा या ठिकाणी उल्लेख केला त्याच्या विरोधात गुन्हे दाखल झालेले आहेत आणि कारवाई केलेली आहे.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आयटीआय अमरावती प्रादेशिक विभागात कर्मचाऱ्यांची
अवैध नियुक्ती.

**मु.शी.**: आयटीआय अमरावती प्रादेशिक विभागात कर्मचाऱ्यांची
अवैध नियुक्ती केल्याबाबत सर्वश्री सागर मेघे,नितीन गडकरी,
पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील(उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री सागर मेघे,नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर यांनी "आयटीआय अमरावती प्रादेशिक विभागात कर्मचाऱ्यांची अवैध नियुक्ती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## निवेदनानंतर

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, 1995-99 या कालावधीमध्ये अमरावती आयटीआय विभागात एकूण 198 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या त्यामध्ये 37 खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना राखीव प्रवर्गामध्ये नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात चौकशी करण्यासाठी 2003 मध्ये शासनाने समिती नेमली होती. आतापर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली नाही. याप्रकरणातील एक अधिकारी ठाकरे यांचे निधन झालेले आहे. दुसरे अधिकारी निवृत्त झालेले आहेत. तिसरे अधिकारी आहेत त्यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. 10 वर्षापूर्वी या सर्व गोष्टी घडलेल्या आहेत. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करावे अशी माझी यानिमित्ताने शासनाकडे मागणी आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये तालुका तेथे आयटीआय अशा प्रकारची भूमिका शासनाने स्वीकारल्यानंतर जी काही पदे भरण्यात आली त्यामध्ये काही पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आली. त्यावेळी नियमित नियुक्त्या होऊ शकल्या नव्हत्या. राज्य शासनाने विभागीय स्तरावर निर्णय घेतला आणि त्यानुसार 19 मार्च 1999 रोजी अशा प्रकारच्या अस्थायी नेमणुका झाल्या होत्या त्यापैकी 1061 पदे नियमित केली. यासंदर्भात कर्मचाऱ्यांकडून सातत्याने निवेदने येत होती,मोर्चे निघत होते आणि धरणे धरली जात होती. हा प्रश्न प्रामुख्याने अमरावती विभागातील आहे. या विभागात ज्यावेळी नियुक्त्या करण्यात आल्या त्यावेळी जे 2/3 अधिकारी होते त्यापैकी एका अधिकाऱ्याचा मृत्यू झालेला आहे. दुसरे अधिकारी निवृत्त झालेले आहेत. तिसरे अधिकारी सेवेत आहेत. प्रश्न फक्त 37 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहे. आरक्षणाच्या विरोधात पदे भरली गेली त्यानंतर 1061 पदे नियमित करण्याचा निर्णय घेतला गेला आणि संचालक व उपसंचालक यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले. त्यामुळे ही पदे नियमित झालेली आहेत. आता त्या काळात जी अनियमितता झालेली असेल त्यासंदर्भातील तीन अधिकाऱ्यांपैकी एक मयत झालेले आहेत आणि दुसरे निवृत्त झालेले आहेत. तिसरे अधिकारी आहेत त्यांच्याविरुध्द चौकशी निश्चित करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे पी.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, खरे म्हणजे जे डायरेक्टर व डेप्युटी डायरेक्टर यांचे काय करावे हेच समजत नाही. एकटया अमरावती विभागावरच हे स्कायलॅब कोसळलेले आहे की काय अशी मला शंका येते. या प्रकरणात काही अधिकाऱ्यांनी मान्यता दिली, एका अधिकाऱ्याने सांगितले की, तशी मान्यता देणार नाही. कोर्टाने सांगितले की, हे बरोबर नाही आणि त्यानंतर सुप्रिम कोर्टात गेले असता हायकोर्टात गेल्याचे लपवून ठेवले म्हणून 5000 रुपये अधिकाऱ्यालादंड भरावा लागला. माझे म्हणणे असे आहे की, संपूर्ण राज्यात अस्थायी पदांची भरती झाली होती त्योवळी शासनाने दि. 19.9.1999 रोजी असा एक निर्णय घेतला होता व त्यानुसार संपूर्ण राज्यातील 3761 पदे नियमित करण्यात आली, त्यात 1061 पदे ही माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या विभगाच्या अखत्यारितील होती. परंतु दुर्देवाने काही अधिकाऱ्यांनी हा बॅकलॉग भरला नाही व अमरावती विभागातील अधिकाऱ्यांनी या कर्मचाऱ्यांच्या टर्मिनेशनची ऑर्डर एकाच दिवशी काढली होती व त्यावेळी आम्ही सभागृहात व सभागृहाच्या बाहेर देखील भांडलो, माननीय मंत्री महोदयांना भेटलो, निवेदने दिली तसेच मोर्चे देखील काढले व त्यानंतर ती एक गोष्ट रेग्युलराईज्ड झाली. शासनाने विशेष भरती मोहिमेअंतर्गत अनुशेष भरला त्यावेळी ज्यांना टर्मिनेशन दिले होते त्यामध्ये आमच्या विभागातील एस.सी. चे 21, एस.टी. चे 4, व्ही.जे.एन.टी. चे 13 आणि काही ओ.बी.सी. चे लोक होते. या अनुषंगाने माझे दोन तीन प्रश्न आहेत. एक म्हणजे या लोकांना पहिल्यांदा का सामावून घेतले नाही ? ज्यावेळी सन 2002 मध्ये विशेष भरतीची मोहिम घेण्यात आली त्यामध्ये हा अनुशेष का भरण्यात आला नाही ? तसेच यासाठी जे अधिकारी जबाबदार असतील, ज्यांनी 10-10 वर्षे काम करुन देखील अन्याय केला अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या तिन्ही बाबी तपासून पाहण्यात येतील. म्हणजेच सुरुवातीला अनुशेष का भरण्यात आला नाही ? विशेष मोहिमेत याबात का विचार केला नाही ? तसेच जी 37 पदे आरक्षणाच्या अगेन्स्ट भरण्यात आली त्यासंदर्भात मी कालच खालच्या सभागृहात घोषणा केली की, ज्या ज्या तालुक्यात आय.टी.आय. आपण सुरु करु शकलो नाही, तंत्रशिक्षणाचा बॅकलॉग आहे त्या त्या ठिकाणी आय.टी.आय. कॉलेजेस अथवा अनुदानित आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजेस नसतील ते कॉलेजेस प्रत्येक तालुक्याला एक

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .......

तरी असावे अशा प्रकारे दोन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मी लवकरच घेऊन जाणार आहे. तसेच हा 37 पदांचा अनुशेष वेळेत भरुन काढण्याच्या संदर्भात निर्णय घेतला जाईल आणि याबाबत जी अनियमितता झालेली आहे त्यासंबंधीची चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

----------------

............3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सूर्या पाणीपुरवठा योजनेच्या देखभालीबाबत.

**मु.शी.**: सूर्या पाणीपुरवठा योजनेच्या देखभालीबाबत या विषयासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितकंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, प्रा. फौजिया खान वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या विषयाकडे माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वसई (जि.ठाणे) येथील सुर्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती व अर्धवट स्थितीत असलेली कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध होत नसल्याने होणारा खर्च व मिळणारा निधी यात तफावत वाढत असून सदरहू प्रकल्प पूर्ण न होण्याची निर्माण झालेली शक्यता, वसई, विरार उपविभागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी उभा केलेला सूर्या प्रकल्प ऐन उन्हाळयात त्याची देखभाल व दुरुस्ती न झाल्याने पाणी टंचाईला तोंड देण्याची स्थानिकांवर आलेली पाळी, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चार नगरपरिषदांकडे सदर योजना हस्तांतर करुन घेण्याबाबत लावलेला तगादा, त्यामुळे सूर्या प्रकल्प बंद होऊन पुन्हा पाणी टंचाईला सामोरे जाण्याची वसई, विरार वासियांमध्ये पसरलेली भिती, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अजित पवार (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

...............३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या निवेदनामुळे माझे समाधान झालेले असल्यामुळे मी या लक्षवेधी सूचनेसंबंधात प्रश्न विचारु इच्छित नाही.

.........४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गंगापूर (जि. अमरावती) तालुक्यात शेत वस्त्यांवर दरोडेखोरांनी घातलेला हैदोस.

**मु.शी.**: गंगापूर (जि. अमरावती) तालुक्यात शेत वस्त्यांवर दरोडेखोरांनी घातलेला हैदोस. याबाबत सर्वश्री सुरेश जेथलिया, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विलास अवचट, अनिल परब, अरविंद सावंत, अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर तालुक्यातील घामोरी शिवारात रस्त्यावर आणि नागापूर व शिवपूर शिवारात शेत वस्त्यांवर दिनांक २५ मार्च, २००६ रोजी वा त्या सुमारास १५ ते २० सशस्त्र दरोडेखोरांच्या टोळीने घातलेला हैदोस, दरोडेखोरांनी केलेल्या जबरदस्त हल्ल्याला प्रत्युत्तर करतांना शिवपूर येथील चंद्रभान नारळकर हा इसम मृत्यूमुखी पडणे व अन्य १० जण गंभीर जखमी होणे, दरोडेखोरांनी ग्रामस्थांना लाठयाकाठयांनी बेदम केलेली मारहाण, जखमींना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात येणे, दरोडेखोरांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, दरोडेखोरांना पांगविण्यासाठी पोलिसांची कुमक कमी पडणे, दरोडेखोरांनी पोलिसांना केलेले आव्हान, परिणामी संपूर्ण जिल्हयात पसरलेले दहशतीचे व घबराटीचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, दरोडेखोरांचे हल्ल्यांचे वाढते प्रकार पाहता यावर शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-------------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये जे निवेदन शासनाच्यावतीने करण्यात आले होते, त्यातील एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार होतो. परंतु, आपण मला त्यावर बोलायला संधी दिली नाही. तो प्रश्न देखील मराठवाडयाच्या दृष्टीने गंभीर होता आणि आताच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेला विषय देखील गंभीर आहे. मराठवाडयात ग्रामीण भागातील शेतकरी हे शेतातच राहतात. त्यामुळेच तेथे गंभीर घटना घडलेली आहे. परंतु, या गुन्हयाचा तपास अद्याप लागलेला नाही. 400 पोलिसांची कुमक 8-10 दरोडेखोरांना पकडू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. या दरोडेखोरांनी संपूर्ण गावामध्य दहशतीचे वातावरण निर्माण करून लूटमार केलेली आहे. दरोडेखोरांच्या हैदोसामुळे एका व्यक्तिचे निधन झाले असून अनेकजण जखमी देखील झाले आहेत. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळेच या गुन्हाचा तपास लागलेला नाही. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आतापर्यंत जेवढे दरोडे पडले आहेत, लूटमार झाली आहे, त्यापैकी किती गुन्हयांचा तपास लागला आहे ? आज या भागामध्ये दहशतीचे वातावरण आहे. पोलिसांची गाडी दरोडेखोरांना पकडायला गेली होती, परंतु रस्त्यामध्ये ती बंद पडली. मंत्रिमहोदय प्रत्येक अधिवेशनामध्ये पोलिसांची स्तुती करतात. पण गोरगरींबाना न्याय मिळवून देत नाहीत. आता पर्यंत एकाही गुन्हयाचा तपास पोलिसांनी लावलेला नाही. अशावेळी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण तीन ठिकाणी दरोडे पडले आहेत. याप्रकरणी पाच आरोपींना पकडण्यात आले असून ते सध्या पोलीस कस्टडीत आहेत. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी पथक नेमण्यात आले असून दरोडेखोरांचा पोलीस कसून शोध घेत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलिसांची हतबलता हा विषय सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मांडलेला आहे. एका आरोपीला पकडले म्हणून त्याच्या गँगने पोलिसांना आव्हान दिले. या गँगने चोरीचे सत्र मराठवाडयामध्ये सुरू केलेले आहे. यात पोलिसांची हतबलता आहे. निवेदनात म्हटले आहे की, "दिनांक 26 मार्च 2006 रोजी आरोपींचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे तीन पथक तयार करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना गुन्हेगारांच्या वस्तीवर छापे मारण्यासाठी रवाना करणात आले. पोलीस मोटार सायकलवरून येत असल्याचे पाहून गणपत गायरान, येसगाव शिवरातील संशयित गुन्हेगारांनी पोलिसांवर दगडफेक केली. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Y 2

BGO/ KGS/ MAP/ खर्चे.. 14:15

श्री.दिवाकर रावते...

दगडफेकीत वाळूज पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक व पाच कर्मचारी जखमी झाले. म्हणजे ती गँग कशी आहे ती पहावी.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पाच पोलीस त्यामध्ये जखमी झाले. पाच पोलीस आणि सहाय्यक पोलीस निरिक्षक गुन्हेगारांच्या वस्तीवर छापे मारण्यासाठी मोटार सायकलींवरुन का पाठविले ? ही कुमक मोठया व्हॅन मधून का पाठविली नाही ? त्यांच्या सोबत मोठी पोलीस कुमक का पाठविली नाही ? त्या परिसरामध्ये गुन्हेगारांची टोळी वसलेली आहे हे माहीत असून सुध्दा तेथे मार खाण्यासाठी पोलीस गेले होते काय ? ते पोलीस परत आले असे आपण निवेदनामध्ये म्हटले आहे. परंतु ज्या आरोपींना पकडले होते त्यांनीच पोलिसांना आव्हान दिले होते हे खरे आहे काय ? असल्यास, त्यांच्यावर कारवाई करण्यामध्ये पोलिसांना अपयश आले काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस त्या वस्तीजवळून जात असताना त्या ठिकाणी असलेल्या तांडयातील लोकांना असे वाटले की, पोलीस आपल्याला पकडण्यासाठी आले आहेत. त्यामुळे त्यांनी पोलिसांवर दगडफेक सुरु केली. पोलिसांना त्यांच्यावर संशय आल्यामुळे त्यांना पकडले. पोलीस गंभीर जखमी झालेले असताना सुध्दा त्यांनी प्रथम दोन संशयित आरोपींना व नंतर पाच आरोपींना पकडले आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या तिन्ही घटना दुर्गम भागात घडल्या आहेत. दिनांक 25 मार्च रोजी पहिली घटना रात्री 8.00 वाजता, त्यानंतर रात्री 2.00 वाजता पुन्हा अशीच घटना घडली. यामध्ये पोलीस विभागाचे पूर्णतः फेल्युअर आहे. ज्यावेळी या घटना घडल्या त्यावेळी गंगापूर-वैजापूरचे डी.एस.पी. झोपले होते काय ? ज्यावेळी पहिली डकैती झाली त्यावेळी पोलिसांना या घटनेची माहिती केव्हा मिळाली ? रात्री 2.00 वाजतेपर्यंत तीन दरोडे पडले. वारंवार घटना घडत असताना पोलिसांना त्या गुन्हेगारांना पकडण्यात अपयश का आले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सांगितलेली घटना बरोबर आहे. दरोडयाची पहिली घटना रात्री 8.00 वाजता, दुसरी रात्री 11.00 वाजता आणि तिसरी रात्री 2.00 वाजता घडलेली आहे. पहिला दरोडा पडल्यानंतर पोलिसांना घटनेची रात्री 8.30 वाजता माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस प्रत्यक्ष घटनास्थळी गेले, तेथील जखमींना दवाखान्यात आणले. पोलीस परत येत नाहीत तितक्यात दुसरी घटना घडली.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे...

ज्या 13 व्यक्ती जखमी झाल्या होत्या त्यापैकी एक व्यक्ती मयत झाली. पोलिसांनीच या जखमींना दवाखान्यात आणले. पोलीस त्या ठिकाणी होते, परंतु दुर्दैवाने यातील आरोपी पोलिसांना मिळाले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**<u>डान्सबार वरील बंदी उच्च न्यायालयाने उठविल्याबाबत.</u>**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सदनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. ते सदनातून निघून जाण्यापूर्वी त्यांच्या विभागाशी संबंधीत असलेली बाब मी त्यांच्या आणि सदनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

महोदय, या सभागृहात डान्सबार बंदी विधेयकावर चर्चा झाली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर आणि मी माननीय मंत्री महोदयांना सुचविले होते की, या कायद्यामध्ये विसंगती असल्यामुळे न्यायालयात जर याबाबत केस दाखल झ ाली तर ती केस टिकणार नाही. परंतु सरकारने घाईघाईने डान्सबार बंदीचा कायदा पास केला. त्यावेळी आम्ही केलेल्या सूचनांची दखल घेतली गेली नाही. उच्च न्यायालयाने डान्सबार बंदी विरोधात निर्णय दिल्यामुळे राज्य सरकारला एक प्रकारे चपराक बसली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये गोंधळ सुरु आहे. त्यामुळे राज्य सरकार या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टामध्ये अपील करणार आहे की नाही ? याबाबत माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगणे आवश्यक आहे. 1992 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाचे हिअरिंग अजूनही सुरुच आहे. डान्सबार बंदीच्या संदर्भातील निर्णय तातडीने लागू शकतो, मग बॉम्बस्फोट प्रकरणाचा निर्णय तितक्याच तातडीने का लागत नाही ? मी या निमित्ताने विचारु इच्छितो की, डान्सबार बंदीसंदर्भात आतापर्यंत शासनाने किती गुन्हे दाखल केले होते. कोणत्या चुकांमुळे हा पराभव पत्करावा लागला ? यामध्ये कोणाचा दोष आहे ? उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्राची राष्ट्रीय स्तरावर बेईज्जती झाली आहे. आज महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे कशाच्या आधारावर हे सर्व झाले आहे याबाबत सभागृहाला माहिती होणे आवश्यक आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री महोदय उपस्थित असल्यामुळे त्यांनी या विषयावर काही तरी प्रकाश टाकला पाहिजे. कारण या निर्णयाबाबत आम्हाला केवळ वर्तमानपत्र आणि टी.व्ही. चॅनेल्सच्याद्वारे माहिती मिळते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी निवेदन करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डान्सबार बंदी विधेयकाला आम्ही एकमताने पाठिंबा दिला होता. त्यावेळी मुद्दे मांडण्यात आले होते की, त्यामध्ये अल्पवयीन मुलींचे प्रमाण जास्त आहे. तरी, शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

( गोंधळ )

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन केल्यानंतर आपण प्रश्न विचारणार असाल तर मी लक्षवेधीला सुरुवात करतो. लोकशाहीप्रमाणे मी पटलावरील कामकाज पहिल्यांदा घेत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही सगळ्यांचा बोलण्याचा अधिकार अबाधित ठेवतो. माननीय उपमुख्यमंत्री येथून निघून गेल्यानंतर आम्हाला आमचे म्हणणे मांडता येणार नाही. त्यांनी या संदर्भातील निवेदन कधीही करावे. परंतु या संदर्भात निवेदन करण्यात येईल असे आम्हाला आश्वासित करावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी निवेदन करुनच सभागृहाच्या बाहेर जाईन.

----

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 बाबत</u>**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आली आहे. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक 3 घेऊ.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सूर्या पाणीपुरवठा योजनची देखभाल व दुरुस्ती

**मु.शी.** : सूर्या पाणीपुरवठा योजनची देखभाल व दुरुस्ती

यासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, विनायक मेटे, प्रा. फौजीया खान, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

( चर्चा पुढे सुरु ....

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, काही वेळापूर्वी " सूर्या पाणीपुरवठा योजनची देखभाल व दुरुस्ती " ही लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेस आली होती. परंतु काही कारणास्तव मी त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हते. सभापती महोदय, माझ्या दृष्टीने ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची असल्यामुळे कृपया " अपवादात्मक विशेष बाब " म्हणून मला या लक्षवेधी सूचनेवर 1-2 प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात यावी.

**उपसभापती** : ठीक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, वसई जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती या संदर्भात माझी लक्षवेधी आहे. सभापती महोदय, या उप प्रदेशात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेऊन विरार, वसई, नालासोपारा, नवघर आणि माणिकपूर येथील जवळपास 64 गावांसाठी उप प्रादेशिक योजना घेण्यात आली होती. सभापती महोदय, या योजनेमध्ये जवळजवळ 4 नगरपालिका आहेत. या नगरपालिकांमध्ये 3-5-8 कि.मी पुढील अंतरासाठी वाहिनी टाकावी लागेल. मुख्य जलवाहिनी मोठी करावी लागेल. सभापती महोदय, यासाठी होणाऱ्या खर्चावर शंभर टक्के अनुदान देण्यात येत होते.

सभापती महोदय, आज उन्हाळा सुरु झालेला आहे. मार्च-एप्रिल महिना आलेला आहे. यावेळी या सर्व गावांची परिस्थिती अशी आहे की, तेथील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. तेथील पाण्याची परिस्थिती अतिशय वाईट आहे. तरी, माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सूर्या पाणीपुरवठा योजनेसाठी वसई, विरार, नालासोपारा आणि नवघर-माणिकपूर नगरपरिषदांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून 9 टक्के दराने कर्ज घेण्यासाठी भाग पाडले हे खरे आहे का ? तसेच, सूर्या योजनेसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्ज रुपाने शासनास देणार असून या कर्जासाठी शासनाकडून परतफेडीची हमी न देण्यात आल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या योजनेसाठी निधी देण्यास नकार दिला हे खरे आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या चार नगरपरिषदांच्या पाणीपुरवठा योजनेबद्दल आपल्याला देखील माहित आहे. आपण सगळ्यांनी पुढाकार घेऊन, त्यावेळी माननीय श्री. आर.आर.पाटील साहेब पाणीपुरवठा खात्याचे मंत्री असताना, ही योजना पूर्ण केली. सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.मध्ये 208 कोटी रुपयांची योजना करण्याचा निर्णय झाला.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 14:30

श्री. अजित पवार....

या चार नगरपालिकांसाठी 208 कोटी रुपयांची योजना आखण्यात आलेली आहे. त्यापैकी 85 कोटी रुपये हे शासनाचे अनुदान आहे. एमएमआरडीए 123 कोटी रुपयांचे कर्ज देणार आहे. या योजनांसाठी एमएमआरडीएकडून 76 कोटी रुपये व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून 37 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. शासनाचे अनुदान म्हणून एमएमआरडीएकडे 19 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. या सर्व योजनांवर आतापर्यंत 123 कोटी 76 लाख रुपये खर्च झालेला आहे. जून 2007 पर्यंत या योजना मार्गी लावण्यात येणार असून या चारही नगरपालिकांना त्यातून पाणी मिळणार आहे. आता 54 कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असून गरज भासल्यास आणखी निधी एमएमआरडीएकडून देण्यात येईल. तशा प्रकारच्या सूचना एमएमआरडीएला देण्यात आलेल्या आहेत. या पैशासाठी राज्य शासनाची हमी मागण्यात आली होती. एमएमआरडीए व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही राज्य शासनाची दोन महामंडळे असल्यामुळे त्यांच्याकरीता हमीची गरज नाही, अशी चर्चा पुढे आलेली आहे. सदर निधी देण्यासाठी दरवर्षी बजेटमध्ये तरतूद करुन निधी देण्यात येईल. आता 85 कोटी रुपये शासनाचे अनुदान कर्ज स्वरुपात परत द्यावयाचे आहे. तशा प्रकारची प्रोव्हिजन करण्यात आलेली आहे. हप्त्या हप्त्याने हे सर्व पैसे देण्यात येणार आहेत, सदर कामे रेंगाळू नयेत म्हणून आमच्या विभागाने खबरदारी घेतलेली आहे. सदर कामांच्या संदर्भात तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी श्री. हितेंद्र ठाकूर यांनी सुध्दा प्रयत्न केलेले आहेत. आमच्या विभागाचा असा याप्रमाणे खबरदारी घेण्यात येत आहे. या योजनांच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या टप्प्यातील कामे प्रगती पथावर आहेत. ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आमच्या विभागाचा राहील. तेथील दोन कामाच्या संदर्भात जमीन संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे, कोणत्याही परिस्थितीत या 4 नगरपालिकांना पिण्याचे पाणी कमी पडणार नाही, अशा प्रकारचे आमच्या विभागाचे नियोजन आहे.

-------------

.....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर येथील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मॉडेल मिल चाळीचे पुनवर्सन करणे

**मु.शी.**: नागपूर येथील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या मॉडेल मिल चाळीचे पुनवर्सन करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदिश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो, आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर येथील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एन.टी.सी.) मॉडेल मिल चाळीचे पुर्नवसन करण्याबाबत मॉडेल मिल चाळ पुर्नवसन कृती समिती व महाराजा डेव्हलपर्सचे संचालक यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे दिनांक २१ जून, २००४ रोजी रीट याचिका दाखल करणे, त्यावर खंडपीठाने दिलेल्या आदेशामध्ये मॉडेल मिल चाळीमधील ४१६ रहिवाश्यांना प्रत्येकी २६४ चौ. फूट घरे नि:शुल्क देण्यात यावे असे स्पष्ट निर्देश एन.टी.सी. ला देणे, त्यानुषंगाने एन.टी.सी ने सात महिन्याच्या आत सदरहु घराच्या बांधकामाची निविदा काढून चाळवासीयांना नि:शुल्क घरे बांधून देण्याचे प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयात सादर करणे, प्रतिज्ञापत्र सादर करुन दीड ते दोन वर्षाचा कालावधी होवूनही एन.टी.सी. कडून अद्यापपावेतो चाळवासीयांना कोणतीही घरे बांधून न देणे अथवा बांधकामाच्या निविदाही न काढणे, याप्रकरणी चाळवासीयांनी एन.टी.सी. चे अध्यक्ष, संचालक, तसेच राज्य शासनाचे संबंधित अधिकारी यांचेकडे वारंवार निवेदने देवूनही त्यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही कारवाई न होणे, सद्य:स्थितीत या चाळीची अवस्था फारच दयनीय असणे, सदरहू चाळीतील इमारती कोणत्याही क्षणी कोसळण्याची निर्माण झालेली भिती, सदरहू चाळीची गृहनिर्माण सचिवांनी केलेली प्रत्यक्ष पाहणी, चाळवासीयांनी त्यांना दिलेले निवेदन व त्यांनी त्वरीत कारवाई करण्याचे दिलेले आश्वासन, परंतु अद्यापही यावर शासनाकडून एन.टी.सी. कडे कोणताही पाठपुरावा केला नसल्याबाबतच प्रत्यक्षदर्शी मिळालेला पुरावा, एकीकडे मॉडेल मिल बंद होवून मिल कामगारांचे वेतन बंद होणे व दुसरीकडे कामगारांना राहण्याकरीता घर उपलब्ध करुन न देणे, अशा आर्थिक संकटात सापडलेला कामगार वर्ग, या दोन्हीही बाबींकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे चाळवासीयांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

....३...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एन.टी.सी.च्या मालकीच्या गिरण्यांच्या जमिनीबाबत कोर्टाने निर्णय दिल्यानंतर देखील कामगारांना घरे मिळालेली नाहीत. एनटीसी टेंडर काढत आहे. टेंडर काढून त्यामध्ये कामगारांना प्राधान्य द्यावे अशी विनंती एनटीसीला महाराष्ट्र सरकारने करावी, जेणेकरुन हा प्रश्न लवकरात लवकर निकाली निघावा यासाठी महाराष्ट्र शासन एनटीसीकडे प्रयत्न करणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नियमाप्रमाणे त्यांना 2 एफएसआय दिला जाणे आवश्यक आहे, तो 2 एफएसआय देण्यात येणार आहे काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत, कामगारांच्या घरांचा प्रश्न हा अत्यंत जिव्हाळयाचा आहे, मॉडेल मिलची जागा ही एनटीसी म्हणजे केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे, महाराष्ट्र शासनातर्फे एनटीसीच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी 416 रहिवाशांना 264 चौ.फूटांची घरे मिळालेली आहेत. ते कामगार तेथे राहत आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चतुर्वेदी ...

कामगारांना अतिरिक्त एफएसआय देण्याच्या संदर्भात नगरविकास खाते व एनटीसी यांच्याकडे अधिकार आहेत. वस्त्रोद्योग मंत्री या नात्याने आम्ही दोघांची एकत्रित बैठक घेऊन त्यांना सूचना केलेल्या आहेत. एफएसआयच्या संदर्भात कन्स्ट्रक्टेड तसेच नॉन कन्स्ट्रक्टेड या दोन बाबी आहेत. अतिरिक्त एफएसआयच्या संदर्भात नागपूर व मुंबई शहरासाठी वेगवेगळे नियम आहेत. या संदर्भात दोन महिन्यांच्या आत अतिरिक्त एफएसआय देण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल. तसेच कामगारांचे हित लक्षात घेता एनटीसीने 110 कामगारांचे कापलेले 75,000 रुपये कामगारांना परत करण्यासाठी आणि विशेष बाब म्हणून कामगारांना अतिरिक्त एफएसआय देण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या जातील व कामगारांना त्याच ठिकाणी जागा देण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्रिमहोदयांनी केलेल्या निवेदनात कामगारांसाठी नागपूर व मुंबईसाठी वेगवेगळे नियम असल्याचे सांगितले आहे. याबाबत त्यांनी स्पष्टीकरण करावे व कामगारांना 2 एफएसआय देण्याबाबत माननीय मंत्रिमहोदय खुलासा करतील का ?

श्री.सतीश चतुर्वेदी : मुंबईमध्ये गिरणी कामगारांना पुन्हा घरे बांधून देण्याच्या अटीवरच बिल्डर्सचा प्लॅन मंजूर केला जातो. परंतु नागपूरमध्ये हा नियम लागू नाही. डीसी प्लॅनप्रमाणे कामगारांना 2 एफएसआय देय नाहीत. म्हणून कामगारांना चाळी परत बांधून द्यावयाच्या. या संदर्भात कामगारांना अतिरिक्त एफएसआय देण्यासंबंधी एनटीसीला सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी एनटीसी निविदा काढणार आहे हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. हे एनटीसीचे प्रपोझल आहे ......

श्री.नितीन गडकरी : माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात आपण खुलासा करणे आवश्यक आहे. कारण मुंबईत बिल्डरने भरलेल्या टेंडरमध्ये कामगारांना 240 चौरस फुटाची घरे फुकट बांधून द्यावयाची आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश थोडा वेगळा आहे. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांकडून खुलासा होणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा प्रश्न थोडा वेगळा आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी मुंबईच्या संदर्भात जी माहिती सांगितली त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे चाळीतील भाडेकरुंना खोल्या खाली करण्यासाठी सांगण्यात आले आहे. तसेच त्या ठिकाणी नवीन इमारतींचे बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणी असलेल्या कामगारांना पर्यायी जागा देण्यासाठी संघर्ष सुरु आहे. या संदर्भात अतिरिक्त एफएसआय देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तसेच मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी आताच सांगितलेल्या माहितीमध्ये कामगारांना दोन एफएसआय दिल्यानंतर एनटीसी निविदा काढणार असल्याचे आपण स्पष्टपणे सांगितलेले आहे.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चतुर्वेदी : या मध्ये बिल्डर्सचा प्रश्न येत नाही. ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही टेंडर्स काढण्याचे अधिकार महाराष्ट्र सरकारला नाहीत, मंत्र्यांच्या देखील त्याच्याशी काहीही संबंध नाही. ही एनटीसीची ओपन टेंडर्स आहेत हे खरे आहे काय ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सन्माननीय सदस्य सांगतात ते अगदी बरोबर आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. लक्षवेधी सूचनेवरील चर्चा आता संपली आहे. यानंतर पुढील विषय घेतला जाईल.

***

**डान्स बार संबंधात औचित्याचा मुद्दा.**

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, ज्या विषयाची चर्चा काल पासून संपूर्ण महाराष्ट्रात अगदी घरोघरी चालली आहे त्याबाबतीत केवळ आम्हीच अंधारात राहणे बरोबर नाही. ही चर्चा केवळ महाराष्ट्रतच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर देखील घरोघरी होत आहे. तेव्हा या डान्स बार संबंधात नेमके काय घडलेले आहे ? निकाल काय लागला आहे ? त्याबाबत सरकारची भूमिका काय आहे ? हे आम्हाला समजले पाहिजे. या सभागृहामध्ये दोन वेळा, विधेयक मंजुरीसाठी आले असताना झालेल्या चर्चेमध्ये देखील मी आपल्याला सांगितले होते की, हे विधेयक न्यायालयामध्ये 10 मिनिटेसुद्धा टिकणार नाही. पण सरकारने त्याची दखल घेतली नाही. त्यावेळीही मी आपल्याला म्हटले होते की, वाटल्यास आपण एकत्र बसून याबाबत चर्चा करू, यामध्ये काय आवश्यक आहे, काय नाही हे मी आपल्याला सांगतो. त्यानुसार नवीन विधेयक तयार करावे. अन्यथा कोठल्याही न्यायमूर्ती समोर हे विधेयक गेल्यावर तो 10 मिनिटामध्ये ते रद्द करील. पण विरोधकांनी सांगितले की, त्याची दखल घ्यायचीच नाही ही बेफिकीरी असल्याने आज सरकारवर ही परिस्थिती ओढवली आहे. तेव्हा आता सरकार या संबंधात आपली अब्रू कशी वाचविणार आहे ? त्याबाबत खुलासा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी करावा. त्याबाबत त्यांनी निवेदन केल्यास बरे होईल.

....... डीडी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आता सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितले होते त्याची दखल अगोदरच घेतली गेली पाहिजे होती. वास्तविक त्यांचा अनुभव, त्यांची सोनिया महाल, भ्रमंती याचा शासनाने विचार करायला पाहिजे होता. परंतु ....

श्री. दिवाकर रावते : सोनिया महाल हे काय प्रकरण आहे ?

श्री. नितीन गडकरी : सोनिया गांधींबाबत सन्माननीय सदस्य काय सांगत आहेत ?

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी आणि श्री.रावते यांच्यातील वाद आताच महाराष्ट्राने पाहिला आहे. असे असताना आता आमच्यामध्ये वाद ते कशासाठी लावत आहेत ? असो. सभापती महोदय, आज घराघरामध्ये डान्स बार संबंधात चर्चा होत आहे. एका विशिष्ट मानसिकतेने विधीमंडळाच्या या दोन्ही सभागृहांनी एकमताने हा ठराव आणि विधेयक पारित केले होते. महाराष्ट्रातील युवा पिढी बरबाद होऊ नये यासाठी या सभागृहामध्ये तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना आदी मार्गांनी बोलताना सर्वच सन्माननीय सदस्यांनी डान्स बारच्या विरोधात आपले विचार मांडले आहत. ज्या पद्धतीने युवा पिढी डान्स बारमध्ये जाऊन पैसे उडविते ....

( यानंतर श्री. सरफरे .... इइ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

ती वाया जाणारी पिढी वाचविण्याची गरज आहे, तशाप्रकारचे आपले स्टेटमेंट या सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब माझे याबाबतीत कायद्याचे अज्ञान असेल, परंतु या कायदेमंडळाने एकमताने ठराव संमत केला आणि त्यासंबंधीचा कायदा केला. असे असतांना उच्च न्यायालयाने त्या निर्णयाला विरोध केला, शासनाने घेतलेला निर्णय डावलला याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे. एका चांगल्या मानसिकेतून युवा पिढीला सामाजिकदृष्टया घडविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव आणला होता. आणि त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करण्यासंबंधीचा प्रस्ताव माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी मांडला होता. त्या प्रस्तावामधील तांत्रिक चुकांचा आधार घेऊन उच्च न्यायालयाने निर्णय घेतला. उच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय आमच्यापर्यंत आलेला नाही, त्याबाबतचे वृत्त वर्तमानपत्रामध्ये वाचले. उच्च न्यायालयाने घेतलेल्या या निर्णयाच्या विरुध्द आज महाराष्ट्रातील तमाम मध्यमवर्गीय जनता आपल्या बाजूने आहे. दोन्ही सभागृहानी एकमताने घेतलेल्या निर्णयाच्या बाजूने आहे. अशाप्रकारे ही सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी उभी असतांना या निर्णयाविरोधात सुप्रिम कोर्टामध्ये जाण्यासाठी आपल्याला आठ आठवडयांची मुदत दिलेली आहे. काही तांत्रिक चुकांमुळे हा निर्णय शासनाच्या विरोधात गेला असला तरी त्यामुळे अनेक सामान्य जनांचे संसार उध्वस्त होऊन तरुण पिढी वाममार्गाला लागण्याचे प्रकार पुन्हा सुरु होतील. आज बेकारीच्या संकटामध्ये सापडलेल्या तरुण पिढीला कसे वाचवायचे हा आपल्यापुढे प्रश्न आहे? याठिकाणी ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी केलेल्या सूचनांचा आधार कायदा तयार करण्यापूर्वी घेण्यात आला असता तर उच्च न्यायालयामध्ये कदाचित शासनाच्या बाजूने निकाल लागला असता. आणि म्हणून शासनाने या निर्णयाच्या विरोधामध्ये पुन्हा सुप्रिम कोर्टामध्ये जाऊन महाराष्ट्राच्या बाजूने निर्णय करावा.

सभापती महोदय, मी कायद्याच्या बाबतीत अज्ञानी असल्यामुळे एक गोष्ट विचारु इच्छितो की, विधीमंडळाच्या सार्वभौम असलेल्या दोन्ही सभागृहांनी एकमताने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना कोर्ट करु शकते काय? या निर्णयामुळे पार्लमेंटरी डेमॉक्रसी श्रेष्ठ की, ज्युडिशिअरी श्रेष्ठ असा संघर्ष सुरु झाला तर ते लोकशाहीला घातक आहे. या सभागृहामध्ये राज्यातील 10 कोटी जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी हे सार्वभौम सभागृह असल्यामुळे या सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना न्यायालय करु शकते काय? असा प्रश्न उपस्थित केला आहे. सभापती महोदय, कायद्याचे इंटरप्रिटेंशन हे न्यायालयामध्ये होते. यापूर्वी श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना कोर्टाने निर्णय दिला होता. त्या संदर्भात आपण एकमताने निर्णय घेतला असला तरी न्यायालयाने तो निर्णय मान्य केला पाहिजे असे म्हणता येणार नाही. माननीय सदस्यांनी या ठिकाणी मांडलेली भावना जरी चांगली असली तरी आणि न्यायालयाने दिलेला निर्णय हा दुर्दैवी असला तरी त्यामधील असलेल्या त्रुटी दूर करुन शासनाने सुप्रिम कोर्टामध्ये गेले पाहिजे अशी त्यांची भावना मी समजू शकतो. परंतु विधीमंडळाने घेतलेला निर्णय न्यायालय कसा फिरवू शकते अशाप्रकारे जर आपण आक्षेप घेतला तर तो न्यायालयाचा अधिक्षेप होईल. तेव्हा आपण त्यासंबंधी याठिकाणी प्रतिपादन करु नये. कारण तसे केल्यास त्यामधून वेगळया प्रकारचे प्रश्न निर्माण होतील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा विषय उपस्थित करण्यापूर्वी मी कायद्याच्या बाबतीत अज्ञानी आहे असे म्हटले आहे. त्यामुळे माझ्या वक्तव्यामुळे जर न्यायालयाचा अधिक्षेप होणार असेल तर मी माझे शब्द मागे घेतो किंवा आपण ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत. राज्यातील 10 कोटी जनतेच्या मनात असलेल्या भावना मी या ठिकाणी मांडीत आहे. तेव्हा आपण सुप्रिम कोर्टामध्ये जाऊन महाराष्ट्राच्या बाजूने निर्णय कसा लागेल यासाठी प्रयत्न करावेत.

........... 2 EE/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून या आघाडी सरकारचा चेहरा म्हणजे आबा. आबांच्या कोणत्याही संकल्पनेविषयी आमच्या मनामध्ये शंका नाही, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी आमच्या मनामध्ये शंका नाही. आबांनी एकदा निर्णय घेतल्यानंतर व कॅबिनेटमध्ये त्यासंबंधीचा निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयासंबंधी मनामध्ये कधीही शंका निर्माण होत नाही. याठिकाणी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंबंधी त्यांनी आत्मचिंतन करुन आपले निवेदन करावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, मुंबईमध्ये गावठी दारुच्या सेवनामुळे 80 माणसे मृत्युमुखी पडली त्यावेळी त्यांनी मोठया तडफेने सांगितले की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये यापुढे गावठी दारु दिसणार नाही. आणि जर ती दारु कुणी विकत असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल अशाप्रकारचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. परंतु आपण निर्धार व्यक्त केला तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आपले ऐकत नाही ही खरी परिस्थिती आहे. आज जागोजागी गावठी दारु उपलब्ध होत आहे. तेव्हा पुन्हा एकदा माणसे मरतील तेव्हा आपणास आपल्या निर्णयाची आठवण होईल. म्हणून आपल्या यंत्रणेमध्ये असलेल्या फटींचा आपण शोध घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे..... 14:50

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

गुटखा बंदीच्या संबंधातील टी.व्ही.वरुन जाहिरात देण्यात आली. अकोला येथे सन्माननीय मंत्री, श्री. अनिल देशमुखांचा फोटो लावून गुटखा बंदीची जाहिरात करण्यात आलेली होती. गुटखा बंदीमुळे चांगले काम झालेले आहे, असे लोकांना वाटले होत.` परंतु तो निर्णय देखील कोर्टामध्ये टिकला नाही. डान्सबार बंदीचेही तसेच झाले. कायदा करत असतांना विधी विभाग हे त्या तरतुदींची छाननी करत नाही काय ? कायदा विभागाला सरकारचा निर्धार कळत नाही काय ? कायदा असा बनविला गेला पाहिजे की] कोणी कोर्टात गेले तरी त्यांची बाजू टिकणार नाही. कायदा विभागामध्ये कायद्याचे ज्ञान नसलेले सचिव आपण कशाकरिता नेमता ? गुटखा बंदीच्याबाबतीत, डान्सबार बंदीच्याबाबतीत कायदा खात्याने बनविलेला ड्राफ्ट बरोबर नव्हता, असाच अर्थ होतो. समाजाच्या हितासाठी कायदा करत असतांना, त्या संबंधातील मार्गदर्शन हे कायदा विभागाने करावयाचे असते. परंतु तेथील अधिकाऱ्यांनी आपली दिशाभूल केलेली आहे. आता कायद्यामध्ये सुधारण्यासाठी चांगले वकील नेमण्याची आवश्यकता आहे. कायदा खात्याने चुकीचा सल्ला दिल्यामुळे सदनाचा परिणामी, सभापती महोदय, आपलाही सन्मान राहिलेला नाही. आपल्या कायदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर ताबडतोबीने कारवाई करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या प्रश्नासंबंधी मा.उपमुख्यमंत्री महोदय आज निवेदन करणार आहेत. जवळजवळ महाराष्ट्रातील जनतेची इच्छा होती, त्याप्रमाणे अंमलबजावणीपर्यन्त आपण आलेलो होतो. परंतु कोर्टाचा निकाल लागला. अशाप्रकारची अनेक उदाहरणे भारताच्या इतिहासामध्ये कमी नाहीत. त्या ठिकाणी कॉमेन्टस झालेल्या आहेत. नॅशनल लेवलवर, स्टेट लेव्हलवर, सेशन कोर्टामधील मुद्दे सांगितले. मी एकच उदाहरण सांगू इच्छितो की, ज्या वेळी घटना तयार झाली, त्यावेळेला मागासलेल्या लोकांना वर आणावयाचे असेल, तर त्याकरिता आश्वासन दिले पाहजे. यासाठी ड्राफ्ट रिपोर्ट हा स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केला आणि 14 वे कलम घटनेत समाविष्ट झाले. त्याप्रमाणे मद्रास राज्य सरकारनें मागासलेल्या लोकांसाठी राखीव जागा ठेवल्या. त्यानंतर कोणीतरी एक जण कोर्टामध्ये गेला तर घटना काय म्हणते तर धर्म जात, वंश,लिंग, जन्मस्थान आणि निवासस्थान या आधारावरुन भेदाभेद करणार नाही. याचा आधार त्यांनी घेतला आणि मद्रास सरकारचा निर्णय मद्रास हायकोर्टाने



SKK/ KGS/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु.....

रदबादल ठरविला, त्यावेळेस कामराज हे मुख्यमंत्री होते. त्यांनी ठरविले की, सुप्रीम कोर्टामध्ये देखील या लोकांना न्याय मिळणार नाही. सुप्रीम कोर्टाने घटनेचे कलमामध्ये जात, धर्म,वंश, लिंग, जन्मस्थान आणि निवासस्थान या आधारावरुन भेदाभेद करता येणार नाही. सुप्रीम कोर्टाचा देखील निर्णय झाला. त्यातून पहिली घटना दुरुस्ती झाली. पहिल्या घटना दुरुस्तीप्रमाणे जात, धर्म, वंश, लिंग,जन्मस्थान आणि निवासस्थान या आधारावरुन भेदाभेद करता येणार नाही. त्याच्या पुढे "मात्र मागासलेल्या वर्गाना विशेष राखीव जागा देण्याची तरतूद", असे वाक्य पुढे आलेले आहे. कायदा करण्यामध्ये आपली चूक झाली असेल. या संदर्भात कोणावर कारवाई करण्याबाबत मी बोलणार नाही. लोकेच्छा आहे. तेव्हा त्यामध्ये तांत्रिक चूक झाली असेल तर ती येथे दुरुस्ती केली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

आपण जर सुप्रीम कोर्टात गेलात तर सुप्रीम कोर्ट असे म्हणेल की यामध्ये ही चूक आहे. आपल्याला सुप्रीम कोर्टात जावयाचे असेल तर नक्की जाता येईल. हायकोर्टाच्या निर्णयाविरुध्द सुप्रीम कोर्टातच जाता येईल. या दोन गोष्टींचा विचार करुन महाराष्ट्राला याबाबतीत पुढे नेण्याची आवश्यकता आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डान्स बारबंदी विधेयकाच्या संदर्भात उच्च न्यायालयाने जे निकालपत्र दिलेले आहे त्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे या विधेयकामधील त्रुटी समोर आल्या असल्या तरी सर्रासपणे उच्च न्यायालयाने शासनाचा हा निर्णय चुकीचा होता आणि शासनाने हा निर्णय योग्य भूमिकेतून घेतलेला नव्हता असे म्हटलेले नाही. सभापती महोदय, दोन्ही सदनाची भावना आणि प्रत्यक्षातील कायदा याच्यातील जे अंतर आहे ते अंतर काल ज्यावेळी वाहिन्यांमधून बातमी जाहीर झाली त्यावेळी स्पष्ट झाले. यासंदर्भातील ज्या बातम्या वाहिन्यांवरुन दिल्या जात होत्या त्यामध्ये एक प्रकारचा छमछमाट तसेच फार मोठ्या विजयाची भावना डान्स बार गर्ल्सच्या माध्यमातून समोर आली. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जे मुद्दे मांडले ते समर्थनीय आहेत. प्रेरणा नावाची संस्था बालवेश्यांच्या बाबतीत काम करते. त्यांनी "सेव्ह दी चिड्रेन ऑफ इंडिया" हा पाहणी अहवाल फॅक्सवर माझ्याकडे पाठविलेला आहे. त्यानुसार 90 टक्के मुलींना त्या मायनर असतानाच डान्स बारमध्ये ढकलले जाते. रोजगार आणि स्त्रियांचा सन्मान तसेच जी कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत त्याचा विचार झाला पाहिजे. वरकरणी डान्सबार लॉबी प्रबळ झालेली दिसत असली तरी दोन्ही सदनाने एकमताने जो निर्णय घेतलेला आहे त्याचा सन्मान ठेवण्याच्या दृष्टीकोनातून पुढे काय ? याच विचार शासनाने केला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करीत असताना जे वेगवेगळे घटक आहेत त्या सगळ्या घटकांना विश्वासात घ्यावे. ज्या मायनर गर्ल्स आहेत त्यांना वेश्या बनवण्याचा जो प्रकार आहे तो थांबवावा. दुसरी बाब अशी की, ज्या स्त्रियांना यातून बाहेर पडावयाचे असेल आणि तशी एक जरी महिला असली तरी त्यांना काही ना काही रोजगार, निर्वाहाचे साधन उपलब्ध करुन दिले पाहिजे. या दोन भूमिका घेऊन जर आपण सर्वोच्च

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे ......

न्यायालयामध्ये गेलो तर आपल्या विधेयकाला निश्चितपणे आधार मिळू शकेल. "सेव्ह दी चिल्ड्रेन ऑफ इंडिया" हा जो अहवाल आहे तो मी आपल्या मार्फत सन्माननीय गृहमत्र्यांकडे सादर करते. सर्वोच्च न्यायालयामध्ये जात असताना त्याचा उपयोग आपल्याला करुन घेता आला तर जरुर करुन घ्यावा.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, ज्यावेळी डान्स बारबंदी आणली गेली त्यावेळी पूर्ण महाराष्ट्रामध्ये जे अनेक मोडत असलेले संसार होते त्या संसारातील सगळ्या भगिनी खूप समाधानी झाल्या होत्या. त्यांना आनंद झालेला होता. परंतु दुर्दैवाने काल उच्च न्यायालयाचा निकाल आला आणि त्या निकालामुळे त्या सर्व मोडत असलेल्या संसारामध्ये दहशत किंवा भीती निर्माण झ ाालेली आहे. डान्स बारबंदीमुळे त्यांना एक दिलासा मिळालेला होता. काल आम्ही वेगवेगळ्या चॅनेल्सवर पाहिले की, काही समाजविघातक लोक आनंद व्यक्त करीत होते. फटाके वाजवत होते. मिठाई वाटत होते. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. दोन्ही सदनाच्या सन्माननीय सदस्यांनी एकमताने निर्णय घेतला होता. खरोखर हा एक ऐतिहासिक निर्णय घेतला गेला होता. या निर्णयामुळे मोडत असलेले संसार वाचले होते. त्यामध्ये कोणत्या त्रुटी राहिल्या त्याबाबत योग्य प्रकारे अभ्यास करुन कायदेतज्ज्ञांच्या मदतीने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सुप्रीम कोर्टामध्ये आव्हान देऊन डान्स बारबंदी झालीच पाहिजे. डान्स बारमध्ये काम करणाऱ्या ज्या भगिनी आहेत त्यांचे आपण योग्य प्रकारे पुनर्वसन करु शकतो हे आपण पटवून दिले तर सुप्रीम कोर्टामध्ये आपल्याला नक्की विजय प्राप्त होऊ शकतो असे मला वाटते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी डान्सबार बंदीचा जो धाडसी निर्णय घेतला त्याचे कौतुक सा-या महाराष्ट्राने केले. या सभागृहाने देखील एकमताने हा कायदा पास केला. त्यावेळी मी त्यांना आर.आर.आबा असे म्हणालो होतो. यामध्ये दोन गोष्टी आहेत. सुप्रीम कोर्टात जाण्याने हा प्रश्न सुटेल असे नाही. दुसरे असे की, माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी सांगितल्या प्रमाणे जी कोणी महिला यातून बाहेर पडण्याचे धाडस करील तिला रोजगार द्यावा. प्रत्यक्षात रोजगाराच्या माध्यमातून तिला मिळणा-या उत्पन्नाचा विचार केला तर त्या महिला तिकडे सरकणार नाहीत. कायद्यातील त्रुटी कोर्टाने पुढे आणलेल्या आहेत. माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी पाहिल्यांदाच सांगितलेले होते की, डिस्क्रिमिनेशनमुळे हा कायदा टिकणार नाही. या कायद्यामध्ये डिस्क्रिमिनेशन आहे. तेव्हा माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना एकच विनंती आहे की, त्यांच्या नावात आर.आर.आहे. आर.आर.म्हणजे रिव्हॉल्यूशनरी रिफॉर्मर. माननीय उपमुख्यमंत्री हे रिव्हॉल्यूशनरी रिफॉर्म करु इच्छित आहेत, ती करीत असताना आपण कोठे तोंडघशी पडणार नाही ना याची काळजी घेतली पाहिजे. या कायद्यातील त्रुटी दूर करुन आपण सुप्रीम कोर्टात जावे एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मुंबई उच्च न्यायालयाने काल दिनांक 12 एप्रिल 2006 रोजी खुलासेवार निकालपत्र दिलेले आहे. दोन्ही सभागृहांनी एकमताने पारित केलेली मुंबई पोलीस अधिनियमातील दुरुस्ती उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविली आहे. महिला व मुलींच्या शोषणास प्रतिबंद आणणारा, महिलांची प्रतिष्ठा उंचावणारा व समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन शासनाने केलेला कायदा अवैध ठरविला गेलेला आहे. निकालपत्र सुमारे 257 पानांचे असून त्यामध्ये ब-याच गुंतागुंतीच्या कायद्याच्या मुद्यांचा उहापोह केलेला आहे. त्याचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय कोणतीही प्रक्रिया व्यक्त करणे योग्य ठरणार नाही. तथापि, याबाबतीत काही ठळक मुद्दे जे माझ्या निदर्शनास आणून दिलेले आहेत ते थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत .

सभापती महोदय, राज्य सरकारच्या कायदा करण्याच्या अधिकारावर जे आक्षेप घेण्यात आले होते त्यातील काही फायडिंग्ज न्यायालयाकडून अशा प्रकारे व्यक्त झालेले आहेत.

1) अशा प्रकारचा कायदा करण्याचा राज्य शासनाला पूर्ण अधिकार आहे आणि असा कायदा केन्द्र शासनाने केलेल्या यापूर्वीच्या कोणत्याही कायद्याशी विसंगत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

2) हा कायदा खाद्यगृहांनाही लागू होतो हे सरकारचे म्हणणे बरोबर आहे.

3) या कायद्याने संविधानाचे कलम 15 ला बाधा येत नाही.

4) या कायद्याने संविधानाने दिलेल्या भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा येत नाही.

5) या कायद्याने बारमालक व बारबाला यांच्या संविधानाच्या कलम 21 खालील अधिकारांनाही बाधा येत नाही. कारण बारमालक नृत्याशिवाय त्यांचा व्यवसाय चालू ठेवू शकतात. तसेच बारबाला इतरत्र नृत्य करु शकतात.

6) तीन तारांकित व त्यावरील हॉटेल व इतर हॉटेल्स यांचे केलेले वर्गीकरण हे कायद्याच्या हेतूशी सुसंगत नाही आणि म्हणून हा कायदा रद्‌बातल ठरविण्यात आला.

7) स्त्रिया जर बंदी असणा-या आस्थापनामधून वेटर व तत्सम प्रकारची कामे करु शकतात तर अशा आस्थापनामध्ये स्त्रियांनी केवळ नृत्य करु नये अशी बंदी आणणे कायदेशीर होणार नाही.

मुख्यत्वेकरुन शेवटच्या दोन मुद्यांत न्यायालयाने शासनाने केलेला कायदा रद्‌बातल ठरविला आहे.

न्यायालयाच्या या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासंबंधात कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सध्या अशा सर्व आस्थापनांचे परवाने संपलेले असल्याने राज्यात डान्सबार ताबडतोब सुरु होऊ शकणार नाहीत. तथापि, उच्च न्यायालयाने आपल्या निकालाची अंमलबजावणी आठ आठवडयानंतर करण्याची मुभा शासनास दिलेली आहे.

सभापती महोदय, मी अंत:करणापासून सर्व राजकीय पक्ष आणि सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा अत्यंत आभारी आहे. अलिकडच्या कित्येक वर्षात जे निर्णय एकमताने घेण्यात आलेले आहेत त्यामध्ये हा डान्सबारशी संबंधित असलेला निर्णय एकमताने घेतलेला होता.

...यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ D/ पूर्वी श्री.शिगम 15:05

श्री. आर.आर.पाटील ...

सभापती महोदय, हा निर्णय घेण्यामागे अनेक कारणे होती. बारमालक इतके पुंड झाले होते व त्यांची केवळ ढाल केली जात होती. कायदा आणि सगळी सिस्टीम आपल्यासाठी आहे अशा पध्दतीने ही मंडळी वावरत होती. माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, किती बारवर अद्यापपर्यंत गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत ? मी ही गोष्ट कबूल करीन की, सगळी यंत्रणा धुतलेल्या तांदळासारखी नाही. अनेक ठिकाणी चुका होऊन सुध्दा गुन्हयांची नोंद होत नव्हती हे उघड सत्य आहे. कोणत्या बारपासून किती हप्ता पोलीस अधिकाऱ्याला मिळत होता हे माहीत आहे आणि हे असेच चालू होते. अशा विशिष्ट भागामध्ये पोलीस अधिकारी बदलीसाठी धडपडत होते. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन बारबंद करण्याचा निर्णय घेतला होता. बेकायदेशीर कृत्याच्या बाबतीत अनेक नोंदी घेतल्या जात नव्हत्या. परंतु नोंद केलेल्या गुन्हयांची संख्या पाहिली तर गेल्या पाच वर्षात 23191 गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे. 23191 मध्ये 307 बार असतील. एका बारमालकाने पुन्हा पुन्हा गुन्हा केला त्याची नोंद करण्यात आली आहे. मुंबई पोलीस अधिनियम 33 अनुसार नेमून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ बार चालू ठेवले,असभ्य वर्तणुक केली म्हणून 20193 गुन्हे दाखल केले आहेत. आयपीसी कलम 294 अन्वये बीभत्स नृत्य केले म्हणून 222 गुन्हे दाखल केलेले आहेत. गुन्हा 23191 गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे. माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर साहेबांनी काही सूचना केल्या होत्या आणि त्यांना ज्या शंका वाटत होत्या त्या त्यांनी कायदा करीत असताना सुध्दा व्यक्त केल्या होत्या. पूर्णपणे विचार करुन तसेच कायदेतज्ज्ञांशी सल्लामसलत करुन आणि ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊन कायदा करण्यात आला होता. विधि व न्याय विभागाला आणि काही माजी न्यायमूर्तींना देखील विचारण्यात आले होते. जास्तीत जास्त कायदेशीर मार्गदर्शन घेऊनच हा कायदा विधानसभेसमोर आणला होता. काही फाईव्ह स्टार हॉटेलना वेगळी वागणूक दिली असे सांगण्यात आले. फाईव्ह स्टार हॉटेल्स हा छोटासा पार्ट आहे. बारमध्ये दररोज डान्स परफॉर्म केले जातात. ताज हॉटेलला 3 फ्लोअरचा परवाना देण्यात आला आहे. एक फ्लोअर त्यांनी जास्तीत जास्त 20 दिवस डान्स परफॉर्मसाठी वापरला आहे. 95 टक्के त्यांनी कुठलाही डान्स परफॉर्म केलेला नाही. हॉटेल प्रेसीडेंट,कुलाबा यांना 2 फ्लोअरसाठी परवाना देण्यात आला आहे. त्यांनी सुध्दा 20 दिवस याचा वापर केला. एअरपोर्ट प्लाझा,विलेपार्ले यांनी केवळ 8 दिवस डान्स परफॉर्म केलेला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील

ली मेरीडियन् या हॉटेलने 87 दिवस परवान्याचा वापर केला आहे. बाबा इंटरनॅशनल यांनी मात्र 365 दिवस परवाना वापरला आहे. फाईव्ह स्टार हॉटेलने जे परवाने वापरले ते परदेशाी पाहुणे आल्यावर किंवा अशा स्वरुपाच्या वेळी वापरले आहेत. त्यांच्याबाबतीत कोणत्याही गुन्हयाची नोंद झालेली नव्हती. ग्रेडेशन मान्य करुन फॅसिलीटीमध्ये सुध्दा फरक केला जात होता. यासंदर्भात पुन्हा एकदा तज्ज्ञांचे मार्गदर्शन धेतले जाईल आणि लवकरच सुप्रीम कोर्टामध्ये जाण्याची भूमिका शासनाकडून घेतली जाईल. काही चांगल्या वकीलांनी ही केस स्वीकारली आहे. महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेने या कायद्याच्या बाबतीत अतिशय चांगली भावना व्यक्त केली होती. ही एक महत्वाची गरज बनली होती. मी याबाबतीमधील आकडेवारी नंतर सांगेन. परंतु मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील अपघातांचे प्रमाण कित्येक पटींनी कमी झालेले आहे तसेच मृत्यूच्या प्रमाणात सुध्दा घट झालेली आहे. त्याचप्रमाणे ज्या बिल्डींगमध्ये हे बार आहेत त्या बिल्डींगमधील लोक सुखाने झोपत आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ..........

अडचणी खूप आणल्या गेल्या तरी देखील आपण त्यातून या निर्णयापर्यंत आलो. तसेच आता कोर्टाने निर्णय दिलेला असून अजून दोन महिन्यांची मुभा दिलेली आहे व दोन महिने तरी बार सुरु राहणार नाहीत. पुन्हा या बार मालकांना शासनाकडून लायसेन्स घ्यावे लागणार आहेत. आपण यासंदर्भात सुप्रिम कोर्टात जाणार आहोत आणि वेळ पडल्यास आणखी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन काही दुरुस्ती करण्याची गरज पडली तरी ती करण्याची भूमिका शासनाकडून स्वीकारली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी दुसरा एक प्रश्न उपस्थित केला की, मुंबई बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल अजून लागत नाही. तसेच आतापर्यंत यावर किती खर्च झालेला आहे. या खटल्यावर आतापर्यंत किती खर्च झाला ही माहिती माझ्याकडे सध्या नसल्यामुळे मी ती माहिती पटलावर ठेवीन. तसेच खटल्याचा निकाल लागण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत याची देखील माहिती घेण्यात येईल व ही संवेदनशील बाब असल्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी सदनाला याबाबतचा खुलासा मी करणार आहे. शेवटी आपण राजकीय जीवनात काम करीत असतांना समाजहिताला प्राधान्य देणे हे सर्वच राजकीच पक्षांचे कर्तव्य असते व तशा प्रकारचे चोख कर्तव्य आपण सर्वांनी बजावलेले आहे त्याबद्दल मी आपणा सर्वांना धन्यवाद देतो. या खटल्याच्या संदर्भात तसेच डान्स बार हा कायदा करण्याच्या संदर्भात आपण सर्वांनी चांगली भूमिका घेतली त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. यामध्ये आता काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करण्याचाही शासनामार्फत प्रयत्न करण्यात येईल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत उत्तीण होण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील मुलांना प्रोत्साहन देण्याबाबत.

**मु.शी.**: राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत उत्तीण होण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील मुलांना प्रोत्साहन देण्याबाबत श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

महोदय, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाकडे व त्यांचे कौतूक करण्यासाठी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या अनुषंगाने मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

महोदय, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये राज्यातील एकूण 45157 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता व त्यापैकी पुढील परीक्षेसाठी फक्त 374 मुले व 126 मुलीं एवढयाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली, म्हणजेच फक्त 1 टक्का ही संख्या आहे. या परीक्षेचा निकाल शेकडा एक टक्का येतो व पुढची परीक्षा सी.बी.एस.सी. च्या अभ्यासक्रमाच्या दर्जाची असते आणि हा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमापेक्षा अधिक कठीण असून या अभ्यासक्रमाचा स्कोप देखील आपल्यापेक्षा जास्त आहे म्हणून यामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मला शासनाला काही सूचना करावयाच्या आहेत. त्यातील पहिली सूचना अशी आहे की, एन.टी.एस.ई. ही परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र शासनातर्फे चांगले कौतूक झाले पाहिजे, त्यांना अधिक आर्थिक मदत केली पाहिजे. जी 500 मुले पहिल्या परीक्षेत पास झालेली आहेत त्यांना शासनाकडून रोख अनुदान मिळाले पाहिजे त्यामुळे या परीक्षेमध्ये पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पास झालेल्या मुलांमधील पहिल्या 100 विद्यार्थ्यांना विशेष अनुदान मिळावे आणि माझी अपेक्षा अशी आहे की, एन.टी.एस.ई. परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पुढील काळात वाढले तर त्यातून

......3

श्री. श्रीकांत जोशी ......

एक वेगळाच इन्सीटन्स आपल्या राज्यात होईल. या परीक्षेसाठी आपल्या राज्यातील उस्मानाबाद जिल्हयातून 2 मुले, परभणीमधून दोन मुले, जालना व हिंगोली जिल्हयातून एकही विद्यार्थी या परीक्षेत पास झालेला नाही म्हणून ज्या जिल्हयातून एकही विद्यार्थी पास झाला नसेल अशा जिल्हयांची संख्या लक्षात घेऊन आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांचे एक्सलन्स नॅशनल लेव्हलपर्यंत कसे जाईल याबाबत शासनाने प्रकर्षाने विचार करावा.

---------------

.............4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: इंदिरा गांधी माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांना सवलतींपासून वंचित ठेवणे.

**मु.शी.**: इंदिरा गांधी माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांना सवलतींपासून वंचित ठेवणे याबाबत माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

महोदय, इंदिरा गांधी माध्यमिक आश्रम शाळा, सुर्ला ता. वरोरा, जि. चंद्रपूर या शाळेतील विद्यार्थ्यांना जेवण, निवास व इतर शासनाकडून मिळणाऱ्या दैनंदिन सोईपासून वंचित ठेवले जात आहे. शिक्षक-कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या सुखऱ्सोईबाबतच्या अनियमिततेसंबंधी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, जि. चंद्रपूरचे प्रतिनिधींनी दि. 23 फेब्रुवारी रोजी प्रकल्प अधिकारी, चिमूर यांच्याशी केलेल्या चर्चेतील एकही समस्या प्रकल्प अधिकाऱ्यांना आजपर्यंत निकाली काढली नाही. समस्या पुढीलप्रमाणे आहेत. त्यात जुलै, 1999 ते जुलै, 2002 पर्यंतचे कर्मचाऱ्यांचे वेतन रोखीने दिल्याचे दाखविले परंतु प्रत्यक्षात संस्था चालकाने दिले नाही. दिनांक 17 जून, 2005 च्या आदेशाने पुनर्रमान्यता मिळालेल्या या शाळेतील शिक्षक-कर्मचा-यांना अदा केलेले जून व जुलै 2005 चे वेतन वसूल केले जात आहे. शाळेला अनेक वर्षांपासून मुख्याध्यापक नाही. शिक्षण सेवकाची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक केली. अनेक सेवेत कायम झालेल्या शिक्षकांना सेवेतून बडतर्फ/निलंबित केले. पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापही दिल्या गेली नाही. दर महिन्याला वेतनातून अर्धी रक्कम वसूल केली जात आहे. कर्मचाऱ्यांनी दिनांक 17.2.2006 किंवा त्यादरम्यान माननीय आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन पाठवून संस्थाचालकांनी केलेली अनियमितता कळविली. मात्र विभागाने कोणतीच दखल घेतली नाही. यास्तव संस्थेतील अनियमितता दूर करुन या संस्थेवर प्रशासक नेमण्याची संघटनेने मागणी केली. याबाबत शासनाने न्याय द्यावा याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कार्बाईड आंबा विकून ग्राहकांची करण्यात येत असलेली फसवणूक.

**मु.शी.**: कार्बाईड आंबा विकून ग्राहकांची करण्यात येत असलेली फसवणूक याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेद्वारे निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

हापूस, पायरी, रायवळ व तोतापुरी अशा आंब्याच्या मुख्य जाती असून काबाईड आंबा बाजारात आल्याचा दिनांक 9.4.2006 रोजी आढळून आला आहे. हा आंबा झाडावरून कच्चा काढून त्यावर कॅल्शियम कार्बाईड पावडर टाकून तो पिवळा केला जातो. इतकेच नव्हे तर सुमारे 300 ते 400 रुपये डझनाने हा आंबा विकून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. फळे पिकविण्याची केमिकल पावडर स्वस्त मिळत असल्याने व्यापारी ग्राहकांची सहजरित्या फसवणूक करीत आहेत. बाहेरून पिवळाधमक दिसणारा हापूस आंबा आत मात्र एकदम खराब असल्याचे बऱ्याचदा आढळून आले आहे. सध्या वाशी मार्केटच्या बाहेर या कॅल्शियम कार्बाईडच्या पावडरच्या पुडया सर्रास विकल्या जात आहेत. परिणामी हे आंबे खाणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि तातडीच्या अशा मुद्दावर विशेष उल्लेख देत आहे.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रायगड जिल्हयात खोपोली शहर येथे थोर साहित्यिक व समाजसेवक श्री.र.वा.दिघे यांचे स्मारक उभारण्याबाबत.

**मु.शी.**: रायगड जिल्हयात खोपोली शहर येथे थोर साहित्यिक व समाजसेवक श्री.र.वा.दिघे यांचे स्मारक उभारण्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** :माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

रायगड जिल्हयात राजकारण, समाजकारण, संगीत, कला व साहित्य या साऱ्याच क्षेत्रात रायगडच्या नावाची पताका अभिमानाने फडकताना दिसते.

रायगड जिल्हयातील खोपोली येथे वास्तव्यात असलेले साहित्यिक, कवी, समाजसेवक र.वा.दिघे यांच्या नावाची स्मृती रहावी अशी एकही बाब खोपोलीमध्ये दिसून येत नाही. फक्त र.वा.दिघे वाचनालय हा दोन बाय दोन आकाराचा एका ठिकाणी लावलेला व धूळ खात पडलेला बोर्ड दिसून येत आहे. गेल्याच आठवडयात र.वा.दिघे यांची 111 वी जयंती साजरी झाली. र.वा.दिघे यांच्या 'पाणकळा', 'सराई', 'कार्तिकी', 'पडरे पाण्या', 'आई आहे रानात' या कथा आणि कादंबऱ्या वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहात नाहीत. साहित्य निर्माण करण्यासाठी र.वा.दिघे यांनी आदिवासी पाडयांवर पायपीट केली, ते लोकांमध्ये फिरले, ते शेतकरी होते. त्यामुळे त्यांचा आदर्श शेतकरी म्हणून गौरवही झाला होता.

साहित्यिक क्षेत्रात उत्तम कामगिरी केलेल्या र.वा.दिघे यांचे रायगड जिल्हयातील खोपोली शहरात चिरंतन स्मारक उभारावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराजवळील टपऱ्यांमधील विक्रत्यांकडून भाविकांना होत असलेली धक्काबुक्की व मारहाण.

**मु.शी.**: मुंबईतील प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराजवळील टपऱ्यांमधील विक्रत्यांकडून भाविकांना होत असलेली धक्काबुक्की व मारहाण याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थनिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मुंबईतील प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिरात रोज शहरातून व बाहेरून असंख्य भाविक दर्शनाकरिता येतात. मंदिराच्या बाहेर अनेक टपऱ्यांमधून (स्टॉल) पेढे, हार, फोटो, मूर्ती इत्यादी विक्रीकरिता ठेवण्यात येतात. या टपऱ्यांमध्ये विक्रीकरिता असणाऱ्या चढाओढीमुळे, सिद्धिविनायकाच्या दर्शनाकरिता येणाऱ्या भाविकांना या टपऱ्यांमधील विक्रेत्यांनी अतिशय गलिच्छ व अश्लीलपणे विशेषत: स्त्रियांना हार विक्रेत्यांनी हाताला धरून जबरदस्तीने आपल्या दुकानाकडे खेचणे, भाविकांनी या प्रकाराला हरकत घेतली असता हारवाले व त्यांच्या प्रतिनिधींनी धक्काबुक्की तसेच मारहाण करणे, यामुळे करोडो भाविकांना मन:स्ताप होत असून जवळच पोलीस चौकी असूनही या चौकीमधील व प्रत्यक्ष जागेवरील बंदोबस्ताकरिता असणाऱ्या पोलिसांनी भाविकांना संरक्षण देण्याऐवजी अर्थपूर्ण बघ्याची भूमिका घेतल्यामुळे या सर्व भाविकांच्या होणाऱ्या छळवणूकीवर व गैरप्रकारावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, काल मी स्वत: एक प्रकार पाहिला. भाविकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सिद्धिविनायक मंदिराचा परिसर कन्जस्टेड झाला आहे. एखाद्या महिले बरोबर तिचा पती, भाऊ किंवा वडील असतील तर त्यांच्या देखत हारविक्रेत महिलेचा हात धरतात.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

त्यांच्या पतीने किंवा वडिलांनी जर त्या हार विक्रेत्यांना, हात कशाला धरता ? असा प्रश्न केला तर, ते हार विक्रेते "हाथ ही तो लगाया है, और कुछ तो किया नही " अशा प्रकारचे बेशरमीचे उत्तर दिले जाते. मागे हा विषय मी जेव्हा उपस्थित केला होता त्यावेळी, आपण "या विषयाची गांभीर्याने नोंद घ्यावी" असे शासनाला निदेश दिले होते. परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. महोदय, या मंदिराच्या परिसरात 40-50 पोलिसांची सिक्युरिटी असते, शिवाय त्या ठिकाणी पोलीस चौकी सुध्दा आहे. परंतु त्यांचा काहीएक उपयोग होत नाही. त्यामुळे माझी या विशेष उल्लेख सूचनेच्या अनुषंगाने अशी मागणी आहे की, त्या हार विक्रेत्यांना हार विकण्यासाठी त्यांच्या दुकानाच्या बाहेर येण्याची परवानगी देता कामा नये. भाविक वाटेल त्या दुकानातून हार विकत घेईल. आज हार विक्रेत्यांकडून जो काही प्रकार होत आहे तो अतिशय गलिच्छ आहे. वास्तविक पाहता मंदिराची प्रसिध्दी असल्यामुळे, भाविकांची श्रध्दा असल्यामुळे, भाविक लांब अंतरावरुन चालत-चालत मंदिरात येतात. परंतु जर त्यांना हार घेण्यासाठी हार विक्रेत्यांकडून जबरदस्ती केली जात असेल तर, मंदिरातच जावयास नको अशी भावना त्यांच्यामध्ये निर्माण होईल. त्यामुळे या विषयाबाबत शासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी विनंती करीत आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 15:20

**पृ.शी.**: ब्रिज खेळामध्ये सुवर्ण पदक मिळविलेल्या खेळाडूंचा गौरव करणेबाबत.

**मु.शी.**: ब्रिज खेळामध्ये सुवर्ण पदक मिळविलेल्या खेळाडूंचा गौरव करणे याबाबत माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा नुकत्याच ऑस्ट्रेलियामध्ये पार पडल्या आणि भारताला त्यात अनेक सुवर्ण पदके, रौप्य पदके आणि कांस्य पदके मिळाली आहेत. भारताने या स्पर्धांमध्ये दैदिप्यमान यश मिळविले आहे. कु.तेजस्विनी सावंत या कोल्हापूरच्या महाराष्ट्रीयन कन्येने नेमबाजी स्पर्धेत सुवर्ण पदके मिळविली आहेत. ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. शासनाने तिचा यथोचित गौरव केला आहे आणि तो अत्यावश्यकही आहे.

या विशेष उल्लेखाच्या सुचनेद्वारे मी मुंबईच्या एका ब्रिज संघाने या स्पर्धांमध्ये मिळविलेल्या सुवर्ण पदकाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. "तोलानी शिपिंगने" पुरस्कृत केलेल्या ब्रिज संघात सर्वश्री राम अवतार, आगरवाल, गोपीनाथ मन्ना, फिन्टन लुईस, अनल शाह, अजित चक्रदेव, आर्ची सिक्लेश हे खेळाडू असून त्यांनी ब्रिजचे सुवर्ण पदक जिंकलेले आहे. ब्रिज फेडरेशन ऑफ इंडियाने पाठविलेली ही भारताची अधिकृत टीम आहे. राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा घेऊन या टीमची निवड करण्यात आली. ब्रिज या खेळामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत विविध स्पर्धांमध्ये अनेक वर्षे भाग घेत होता. परंतु हे पहिलेच सुवर्ण पदक भारताच्या संघाने या खेळात जिंकले आहे. हे सर्व खेळाडू पुणे-मुंबईचे असून, ही टीम मुंबईचीच आहे. तरी महाराष्ट्र शासनाला मी विनंती करते की, या संघाचेही यथोचित कौतुक करुन, त्यांचा गौरव करण्यात यावा.

------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.  सभागृहाची बैठक दुपारी 3.45 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 3 वाजून 23 मिनिटांपासून,
3 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

----------

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आज नियम 260 अन्वये कोकणातील निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा ठेवलेली आहे. आम्ही या संदर्भात माननीय सभापतींच्या चेंबरमध्ये बसलो होतो. सभापती महोदया, काल मुंबईच्या निरनिराळ्या प्रश्नांवर प्रस्तावाच्या रुपाने चर्चा सुरु होती आणि त्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित होते. त्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनीच हजर राहून त्या संदर्भात उत्तर द्यावे, असे ठरले होते. मुंबईशी संबंधित प्रस्तावावर साडे तीन तास चर्चा सुरु असताना माननीय मुख्यमंत्री पूर्णवेळ हजर होते. सभापती महोदया, गेल्या चार वर्षांत पहिल्यांदा या सदनात कोकणातील अनेक प्रश्नांविषयी चर्चा आलेली आहे. आतापर्यंत सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाकडून अशाप्रकारे कधीही कोकणाच्या निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा आली नाही. आता मला सांगण्यात आले की, खालील सभागृहाचे कामकाज संपलेले आहे, सभागृह स्थगित झाले आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये कोकणाच्या निरनिराळ्या प्रश्नांवर उत्तर देण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री उपलब्ध नाहीत. त्यामुळे हे गंभीर आहे. या प्रश्नावर सांगोपांग चर्चा व्हावी अशी आमची इच्छा आहे. सभापती महोदया, आता या चर्चेस कशा पध्दतीने सुरुवात करावी, याबाबत आपणच आम्हाला मार्गदर्शन करावे, अशी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. हे नक्की आहे की, काम निघाल्यामुळे माननीय मुख्यमंत्री दिल्लीला गेलेले आहेत. आता सदनात उपस्थित असलेले मंत्री या कोकणच्या प्रश्नांवर नक्कीच प्रामाणिकपणे उत्तरे देतील यात शंका नाही. सभापती महोदया, राजकारण बाजूला सारुन आम्ही कोकणच्या विषयासंबंधी काही जेन्युईन सूचना करु इच्छितो. या ठिकाणी कॅबिनेट मंत्री आहेत, पर्यटन राज्यमंत्री आहेत. या प्रश्नांना उत्तर देण्याची त्यांच्यात क्षमता आहे,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

हे आम्हाला मान्य आहे. परंतु सभापती महोदया, कोकणातील या विषयांचा अनेक पॉलिसींशी संबंध आहे. धोरणाशी संबंधित असलेले असे अनेक महत्वाचे विषय आम्हाला मांडावयाचे आहेत. त्यामुळे अशावेळी माननीय मुख्यमंत्री असतील तर या चर्चेला न्याय मिळेल. खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी देखील अनेक मुद्दे दिले आहेत. सभापती महोदया, येथे चर्चा होऊ शकते. आम्हाला या सभागृहात संधी मिळते. आपले मंत्री कार्यक्षम आहेत, ते उत्तर देण्यास सक्षम आहेत यात वाद नाही. परंतु तरी, माननीय मुख्यमंत्र्यांच्या सोयीने ही चर्चा घेतली तर कोकणाला खरा न्याय मिळेल असे मला वाटते.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अतिशय विस्तृत अशा विषयावर प्रस्ताव दिलेला आहे. जवळजवळ सर्वच माननीय मंत्र्यांचा या विषयाशी संबंध आहे. सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांकडून एकत्रित उत्तर येणे हेच उचित होईल. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सूचना केली की, माननीय मुख्यमंत्री व सर्व खात्याचे माननीय मंत्री उपस्थित असताना कोकणाच्या प्रश्नांसंबंधीची चर्चा घेण्यात यावी. सभापती महोदया, मी त्यांच्या मताशी सहमत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी व श्री. विनोद तावडे कोकणच्या प्रस्तावासंबंधी काही भावना व्यक्त केल्या. त्याचबरोबर माननीय मंत्रिमहोदय श्री. गणेश नाईक यांनी देखील या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. त्याप्रमाणे या चर्चेच्या वेळेस या सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित असण्याची आवश्यकता आहे, हे मी समजू शकते.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ D/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 15:50
तालिका सभापती ...

संपूर्ण सभागृहाच्या भावना विचारात घेऊन 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, तो पुढे ढकलावा काय याबाबत विचार करणे आवश्यक आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीने दिनांक 21 एप्रिल, 2006 पर्यंत कामकाज निश्चित केलेले आहे, त्यामध्ये पुढील आठवडयात अंतिम आठवडा प्रस्ताव विराधी पक्षातर्फे येणार आहे. म्हणून हा प्रस्ताव सोमवारी घ्यावा काय याबाबत आपण निर्णय घ्यावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, हा प्रस्ताव पुढे ढकलण्यास आमची तयारी आहे. आम्ही कोकणातील माणसे आहोत आम्हाला अतिरिक्त काम करण्याची सवय आहे, आम्ही रात्री उशीरापर्यंत किंवा सकाळी लवकर सुध्दा कामकाज करण्यास तयार आहोत.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या भावना माननीय सभापती यांच्या कानावर घालण्यासाठी मला थोडा वेळ लागणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, मुंबईच्या प्रश्नांवर चर्चा झाली तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चर्चेला उत्तर द्यावे असा आम्ही आग्रह धरला होता. म्हणून माननीय मुख्यमंत्री ज्या दिवशी उपस्थित असतील त्या दिवशीच हा प्रस्ताव आणावा असे आमचे ठरले होते. पुढील आठवडयामध्ये अनेक बिलांवर चर्चा होणार आहे, गोंधळात आम्ही विधेयके पास होऊ देणार नाहीत, विधानपरिषदेचे मत सुध्दा विधेयकाच्या अनुषंगाने नोंदविले गेले पाहिजे. पुढील आठवडयात विरोधी पक्षातर्फे अंतिम आठवडा प्रस्ताव येणार आहे, त्यावर सुध्दा चर्चा होणार आहे. कोणत्याही परिस्थितीत अंतिम आठवडा प्रस्तावास बाधा यावयास नको, तो आमचा अधिकार आहे. आज हा प्रस्ताव दाखविला आहे, त्यावर आज चर्चा करण्यास काही हरकत नसावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, हा अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे कोकणाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे निर्णय यामध्ये घ्यावयाचे आहेत.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या भावना मी सभापतींच्या कानावर घालते, त्यासाठी दोन-तीन मिनिटे लागतील, तोपर्यंत या प्रस्तावावर आपण बोलावे.

.....2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधी पक्षाचा अधिकार असल्यामुळे त्याला बाधा आणता कामा नये असे सांगितले आहे, माननीय मुख्यमंत्री जेव्हा उपलब्ध असतील तेव्हाच कोकणावरील प्रस्ताव घ्यावा तरच त्याला न्याय मिळेल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, मुंबईच्या प्रश्नाच्या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे, सभागृहामध्ये कोकणाच्या प्रस्तावावर चर्चा होईल तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात असावयास पाहिजे, कारण यामध्ये अनेक पॉलिसी निर्णय घ्यावयाचे आहेत, ते निर्णय माननीय मुख्यमंत्री महोदयच घेऊ शकणार आहेत, कोकणासाठी वैधानिक विकास महामंडळ स्थापण्याबाबतचा निर्णय दोन्ही सभागृहांनी 23 मार्च,1989 रोजी घेतलेला आहे, आज त्याला 16 वर्षे होऊन गेलेली आहेत. त्यासंदर्भातील पाठपुरावा करण्यात आलेला नाही. नागपूर येथील अधिवेशनामध्ये याबाबत ठराव झालेला आहे. कोकणातील मुलभूत प्रश्नांच्या संदर्भात सभागृहात विचार होणे आवश्यक आहे, त्यासाठी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असतील तेव्हाच त्यावर चर्चा घ्यावी, सोमवारी किंवा मंगळवारी सकाळी 10.00 वाजता चर्चा घेण्यास हरकत नाही.

**तालिका सभापती** : हा प्रस्ताव चर्चेला घेतांना माननीय मुख्यमंत्री उपलब्ध आहेत किंवा नाही याबाबत विचार करावा लागणार आहे. आता आपण अर्धा तास चर्चा सुरु करु, तोपर्यंत या प्रस्तावा संदर्भातील निर्णय आपणाला देण्यात येईल. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते सुध्दा उपस्थित दिसत नाहीत.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, अर्धा-तास चर्चा घेण्यास आम्ही तयार आहोत, अर्धा तास चर्चा कृपया पुढे ढकलू नये, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहावयास पाहिजे, आम्ही येथे वेठबिगारासारखे बसावे काय ?

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे नियम 260 अन्वये कोकणच्या विषयावरील होणारी महत्वाची चर्चा नंतर घ्यावी असे आम्हाला वाटते.

**तालिका सभापती** : या संदर्भात माननीय सभापतींसमवेत चर्चा करण्यासाठी दोन मिनिटांची आवश्यकता आहे. त्यामुळे मी आता सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.55 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----------------

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी.**

**तालिका सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, आज नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेसाठी आहे तो पुढे ढकलण्यात आला आहे. मात्र हा प्रस्ताव कोणत्या दिवशी आणि कोणत्या वेळी घ्यावयाचा हे अजून ठरविण्यात आलेले नाही. सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रस्तावासाठीचा दिवस आणि वेळ ठरविली जाईल. आता या नंतर अर्धा तास चर्चा घेण्यात येतील.

****

....... पीपी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सार्वजनि□□ महत्वाच्या विषयाच्या संदर्भात अर्धा तास चर्चा.**

**पृ. शी.** : घरकाम क्षेत्रातील बालकामगारांचे होणारे शोषण.

**मु.शी.** : घरकाम क्षेत्रातील बालकामगारांचे होणारे शोषण यासंबंधी स□मा□□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, मी आपल्या अ□□ती□□□□□म 94 अ□□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

" दिनांक 15 ऑगस्ट 2006 पूर्वी मुंबई बालकामगार मुक्त करण्याची शासनाने केलेली स्तुत्य घोषणा, परंतु राज्यामध्ये घरकाम क्षेत्रात बालकामगारांची असलेली लक्षणीय संख्या तसेच या बाल घर कामगारांची नसलेली बालकामगार म्हणून ओळख, परिणामी त्यांचे होणारे शोषण व यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाय योजना."

सभापती महोदया, खास करून मुंबई ही बालकामगार मुक्त करण्याची घोषणा शासनाने केलेली आहे आणि या सदनामध्ये वारंवार बालकामगारांच्या बाबतीत वेगवेगळ्या घोषणा शासन करीत असते. आज मी येथे उपस्थित करीत असलेल्या अर्धा तास चर्चेचा जो हेतू आहे त्यातील पहिला भाग असा आहे की, बालकामगारांच्या व्याख्येमध्ये घरगुती कामामध्ये येणारी छोटी मुले असतात त्यांचा समावेश आपण कशामध्ये करता ? दुसरे म्हणजे शासनाने वेगवेगळ्या प्रकारे बालकामगारांची मुक्तता करण्याचे काम हाती घेतलेले आहे परंतु सातत्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना माझ्या असे लक्षात आले आहे की, ज्या बालकामगारांची आपण मुक्तता करतो त्यातील मुलांचे समाजामध्ये पुनर्वसन झालेले आहे असे आपण म्हणतो परंतु ती मुले पुन्हा त्याच धंद्यामध्ये परत आलेली असतात असा सामाजिक संस्थांच्या पाहणीतून देखील निदर्शनास आलेले आहे. तिसरे म्हणजे एकूणच घर कामगारांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यात या बालकामगारांना माथाडी कायदा लावा, त्यांचेसाठी महामंडळ काढा असेही सांगितले जाते. पण घरगुती कामगारांमध्ये एकच मालक आणि एकच नोकर असे स्वरूप असल्याने त्यांच्यासाठी काटेकोर नियम ठरवून त्यांची अमलबजावणी करणे हे अशक्यप्राय होऊन बसलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये देखील घरगुती कामांमध्ये जी छोटी मुले लावली जातात त्यात अनेक

..... पीपी 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

वेळा त्यांना मारहाण करणे, खायला न देणे, लैंगिक शोषणासाठी त्यांचा वापर करणे अशा घटना वरचेवर घडल्या जातात. अशा घटना घडल्या की, समाजातील सहृदय व्यक्ती त्यांच्या मदतीसाठी जातात, त्यांच्यासाठी आवाज उठवितात. परंतु कायम स्वरूपी तोडगा नसल्याने त्या कुटुंबातच त्यांची रवानगी केली जाते आणि त्या मुलाला देखील दुसरा कोणताही पर्याय शिल्लक नसतो. सभापती महोदया, या बालकामगारांचे आणखी एक व्यापक स्वरूप आहे ते म्हणजे परप्रांतातून, परराज्यातून आणि परदेशातून महाराष्ट्रामध्ये घरगुती कामांसाठी आणली गेलेली छोटी मुले, त्यांना पुन्हा इतर प्रांतात घरकामासाठी पाठवणे.. यासाठी 'मानवी अनैतिक वाहतूक' असा शब्द वापरला जातो, त्याचाही हा भाग बनलेला आहे. खास करून मुंबईचे वैशिष्ट्य हे आहे की, 'अॅण्टी ट्राफिकिंग' किंवा 'इम्मॉरल ट्राफिकिंग' यामध्ये त्यांची मोठी व्याप्ती आहे. कारण महाराष्ट्र राज्याचा विचार करतो तेव्हा घरगुती कामासाठी मुले पुरविली जातात आणि अनेकदा ती मुले प्रवास करतात ती त्यांच्या पालकांच्या इच्छेने किंवा घरातून स्वखुषीने पळून जाऊन वेगवेगळ्या गावांमध्ये ती पोहोचतात आणि त्यांना पुरविणाऱ्या एजन्सीज आणि त्यांचे दलाल यांनी मुंबई शहरात धुडगूस घातलेला आहे. तसे पाहिले तर घरगुती कामामध्ये लहान मुलांचा वापरन करणे याला कायद्याने बंदी आहे. त्यामुळे ही आवश्यकता आहे की, कामगार विभागाने अशा प्रकारे घरगुती कामांसाठी छोटी मुले वापरता येणार नाहीत म्हणून जेथे जेथे एक एक मालक आहे अशा कुटुंबांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे. ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... क्यूक्यू 1 ..

डॉ. नीलम गोऱ्हे...

अशा छोटया मुलांना कामासाठी ठेवता येणार नाही. मी माझ्या कार्यकर्त्यांसमवेत एके रात्री बोरीवली रेल्वे स्टेशन आणि विरार रेल्वे स्टेशनवर थांबले होते. रात्रीची दोन वाजताची शेवटची ट्रेन गेल्यानंतर सकाळ होईपर्यंत रेल्वे स्टेशनवर थांबले त्यावेळी मला आढळले की, त्या ठिकाणी अनेक छोटी मुले होती. ही मुले तीन कारणांमुळे घरामधून पळून आलेली होती. त्यापैकी एका मुलाने सांगितले की, मी वेगवेगळया ठिकाणी महिनाभर काम करतो आणि नंतर पळून जातो. याचे कारण महिनाभर काम केल्यानंतर मालक मला चांगले वागवीत नाही, त्याने त्रास द्यायला सुरुवात केली की पळून जातो. दुसऱ्या मुलाने सांगितले की, मला सावत्र आई असून ती मला खायला प्यायला देत नाही त्यामुळे कुठेतरी काम करुन 7-8 रुपये मिळतात त्यामधून सिनेमा पाहतो व आणि उरलेल्या पैशामधून वडापाव खातो. विशेषत: मतीमंद, मनोरुग्ण असलेली ही मुले घरामधील छोटया मोठया पडेल त्या कामासाठी ठेवली जातात ही दुर्दैवी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे. सभापती महोदय, या मुलांना पगार किती दिला जातो याचा आपण विचार केला तर आज मुंबई शहरामध्ये घरेलु कामगारापेक्षा अधिक पैसे त्यांना मिळतात. साधारणपणे हजार ते दोन हजार रुपये त्यांना मिळतात. परंतु त्याचबरोबर त्यांच्या अनेक अडचणी आहेत. त्या संदर्भात या ठिकाणी चर्चा उपस्थित करीत असतांना माझी अपेक्षा आहे की, शासनाने बाल हक्क आयोग नेमला आहे. कामगार आयुक्त आणि बालकांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांच्या माध्यमातून जे बाल कामगार घरगुती काम करीत आहेत त्यांना रात्रीच्या शाळांमधून शिक्षण देणे आणि त्यामधून त्यांना विकासाच्या प्रवाहामध्ये कसे आणता येईल अशाप्रकारची मोहीम किंवा कार्यक्रम आपण राबविला पाहिजे अशी अपेक्षा या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी करते. अशाप्रकारे ही मुले बाल कामगार म्हणून सापडल्यानंतर शासनाने त्यांची सुटका केल्यानंतर त्यांच्यासाठी काय केले याची माहिती आपणाकडे असेल. बाल कामगार म्हणून त्यांची सुटका झाल्यानंतर पुन्हा ती त्याच ठिकाणी जात नाहीत ना? हे पहाणारी यंत्रणा आपणाकडे आहे कां? ती यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आपण बाल हक्क आयोग निर्माण केला आहे त्याचप्रमाणे शासनाचा महिला व बाल कल्याण विभाग आहे. हा विभाग फक्त महिलांसाठी आहे कां? त्यामध्ये बालकांचे काय? असा प्रश्न उपस्थित होतो. या विभागामध्ये बालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिकारीही देण्यात आलेला नाही. या बालकांना आधार देणारी आपल्याकडे वेगवेगळया प्रकारची यंत्रणा नाही. ज्याप्रमाणे आईच्या उदरामध्ये बाळ वाढत असते व ते बाळाला आपल्या पदरामध्ये घेत असते त्याप्रमाणे महिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

व बाल कल्याण विभागाकडे आईच्या मायेने त्या मुलांना आपल्या पदरामध्ये घेण्याची जबाबदारी शासनाने सोपविली आहे. परंतु हा विभाग म्हणजे "आई जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना" अशी अवस्था झाली आहे. आज शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाकडे स्वत:चा निधी नाही. अशावेळी कामगार विभागाने श्रमिक महिलांची अल्पवयीन मुले श्रमिक म्हणून ज्यावेळी समाजामध्ये येतात त्यावेळी त्यांच्या शिक्षणाचा, रोजगाराचा आणि जीवनाच्या विकासाचा अधिकार हिरावून घेतला जाणार नाही, आणि महाराष्ट्र हे प्रागतिक राज्य म्हणून वेगवेगळया कन्व्हेंशन नुसार आपण कसे राज्य करीत आहोत या संदर्भात शासनाने स्वत:च्या योजना व भूमिका मांडली पाहिजे. व तसा धोरणात्मक निर्णय जाहीर करुन त्यासंबंधीचा कृती आराखडा मांडावा अशी अपेक्षा व्यक्त करुन माझ ो विचार संपविते.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नियम 92 अन्वये बाल कामगारांच्या अनुषंगाने या ठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. या राज्यामध्ये प्रामुख्याने ज्या ठिक्‍ाणी धोकादायक प्रक्रिया उद्योग चालतात त्या ठिकाणाहून बाल कामगारांना शोधून काढण्यासाठी एप्रिल 2005 ते मार्च 2006 पर्यत माझ्या विभागामार्फत प्रयत्न केले असून त्यासाठी विविध ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या आहेत. त्यामध्ये 750 आस्थापनेतील 1410 बालकामगारांची सुटका करण्यात आली. या धाडीमध्ये मुंबईतील शाहूनगर, गोवंडी, मदनपूरा, चेंबूर येथील जरी उद्योग, सोन्याचे दागिने बनविणारे उद्योग, चेंबूरमध्ये पादत्राणे बनविणारे उद्योग, ठाणे-उल्हासनगर येथील जरी उद्योग, भाईंदर येथील भांडयांना पॉलीश करणाऱ्या उद्योगांचा समावेश आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु...

वागळे इस्टेट, कळवा येथे पाणीपूरी तयार करणारी मुले, हातमाग उद्योगामध्ये काम करणारे बालकामगार संबंधाने, ठाणे जिल्ह्याच्या परिसरामधील उद्योगांवर धाडी टाकून,अशा बाल कामगार मुलांची सुटका करण्यात आलेली आहे. कायद्यामधील विविध कलमान्वये, त्यांच्यावर खटले भरण्यात आलेले आहेत. बालकामगार अधिनियम 1986 अन्वये 30 खटले कोर्टात दाखल केले आहेत. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये 135 खटले भरण्यात आले. जुवेनाईल जस्टीस ॲक्ट 2000 या कायद्याअंतर्गत 20 खटले भरण्यात आले. भारतीय दंड संहितेनुसार 64 खटले भरण्यात आले आहेत. ज्या आस्थापनेमध्ये बालकामगार पकडले जातात, त्या आस्थापनेच्या मालाकाकडून, प्रत्येकी 20 हजार रुपये जिल्हाधिकारीकाऱ्यांकडून वसूल केले जातात. ते पैसे त्या मुलांच्या कल्याणासाठी,आणि शासनाकडून तितकीच अधिक रक्कम त्यामध्ये टाकून, त्या मुलांचे पुनर्वसन करावे, अशाप्रकारची भूमिका माझी आहे. सन्माननीय सदस्या, श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी घरकाम करणाऱ्या बालकामगारांचा प्रश्न येथे उपस्थित केला. सध्या अस्तित्वात असलेल्या, 1986 च्या बालकामगार अधिनियमामध्ये, घरेलू बालकामगारांचा समावेश होत नाही. घरेलू बाल कामगार हाया आस्थापनेमध्ये मोडत नाही. प्रत्यक्षात सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. घर कामासाठी ठेवलेल्या मुलांना जेवण दिले जात नाही, त्यांना कामाचे तास ठरवून दिले जात नाहीत. त्यांच्याकडून कोणतीही कामे करुन घेतली जातात. वेळ प्रसंगी त्यांचे शोषणीही केले जाते. 14-15 वर्षाच्या लहान मुली घर कामासाठी ठेवलेल्या असतात. त्यांच्यावर वेगवेगळया प्रकारचे अत्याचार केले जातात. ही गोष्ट खरी आहे की, ही आजची समाज व्यवस्था आहे. आज आस्थापनेमध्ये "कुटुंब" या संज्ञेचा उल्लेख नाही. त्यामुळे कामगार क्षेत्राप्रमाणे, त्यांच्यावर कोणतेही निर्बंध आपण घालू शकत नाही. त्यांच्यावर अत्याचार होत असतील तर पोलीस कायद्या अंतर्गत त्यांच्यावर वेगळया प्रकारे कारवाई होऊ शकते. बालकामगारांच्या ज्या सुटका झालेल्या आहेत, त्यामध्ये निश्चितच कामगार विभागाच्या बरोबरच महिला व बाल कल्याण विभागाची, पोलीस खात्याची, त्याचप्रमाणे रेल्वेच्याही अधिकाऱ्यांची यामध्ये मदत घेतली जाते आणि या बालकामगारांची सुटका केली जाते. या बालकामगारांना, त्यांच्या, त्या त्या राज्याच्या अधिकारी वर्गाकडे सुपूर्द केले जाऊन, त्यांच्या आई-वडिलांकडे पोहोचविण्याचे काम देखील केले जाते. परंतु त्यांच्यापैकी काही मुले पुन्हा पुन्हा परत येतात, यासबंधात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ D/

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु...

उपस्थित केला. याबाबतीत समाजाची आर्थिक व्यवस्था कारणीभूत आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती गंभीर असते. एखाद्याच्या घरामध्ये 14 वर्षाच्या मुलाने काम केले नाही तर त्याला त्याच्या घरी जेवण मिळेल अशी परिस्थिती नसते. राज्याची आर्थिक परिस्थिती पहाता, भविष्य काळामध्ये या बालकामगार मुलांना "चिड्रेन होम"मध्ये ठेवून, त्यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये उभारी आणून, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम, हे शासन करेल. स्ट्रेंन्जर मुले ही रस्त्यावर भीक मागतात. सन्माननीय सदस्यांनी, विरार, भाईंदर येथील अशा मुलांचा उल्लेख आपल्या भाषणातकेला. ही गोष्ट खरी आहे की, काही दुष्ट प्रवृत्तीची माणसे लहान मुलांना ताब्यात घेऊन, भीक मागायला लावतात, चोऱ्या करायला लावतात. या माध्यमातून ते लोक त्यांच्या जीवनाची राखरांगोळी करतात, अशी सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात चिंता व्यक्त केलेली आहे, ती योग्य आहे. त्या दृष्टीने शासन सतर्कतेने त्या बाबीकडे पहात आहे. सन्माननीय सदस्यांनी अर्धातास चर्चेच्या अनुषंगाने, हा गंभीर विषय मांडला व अशा विषयाच्या अनुषंगाने चर्चा होणे आणि त्याबाबत शासनाचे लक्ष वेधणे, शासनाला अलर्ट करणे, हा त्यांचा हेतू योग्य आहे. मी या निमित्ताने एवढेच सांगेन की, मागील 20 वर्षात गेल्या 2005-2006 या कालखंडामध्ये, या संबंधाने जेवढ्या धाडी टाकून, बालकामगारांची सुटका केली आणि शासनाने मालकांवर खटले भरलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ......

परंतु गेल्या 20 वर्षाच्या कालखंडामध्ये असे घडले नव्हते असा माझा दावा आहे. मी नम्रपणे सांगेन की, त्यांची सुटका केली म्हणजे उपकार केले असे नाही तर आम्ही आमचे कर्तव्य केलेले आहे. 1410 ही संख्या सुध्दा फार मोठी नाही. अशी लाखो मुले कोठे ना कोठे खितपत पडलेली आहेत. त्यांना शोधण्याचा प्रयत्न शासन निश्चितपणे करीत आहे. आपल्यासारख्या जागरुक सन्माननीय सदस्यांकडून या विषयावर चर्चा घडवून शासनाला एकप्रकारे आठवण करुन दिली जाते. या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगेन की, या बाल कामगारांची सुटका, त्यांचे पुनर्वसन करणे तसेच त्यांच्या जीवनाला उभारी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी व्याख्येच्या संदर्भात अडचण सांगितली ती बरोबर आहे. घरकाम हे आस्थापन नाही. यासंदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, ठिकठिकाणी आपल्या कामगार विभागाची सगळी कार्यालये आहेत त्यांच्यामार्फत घरगुती कामासाठी अल्पवयीन मुलांना कामाला लावणे हा अपराध आहे अशा प्रकारची माहिती पालकांपर्यंत पोहोचविण्याचे पाऊल शासन उचलणार काय ? महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून, मराठवाडा आणि इतर भागातून ही मुले आलेली असतात. त्यांचा जो सोर्स एरिया असेल अशा ठिकाणी मोहीम हाती घेणार काय ? दुसरी बाब अशी की, त्यांची नोंदणी केली पाहिजे. आपण त्यांच्या बाबतीत बंधन आणले नाही किंवा कायद्याच्या कचाट्यात जरी ते सापडले नाहीत तरी पोलीस विभाग, कामगार विभाग यांचा सगळ्या ठिकाणी संबंध येतो. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही संबंध येतो. अशा वेळी नोकरांची नोंदणी नसल्यामुळे अनेक वेळा ते सापडत नाहीत किंवा निरपराध लोक पकडले जातात. कामगार आयुक्तांकडून ही मुले कोठे कोठे काम करतात त्याची नोंदणी करण्याचे आवाहन स्थानिक वाहिन्यांवरुन झाले तर लोक सुध्दा अलर्ट होतील. आपण जे करतो ते कायद्याच्या कक्षेमध्ये बसणारी गोष्ट नाही हे त्यांना समजेल. तिसरी बाब अशी की, ज्यावेळी एखाद्या ठिकाणी मुलांचा छळ झाल्याचे वर्तमानपत्रातून प्रसिध्द होते त्यावेळी कामगार विभागाने किंवा मंत्रालयाने वकील देऊन सु मोटो अशा केसेस लढण्याची तयारी शासन दाखवील काय ? आपण त्या मुलांना कोणताही सपोर्ट केला नाही तर त्या मुलांची केस बाल न्यायालयामध्ये टिकणार नाही आणि संबंधित पालकांना शिक्षा होणार नाही. हायकोर्ट आहे,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे ......

सुप्रीम कोर्ट आहे. त्यांना कायद्याची सेवा देणे ही बाब स्वत:चा अंगीकृत भाग म्हणून स्वीकारणे तसेच कल्याणकारी राज्याचा भाग म्हणून साक्षरता आणि जागृतीसाठी मदत करणे हे शासनाचे काम म्हणून स्वीकारलेले आहे. हे तुमच्या कक्षेबाहेर होईल असे मला वाटत नाही. कल्याणकारी राज्याचा भाग म्हणून ज्या ठिकाणी अशा मुलांचा छळ झाल्याचे दिसेल त्यांना कायद्याचे सहाय्य पुरवणे तसेच ज्या मुलांचा छळ झालेला आहे त्यासंदर्भात कामगार विभाग सु मोटो मोहीम हाती घेणार काय ? सोर्स एरियामध्ये मोहीम घेणे, त्यांची नोंदणी करुन पालकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि अशा ज्या केसेस घडतात त्या ठिकाणी कामगार विभाग स्वत:हून त्याची दखल घेण्याची यंत्रणा निर्माण करील काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी दयेच्या भावनेतून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. एखाद्याच्या घरामध्ये जो छोटा मुलगा काम करीत असतो किंवा मुलगी काम करीत असते, ते त्यांच्या नात्यागोत्यातील असतात. अशा प्रकारे कायद्यामध्ये रुपांतर केले तर प्रत्येक घरामध्ये इन्स्पेक्टरने जाऊन तुमच्या घरातील मुलगी कोण आहे ? असे काही विचारणे म्हणजे सुखापेक्षा त्याची व्याप्ती दु:खदायकच जास्त होईल. समाजातील बौध्दिक आणि माणुसकीच्या अनुषंगाने भावनेचा ओघ तयार करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारे मुलांना ठेऊन त्यांचा छळ करणे हा गुन्हा आहे अशी माहिती निश्चितपणे कामगार खात्यामार्फत कळवली जाईल याबद्दल वाद नाही. असा एखादा व्हिक्टीम झ ाालेला मुलगा किंवा मुलगी असेल त्यांना न्याय मिळण्याकरिता शासकीय वकील निश्चितपणे त्यांना मदत करतील. मी एक उदाहरण देतो. कोकणात एखाद्या शेतकऱ्याकडे 4 बैल असतील आणि शेतीची कामे झाल्यानंतर त्या बैलांना चारण्यासाठी कुरणावर नेण्याचे काम 14-15 वर्षाच्या मुलाला दिले तर तो शेतकरी त्या मुलाला किमान वेतन सुध्दा देऊन शकत नाही. सकाळी 7.00 वाजता जर गुरे चारण्यासाठी नेली तर संध्याकाळी 7.00 वाजता ते परत येतात. म्हणजे 12 तास होतात. आठ तासापेक्षा जास्त काम केल्यामुळे ओव्हरटाईम सुरु होतो. कोकणातील शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि त्यांची आर्थिक परिस्थिती पाहता ते तेवढे पैसे देऊ शकत नाहीत. एक तर तो त्याची गुरे घरीच ठेवील किंवा शेतीचा धंदा बंद करील.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:20

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु...)

तेव्हा अशा सगळया गोष्टींचा अभ्यास करुन परिपूर्ण असा निर्णय घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांच्या मनामध्ये असलेली माया, कणव या भावनेतून आणि अशा मुलांचा होत असलेला छळ त्यांनी बघितलेला असल्यामुळे त्यांनी या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. अशा सर्व गोष्टींचा विचार करीत असताना सामाजिक सिस्टीम कुठे बिघडणार नाही हेही पाहिले गेले पाहिजे. कायद्याची कडक अंमलबजावणी होण्याच्या यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहेच. आपण आपल्या घरामध्ये मुलाबाळांना, काही तरी आणून दे, कुठे कपडे वाळत घाल, कुठे आईला मदत कर, मोठया भावंडाला मदत कर असे सांगत असतो. परंतु त्यांच्यावर दबाव आणून आणि त्यांना टॉर्चर करुन काम करुन घेणे हा गुन्हा आहे. परंतु मुलांवर सुसंस्कार करण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडून हसतखेळत काम करुन घेणे हा टॉर्चरचा भाग होत नाही. म्हणून आपल्या राज्यामध्ये एकूणच असणा-या परिस्थितीचा विचार करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांच्या भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे.

श्रीमती कांता नलावडे : एका गंभीर आणि अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. मुंबईतील पुष्कळशा घरांमध्ये लहान मुलांना स्वयंपाकासाठी आणि अन्य घरकामे करण्यासाठी आणले जाते. ही मुले नातेवाईक असतात असे आपण म्हणाल. परंतु सर्वच मुले ही नातेवाईक असतातच असे नाही. 8-9 वर्षाच्या मुलगी किंवा मुलाला स्वयंपाक आणि घरकाम करण्यासाठी ठेवले जाते. त्यांनी काम केले नाही तर त्यांना जेवण दिले जात नाही, त्यांचा छळ केला जातो, लैंगिक शोषण केले जाते. महानगरपालिकांच्या रात्रीच्या शाळांमध्ये अशी मुले आपले शिक्षण घेतात. पहाटे 5 वाजल्या पासून सायंकाळी 4-5 वाजेपर्यन्त काम करुन मग ती मुले शाळेत जातात. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, शासनाने जर व्यवस्थित सर्वे केला तर अशी मुले कुठे कुठे आहेत आणि त्यांची संख्या किती आहे हे सहज समजू शकते. विशेषत: मुंबईतील अमराठी लोकांच्या प्रत्येक घरामध्ये अशी अल्पवयीन मुले-मुली घरकामाला आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, घराघरामध्ये सर्वे करणे शक्य होणार नाही. आपण आपल्या मुलांना त्यांच्या सुसंस्कार घडावेत म्हणून कामे सांगत असतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : माझे म्हणणे एवढेच आहे की, प्रत्येक घरामध्ये किती नोकर आहेत, त्यांचे वय काय आहे, अशी विचारणा करुन विभागवार सर्वे केला तर अशा प्रकारे काम करणा-या अल्पवयीन मुला-मुलींची संख्या शासनाला सहज समजू शकेल. हॉटेलमध्येही लहान मुले काम करताना आपणास दिसतात. गोवंडी आणि धारावीमध्ये विविध आस्थापनांवर धाडी टाकून शासनाने असंख्य बालकामगारांची मुक्तता केलेली आहे. त्याप्रमाणे घरकाम करणा-या अल्पवयीन मुला-मुलींची त्या कामातून मुक्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशीा मी शासनाला विनंती करते.

श्री. गणेश नाईक : लहान मुला-मुलींना काम देऊ नये अशा प्रकारचा अवेअरनेस समाजामध्ये आणण्याचा शासन निश्चितच प्रयत्न करीत आहे. माननीय सदस्यांनी हॉटेल्सचा उल्लेख केला. हॉटेल्स हे आस्थापनामध्ये येतात. त्यामुळे हॉटेल्सवर विभागाचे नियंत्रण असते. माननीय सदस्यांनी असे सांगितले की, अल्पवयीन मुलांकडून कामे करुन घेताना त्यांचा छळ केला जातो. याबाबतीत पोलीस निश्चितच कारवाई करु शकतात. अशा प्रकारची तक्रार करण्यात आली तर त्याबाबतीत निश्चितपणे कारवाई होईल, आणि कुणालाही दयामाया दाखविली जाणार नाही.

....यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदया, सम्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे ने बाल कामगारों से संबंधित मुद्दा यहां पर उपस्थित किया है, उस के लिए वे सचमुच अभिनन्दन की पात्र हैं. बाल कामगारों के प्रश्न के बारे में मुझे ऐसा लगता है कि बहुत हद तक इसका निवारण आर्थिक समस्या के साथ तो जुड़ा हुआ है, लेकिन इसके साथ साथ शिक्षण क्षेत्र के साथ भी बहुत हद तक यह प्रश्न जुड़ा हुआ है. इसलिए अगर शिक्षण की समस्या हल हो जाती है तो बाल कामगारों की समस्या बहुत हद तक हल हो सकती है. कन्स्टीट्यूशन की गाइड लाईन्स में 6 वर्ष से लेकर 14 वर्ष के बच्चों के लिए फ्री और कम्पलसरी एज्यूकेशन की बात कही गई है. इसलिए मेरा पहला प्रश्न यह है कि महाराष्ट्र जैसे पुरोगामी राज्य में 6 वर्ष से लेकर 14 वर्ष के बच्चों को फ्री, कम्पलसरी और क्वालिटी एज्यूकेशन देने के लिए इस तरह का विधेयक क्यों नहीं लाया गया है ? मेरा सरकार को सुझाव है कि इस विधेयक में खास तौर से एकाउन्टेबिलिटी की बात होनी चाहिए. बच्चों के शिक्षण की जिम्मेदारी आप मॉ-बाप पर रखेंगे, शिक्षक के ऊपर रखेंगे, समाज के ऊपर रखेंगे या प्रशासन के ऊपर रखेंगे. यह जिम्मेदारी आप किस के ऊपर रखेंगे ? इसके सिवाय हम फ्री और दर्जेदार शिक्षण नहीं दे सकते हैं, इसलिए क्या शासन इस प्रकार का विधेयक लाएगा ?

सभापति महोदया, यहां पर बाल कामगारों के शोषण की बात कही गयी है. इसको रोकने के लिए मेरा सुझाव यह है कि जिस तरह से अन्य बातों के बारे में जिला स्तर पर दक्षता समिति की बनाई जाती है, उसी तरह से बाल कामगारों के कल्याण के लिए जिला स्तर पर या तालुका स्तर पर अशासकीय दक्षता समिति होनी चाहिए. यह सुझाव देते हुए मैं अपनी बात खत्म करती हूँ.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, बालकामगारांची शैक्षणिक पातळी वाढली पाहिजे आणि त्यांना शिक्षण दिले गेले पाहिजे अशा स्वरुपाची जी सूचना आलेली आहे त्या सूचनेचा शासन निश्चितपणाने विचार करील. तसेच तालुका आणि जिल्हा स्तरावर दक्षता समित्या आहेत त्याप्रमाणे बालकामगारांच्या बाबतीत सुध्दा अशा प्रकारच्या समित्या निर्माण करता येतील काय ही बाब तपासून पाहिली जाईल.

. . ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (** श्रीमती सुधा जोशी) : शिक्षणाच्या बाबतीत विधेयक आणण्याची जी सूचना माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी केली आहे त्याबद्दल सन्माननीय शिक्षण मंत्री काही खुलासा करु शकतील काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. केंद्र शासन 6 ते 14 वर्षांच्या मुलांकरिता मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याकरिता विधेयक आणणार आहे. केंद्र शासनाने विधेयक आणल्यावर राज्य शासन सुध्दा त्याबाबतीत विचार करील.

डॉ.एम.ए.अझिज : सभापती महोदया, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी खूप महत्वाचा विषय सभागृहामध्ये अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, बऱ्याच ठिकाणी विभागामार्फत धाडी टाकण्यात आल्या आणि लहान मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. याला कोणता आधार आहे ? मदनपुरा भागात ज्यावेळी धाडी मारल्या त्यावेळी मी स्वत: तेथे उपस्थित होतो. 55 मुलांना पोलीस घेऊन गेले होते. परंतु या मुलांचे वय कशाच्या आधारावर ठरविण्यात आले ? माझ्या महाविद्यालयातील एक मुलगा बी.ए.च्या प्रथम वर्षात शिकत होता त्याला सुध्दा पोलीस पकडून घेऊन गेले. एनजीओ मार्फत शासनाला माहिती दिली जाते. परंतु या एनजीओंना मुलांचे वय कळत नाही. जी मुले पकडण्यात आली होती त्यातील 22 मुलांना मी सोडवून घरी पाठविले. लहान मुले पकडली जातात तेव्हा त्यांच्या मनावर काय परिणाम होतो याचा शासनाने विचार केला आहे काय ? चिल्ड्रेन होममध्ये मुले घेऊन जातात तेथे ती रडत असतात.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जास्त वयाच्या मुलांना जर पकडले जात असेल तर ती बाब तपासून घेतली जाईल आणि खात्याच्या अधिकाऱ्यांना त्याप्रमाणे सूचना दिल्या जातील. एनजीओ संस्थांनी दिलेली सगळीच माहिती 100 टक्के खरीच असेल असे नाही. एनजीओंकडून जी माहिती येईल ती योग्य तऱ्हेने तपासून घेण्याबाबत आणि त्यांच्या माहितीपासून दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या जातील. बालमजुरांची सुटका केल्यानंतर त्यांच्या मनाला यातना होणार नाहीत अशा प्रकारे त्यांना वागणूक दिली जाते. अशा परिस्थितीत पोलीस मुलांना चांगल्या प्रकारची वागणूक देतात. गुन्हेगारी वातावरण निर्माण न करता मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहिले जाते. चिल्ड्रेन होममध्ये सुध्दा घरगुती वातावरण निर्माण केले जाते. अशा चिल्ड्रेन होमना माननीय सदस्यांनी भेटी द्याव्यात आणि जर काही गैरबाबी निदर्शनास आल्या तर मला सांगावे शासन निश्चितपणाने यासंबंधात योग्य ती कारवाई करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. कानडे..... 16:30

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय तडफेने या अर्धा तास चर्चेला उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. तसेच आपण देखील यासाठी भरपूर वेळ दिला त्याबद्दल मी आपली आभारी आहे. माझ्याकडे Save the chileren आणि Child domestic workers या संस्थांचे दोन अहवाल आहेत, ते मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांकडे पाठविते. यातील दुसऱ्या अहवालामध्ये घरेलू कामगार मुलांच्या 50 कहाण्या आहेत. त्यात शेवटी या मुलांनी देवाला उद्देशून एक पत्र लिहीलेले आहे व त्यात म्हटले आहे की, "देवा आमचे जे प्रश्न आहेत ते तू कुठेतरी समजून घेशील की नाही ? परंतु देवा आमचे कोणीच नाही व आम्ही तुला मेल ही करु शकत नाही". माननीय मंत्री महोदयांचे नांव सुध्दा "गणेश" असेच आहे. म्हणून माझी विनंती आहे तसेच सन्माननीय सदस्यांनी येथे एक दुसरा मुद्दा समोर आणला, या प्रश्नाच्या अनेक बाजू आहेत म्हणून मंत्री महोदय हा प्रश्न कोणत्या बाजूने व कोणत्या पध्दतीने हाताळणार, त्याची अंमलबजावणी कशी करणार ? जेणेकरुन लोकांना त्रास होणार नाही व या मुलांनाही न्याय मिळेल. या विषयासंबंधी काम करणाऱ्या ज्या काही चांगल्या संस्था असतील अशा संस्थांच्या बाबतीत वेळ पडली तर लोकल ब्रँचकडून त्यांचे रेकॉर्डही तपासून पाहता येईल. अशा संस्थांची समिती जर अस्तित्वात नसेल तर त्यासंदर्भात एखादी समितीशासन नियुक्त करणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : महोदया, या सभागृहातील महिला सदस्या तसेच समाज सेवा करणाऱ्या ज्या संस्था असतील त्या संस्थांनी त्या त्या परिसरातील धाडी ज्या ज्या वेळी टाकल्या जातील त्या वेळी अशा संस्थांची इच्छा असल्यास त्यांना आमंत्रित केले जाईल.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी असे विचारले की, अशा प्रकारची समिती शासनाने नियुक्त केलेली आहे काय ? नसल्यास तसे करण्याची शासनाची इच्छा आहे काय ?

श्री. गणेश नाईक : महोदया, याबाबत ऑलरेडी आपल्याकडे समाजकल्याण विभाग, महिला व बालकल्याण तसेच एन.जी.ओ. सारख्या संस्था यांची समिती गठीत केलेली आहे. यामध्ये अन्य संस्थांना सहभाग घ्यावयाचा असेल तर त्यांनाही आमंत्रित केले जाईल, जेणेकरुन त्याची गुणवत्ता व व्याप्ती वाढेल.

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चा संपलेली आहे.

-------------

( ..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शिक्षकांचे सेवाखंड क्षमापनाचे प्रस्ताव अमान्य करुन त्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान.

**मु.शी.**: राज्यातील शिक्षकांचे सेवाखंड क्षमापनाचे प्रस्ताव अमान्य करुन त्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान या विषयासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) :सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अधा-तास चर्चा उपस्थित करतो :--

"राज्यातील अनेक शिक्षकांचे सेवाखंड क्षमापनाचे शासन स्तरावरील प्रस्ताव नकारात्मक भूमिका घेऊन चुकीच्या पध्दतीने अमान्य करण्यात येत असून शिक्षकांचे आर्थिक नुकसान केले जात आहे. सेवाखंड क्षमापनासाठी शासन स्तरावरील मुद्दे विचारात न घेतल्याने शिक्षकांवर अन्याय होत आहे. त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

महोदया, या ठिकाणी शिक्षकांचा सेवाखंड क्षमापित करण्याच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी जे आदेश काढलेले आहेत त्या आदेशानुसार शाळेतील एखादा शिक्षक अथवा शिक्षकेत्तर कर्मचारी निवृत्त होतांना त्याने केलेली एकूण अर्हताकारी सेवा विचारात घेऊन त्याला शासनाकडून पेन्शन मंजूर होते. जर या शिक्षकाच्या किंवा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या एकूण सेवेमध्ये काही सेवाखंड असतील तर हे सेवाखंड क्षमापित करण्यासंबंधी शासनाचे आदेश आहेत. परंतु शासनाने काढलेल्या या आदेशांचा चुकीचा अर्थ लावून आज महाराष्ट्रामध्ये शेकडो शिक्षकांचे फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान शासनाने केलेले आहे. त्यामध्ये मला वाटते शिक्षकांचे 12 वर्षानंतरचे प्रशिक्षण व 24 वर्षानंतरचे प्रशिक्षण हे देखील होते. पण यासंबंधी आता अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण शासनाला घ्यावे लागणार की काय अशी शंका माझ्या मनात निर्माण झालेली आहे व हा प्रश्न फार गंभीर झालेला आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

निवृत्त शिक्षकांना एकमेव आधार हा पेन्शनचा आहे. त्यावरच त्याचे कुटुंब चालते. त्यांना पेन्शनच्या माध्यमातून मिळणारा अर्धा घास काढून घेण्याचे कृत्य आता शासन करीत आहे. अशाप्रकारचे कृत्य शासनाकडून होऊ नये असे मला वाटते. असे जर केले तर या लोकांचा तळतळाट शासनाला लागेल.

सभापती महोदय, हा जो नियम आहे, तो शासनाने केलेला आहे. पण त्याचा संबंधित अधिकाऱ्यांनी वेगळा अर्थ लावून संबंधितांना न्याय दिला जात नाही अशी माझी खंत आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी 2-3 मुद्देच उपस्थित करणार आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवाखंड क्षमापित करण्याचा अधिकार दोन स्तरांवर शासनाने ठेवला आहे. एक अधिकार शिक्षक उपसंचालकांकडे आहे, तर दुसरा अधिकार हा शासनाकडे आहे. सेवाखंड क्षमापनाचा संबंधीचे जे अधिकार शिक्षण उपसंचालकांना नाहीत ते अधिकार शासनाला असल्यामुळे अशी प्रकरणे शासनाकडे वर्ग करण्यात येतात. आतापर्यंत पेन्शन मंजूर करण्याचा अधिकार हा शिक्षण उपसंचालकांकडे होता. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे पेन्शन शिक्षण उपसंचालकाने मंजूर केल्यानंतर ते ए.जी.कडे पाठविले जाते. पण यात वेळेचा अपव्यय होतो. तो टाळण्यासाठी शासनाने निर्णय घेतला की, पेन्शनचे पेपर यापुढे शिक्षण अधिकाऱ्यांकडून थेट ए.जी.कडे पाठविण्यात यावेत. आता शिक्षण अधिकाऱ्याला शिक्षण उपसंचालकांचे पेन्शन मंजूर करण्याचे अधिकार मिळाले आहेत. त्यामुळे शिक्षण अधिकाऱ्यांना सेवाखंड क्षमापनाचे अधिकार शासन देणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी दिनांक 14.10.1971 च्या शासन निर्णयाकडे मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. मी आपल्याला अनेक उदाहरणे देऊ शकतो. माझ्याकडे 100 प्रकरणे आहेत. हा फार जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हा गंभीर प्रश्न आहे. दिनांक 14.10.1971 च्या शासन निर्णयान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक यांना खालील प्रमाणे खंड क्षमापित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

एका खंडाचा कालावधी सलग एक वर्षापेक्षा जास्त असता कामा नये, सहा खंडांपैकी तीन पेक्षा जास्त खंड राजीनाम्यामुळे झालेले नसावेत, सहा सेवाखंडाचा एकूण कालावधी दोन वर्षापेक्षा जास्त असता कामा नये, सहा सेवखंडापैकी कोणत्याही सेवाखंडाचा कालावधी 12 महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये, खंडाच्या कालावधीत इतरत्र सेवा केलेली नसावी, तसेच शिस्तभंगाची कारवाई झाली नसावी.

सभापती महोदय, शासनास पुढील अटी शिथिल करून सेवेतील सेवाखंड क्षमापित करण्याचे अधिकारी आहेत :-

तांत्रिक सेवाखंडासह सेवतील एकूण सेवाखंड 10 पेक्षा जास्त असू नयेत व त्यापैकी 4 पेक्षा जास्त राजीनाम्यामुळे होणारे असू नयेत, सेवेत एक सेवाखंड असल्यास त्यापूर्वीची अर्हताकारी सेवा पाच वर्षांपेक्षा कमी असता कामा नये.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

याचा अर्थ त्याच्या सेवेमध्ये एक सेवाखंड किंवा अनेक सेवाखंड असतील तर त्या सेवाखंडापूर्वी संबंधित शिक्षकाची पाच वर्षे सेवा झाली असेल तर, ते सेवाखंड शासन स्तरावर क्षमापित होऊ शकतात. या अटी शासनाच्याच जी.आर.मध्ये आहेत. त्यानुसार ही प्रकरणे शासन स्तरावर मंजूर होऊ शकतात. परंतु मी या ठिकाणी ज्या प्रकरणांचा उल्लेख करणार आहे ती प्रकरणे मात्र तीन मुद्यांवर नाकारण्यात आलेली आहेत. पहिला मुद्दा असा की, सगळे सेवाखंड दिनांक 30/09/1974 नंतरचे आहेत. शासनाने मध्यंतरी असा जी.आर. काढला होता की, शिक्षकांच्या बाबतीत दिनांक 30/9/1974 आणि शिक्षकेतरांच्या बाबतीत दिनांक 31/12/1975 नंतर, त्यांचे पूर्वीचे सेवाखंड असतील तर ते क्षमापित होतील. परंतु त्यानंतरचे सेवाखंड क्षमापित होणार नाहीत. परंतु दिनांक 11/8/1988 रोजी श्री.रु.ना.देशमुख, सहाय्यक सचिव, शालेय शिक्षण आणि सेवायोजन विभाग यांनी एक पत्रक काढले आणि त्यांनी पूर्वीची अट रद्द केली आहे. त्यानुसार दिनांक 30/9/1974 नंतरच्या शिक्षकांच्या बाबतीत आणि दिनांक 31/12/1975 नंतरच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवाखंड क्षमापित होऊ शकतो असे शासनाने सुधारित आदेश काढले आहेत. तथापि, केवळ याच कारणासाठी, शिक्षकांचा सेवाखंड 30/9/1974 नंतरचा असल्यामुळे ते क्षमापित होऊ शकत नाही असा शासनाने जो निर्णय घेतला आहे तो चुकीचा आहे. कदाचित हा निर्णय आपल्याला माहीत नसेल. असे करुन तुम्ही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान का करीत आहात ?

महोदया, या जी.आर. चा क्रमांक पीईएन 1076-81126 (1491) XII 12/11/1976 आहे. शासनाच्या दिनांक 12/11/1976 च्या जी.आर.मधील अट क्र.1 आणि 3 चे पालन होत नाही म्हणून सेवाखंड क्षमापित करता येत नाही असे म्हटले आहे. त्या जी.आर.च्या अट क्रमांक-1 मध्ये असे म्हटले आहे की, "The number of breaks inclusive of technical breaks should not be exceed 10 of which not more than 4 breaks should be due to resignation." महोदया, शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर 6 आणि या ठिकाणी 10 अशी अट घालण्यात आली आहे. जर त्यांचे ब्रेक 10 पेक्षा जास्त नसतील आणि राजीनाम्यामुळे ब्रेकची संख्या 4 पेक्षा अधिक नसेल तर, शासनाच्या निर्णयानुसार त्यांचा सेवाखंड क्षमापित करण्यामध्ये कोणती अडचण आहे ? मी आपणांस जी काही उदाहरणे देणार आहे त्यांचा सेवाखंड 6 पेक्षा कमी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

महोदया, 1976 च्या जी.आर.मधील अट क्रमांक-3 मध्ये असे म्हटले आहे की, " The interruption in service,should have been caused of any of the following grounds:

(a) Un-employment,

(b) Part-time Service (due to non-availability of full time employment."

महोदया, तो Un-employment होता, त्याला बेकारी होती म्हणून सेवाखंड झाला. त्यामुळे ती अट पूर्ण होते. सेवाखंडाच्या कालावधीत त्याने दुसरीकडे काम केले नाही असे तुम्हीच त्याच्याकडून ॲफेडेव्हिटच्या माध्यमातून लिहून घेता. महोदया, याच जी.आर.च्या क्लॉज 4 मध्ये असे म्हटले आहे की,

"'(4) Service Proceedings in the interruption should not be less than of 5 years duration and in case where there are two or more interruptions, the total service, the pensionery benefits, in respect of which will be last if the interruptions are not condoned, should not be less than 5 years."

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

त्यांची अट काय आहे तर सेवाखंड पाच वर्षांपेक्षा जास्त नसावा. त्याचप्रमाणे पूर्वीची सेवा ही पाच वर्षांपेक्षा कमी असता कामा नये. सभापती महोदया, या सगळ्या अटी पूर्ण करणारे किती तरी शिक्षक आहेत. त्यांची प्रकरणे शासनाने नाकारली आहेत. श्री. मधुकर कुलकर्णी, अण्णासाहेब आवटे विद्यामंदिर, जुन्नर, जि.पुणे या शाळेतील शिक्षक असून त्यांचा सेवाखड 2 वर्षे 1 महिना 1 दिवस आहे. त्यांचा एकदाच सेवाखंड झाला आहे. त्यांची सेवाखंडापूर्वीची सेवा 8 वर्षे 6 महिने आहे, तर सेवाखंडानंतरची सेवा 24 वर्षे 8 महिने झाली आहे. सदर प्रकरण दिनांक 30.9.74 नंतरचे असल्याने मान्य करता येत नाही, असे सांगण्यात येते. त्यामुळे त्या शिक्षकाचे 8 वर्षांचे नुकसान झाले आहे. या निर्णयामुळे त्याला जेवढी पेन्शन मिळावयास पाहिजे होती, त्याच्या 2/3 पेन्शनच मिळाली. म्हणजे त्याच्या 1/3 पेन्शनचे नुकसान झाले. जवळजवळ त्याची अर्धी पेन्शन काढून घेतली. सभापती महोदया, त्या व्यक्तीला नियमाप्रमाणे पेन्शन बसणार आहे. सभापती महोदया, त्यानंतर श्री. एम.जी.कुलकर्णी, न्यू. इंग्लीश स्कूल, सैतावणे, जि.रत्नागिरी यांचे प्रकरण आहे. त्यांचा सेवाखंड 1 वर्षे 5 महिने 13 दिवस असा आहे. त्यांची सेवा 36 वर्षे झाली असून सेवाखंडापूर्वीची सेवा 18 वर्षे होती. त्यांचा पाच वेळा सेवाखंड झाला. हे प्रकरण अटीत बसणारे आहे. सेवाखंडापूर्वी 18 वर्षे सेवा. सेवाखंडानंतर 18 वर्षे सेवा. पण या व्यक्तीला अर्धी पेन्शन मिळाली. त्यामध्ये अट होती की, दिनांक 30.9.74 नंतरचा ब्रेक मान्य करता येत नाही. यासंबंधी शासनाचा जी.आर. दाखविला. श्री. भानुदास महाडीक, लिपीक, मोहनराव पाटील कन्या शाळा, बोरगांव, जि. सांगली यांचे देखील असेच प्रकरण आहे. या संदर्भात असे सांगण्यात आले की, दिनांक 30.9.74 नंतरचे प्रकरण असल्याने व अट एक व तीन ची पूर्तता होत नसल्याने हे प्रकरण अमान्य करण्यात आले. सदर व्यक्तीचा सेवाखंड 3 वेळ होता. त्यांची सेवाखंडापूर्वीची सलग सेवा 13 वर्षे 11 महिने आहे. त्यानंतरची सेवा 18 वर्षांपेक्षा जास्त आहे. त्यांना पेन्शन 13 वर्षांवर मिळेल. मी आपल्याला क्लॉज वाचून दाखविला की, पाच वर्षांपेक्षा कमी सेवा असेल तर फायदा द्यायचा नाही. त्यांची सेवा 18 झालेली आहे. हे काय चालले आहे ? हे मला कळत नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदया, रयत शिक्षण संस्थेची शाळा आहे. तेथील संबंधित क्लर्कने 3 वर्षे संस्थेच्या ऑफिसमध्ये कर्मचारी म्हणून काम केलेले आहे. सभापती महोदया, शासनाचे आदेश आहेत की, एखाद्या संस्थेला एखाद्या कर्मचाऱ्याला घेण्याचा अधिकार आहे. श्रीमती प्रियंवदा गैलाड, न्यू. मॉडर्न स्कूल, ठाकुर्ली यांच्या संदर्भातील प्रकरण मला आपल्याला मुद्दाम सांगावयाचे आहे. या संदर्भात मी पत्र दिलेले आहे. परंतु यासंबंधी एकदाही हिअरिंग झालेली नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य महोदया, आपण या ठिकाणी अनेक प्रकारची उदाहरणे दिलेली आहेत. आपल्याकडे अशाप्रकारची अनेक उदाहरणे असतील तर ती सर्वच्या सर्व उदाहरणे आपण माननीय मंत्रिमहोदयांकडे सुपूर्द करावीत. त्यासंबंधी माननीय मंत्रिमहोदय कार्यवाही करतील.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यमहोदयांना हे सर्व रेकॉर्डवरच आणावयाचे असेल तर त्यांनी या संदर्भातील शिक्षकांची फक्त नावे वाचावीत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, अशा प्रकारची अनेक प्रकरणे आहेत. या संदर्भातील काही प्रकरणे मी आपल्याला सांगतो. काही प्रकरणे या कारणांसाठी नाकारलेली आहेत. काही प्रकरणे " खास बाब " म्हणून मंजूर केलेली आहेत. सभापती महोदय, नियमात बसत असणारी प्रकरणे नियमात बसत नाहीत असे सांगणे चुकीचे आहे. सभापती महोदया, या ठिकाणी मी आपल्याला अनेक उदाहरणे सांगितली आहेत. सभापती महोदया, असे शेकडो शिक्षक आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 16:50

श्री. रामनाथ मोते....

आतापर्यंत सेवाखंड क्षमापन करण्याचे अधिकार शिक्षण उपसंचालकांना आहेत ते अधिकार आपण शिक्षणाधिकारी यांना देणार आहात काय ? शासन स्तरावरील सेवाखंड क्षमापित करण्याचे अधिकार शासनाकडेच राहतील. माझा पुढील मुद्दा असा आहे की, मी जी प्रकरणे सांगितलेली आहेत, अशी अनेक प्रकरणे शिक्षक कर्मचाऱ्यांची आहेत, त्या शिक्षकांच्या सेवाखंड क्षमापनाच्या प्रकरणांचा फेर आढावा घेऊन त्यांचा पाठपुरावा करुन ही प्रकरणे 1 महिन्याच्या आत निकालात काढणार आहात काय ? मी ज्या मुद्यांचा उल्लेख केलेला आहे, शासन निर्णयाचा उल्लेख केलेला आहे, त्याप्रमाणे संबंधित शिक्षकांना दिलासा देणार आहात काय ? एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------------

. ......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री): सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून शिक्षकांच्या सेवाखंड क्षमापनाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. राज्यातील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाखंड क्षमापनाचे अधिकार हे शासनाला आहेत, शिक्षण उपसंचालक यांना आहेत. त्यांच्याबाबत नकारात्मक भूमिका घेऊन अनेक चुकीच्या पध्दतीने सेवाखंड क्षमापित करण्याची प्रकरणे अमान्य करण्यात आलेली आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी 3-4 मुद्दे उपस्थित केलेले आहेत. हे खरे आहे की, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास पेन्शन ही त्याची पुढील जीवनातील भाकरी मिळण्यासाठी सोय केलेली असते. पेन्शन मिळण्याबाबत शिक्षकांच्या व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवाखंड होण्याचे प्रकार झालेले आहेत. त्यांची अनेक कारणे आहेत, एक शाळा सोडून दुसरी शाळा जॉईन करणे, त्यामध्ये जो गॅप निर्माण होतो, तो सेवाखंड म्हणून पकडण्यात येतो. तसेच एखादी शिक्षिका शाळेमध्ये जॉईन होते व नंतर तीचे लग्न होते, त्यामुळे तिच्या सेवेमध्ये खंड होत असतो. काही ठिकाणी तर तांत्रिक एक दिवसांचा सुध्दा सेवाखंड होत असतो, एक दिवसांच्या सेवाखंडाची अनेक प्रकरणे आहेत. शासनाची सेवा करतांना शिक्षकांच्या बाबतीत जास्तीत जास्त 6 सेवाखंड असतील आणि हा कालावधी एक वर्षापेक्षा जास्त असता कामा नये, अशा प्रकरणांचे निर्णय शिक्षण उपसंचालक यांच्या पातळीवर घेण्यात येतात. शिक्षण उपसंचालकांचे अधिकार हे शिक्षणाधिकारी यांना द्यावेत अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी केलेली आहे. यासंदर्भात तपासणी करुन याबाबतचा निर्णय निश्चितपणे घेतला जाईल. एक वर्षापासून 2 वर्षापर्यंत जर 10 सेवाखंड असतील तर ती क्षमापित करण्यासंदर्भातील निर्णय हे शासनाच्या पातळीवरुन घेण्यात येतात. दिनांक 30.9.1974 नंतर सेवाखंड क्षमापित करण्यात येऊ नये, अशी अट सन्मानीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी 1988 च्या शासन निर्णयाचा उल्लेख करुन सांगितली आहे. माझ्याकडे 1989 चा शासन निर्णय आहे. त्या निर्णयामध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, हा शासन निर्णय सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना लागू झालेला आहे. दिनांक 30.9.1974 नंतरचा सेवाखंड क्षमापित करण्यात येऊ नये, असे त्या शासन निर्णयामध्ये म्हटलेले आहे. हा निर्णय त्यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मान्य केलेला आहे.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VVK/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 16:50

श्री. हसन मुश्रीफ...

सन 1989 मध्ये हे परिपत्रक काढण्यात आलेले आहे. शासन निर्णयामध्ये म्हटल्याप्रमाणे शिक्षण व शिक्षकेतर यांच्या बाबतीत सेवाखंड अनुक्रमे दिनांक 30.9.1974 व दिनांक 31.12.1975 च्या नंतरचे असू नयेत. त्या नंतर शिक्षकांची सेवाखंड क्षमापित करण्याची प्रकरणे मंजूर केलेली नाहीत. त्याचा उल्लेख सुध्दा सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. 30.9.1974 नंतर सेवाखंड क्षपापित करण्यात येऊ नयेत, या निर्णयाच्या विरोधात श्रीमती श्रध्दा कर्वे यांनी उच्च न्यायालयात अपिल केले होते. राज्य शासनाच्या वित्त विभागाने याबाबत उच्च न्यायालयात सन 2006 मध्ये अपील केलेले आहे.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ....

दि.30/9/1974 नंतर सेवाखंड क्षमापित झालेले असतील तर त्या संदर्भात निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अनेक व्यक्तिगत प्रकरणांची माहिती सांगितली आहे. ती सर्व प्रकरणे त्यांनी आमच्याकडे द्यावीत. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे होते की, अनेक शिक्षकांची पेन्शनची प्रकरणे नियमात असून सुध्दा मंजूर करण्यात आली नाहीत. तसेच नियमात न बसणारी अनेक प्रकरणे मंजूर केली असल्याचे सुध्दा त्यांनी सांगितले आहे. या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना आश्वासन देऊ इच्छितो की, नियमात बसणारी प्रकरणे मंजूर झाली नसतील तर त्या प्रकरणांची तपासणी करण्यात येऊन पुन्हा नव्याने मंजूर करण्यात येतील. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे आपले बंधू असून या राज्याचे नागरीक सुध्दा आहेत. म्हणून या संदर्भात कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही.

श्री.रामनाथ मोते : या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी सन 1989 मध्ये जी.आर. काढल्याचे सांगितले आहे. परंतु सन 1988 साली काढलेला जी.आर. कोणत्या पत्रान्वये, कोणत्या आदेशान्वये रद्द केला आहे याचा माननीय मंत्रिमहोदय खुलासा करतील का ?

श्री.हसन मुश्रीफ : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात नवीन जी.आर. काढण्यात आलेला असल्यामुळे त्या संबंधी असलेला जुना जी.आर. आपोआपच रद्द होतो.

श्री.रामनाथ मोते : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी श्रीमती श्रध्दा कर्वे, यांच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. त्या दि.30/9/1974 च्या जी.आर. संदर्भात न्यायालयात गेलेल्या आहेत. त्यांचा 6-7 वर्षांचा ब्रेक आहे.

श्री.हसन मुश्रीफ : ही न्यायप्रविष्ट बाब आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना सांगू इच्छिते की, माझ्या माहितीप्रमाणे एखाद्या विषयाच्या संदर्भात नवीन जी.आर. काढल्यास त्यासंबंधी असलेले जुने आदेश रद्द होतात. तसेच या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्याला आश्वासन सुध्दा दिलेले आहे.

श्री.रामनाथ मोते : सेवा क्षमापित करण्याचे अधिकार शासनाचे असल्यामुळे Without referring to the finance Department या प्रकरणी वित्त विभागाकडे जाण्याची आवश्यकता नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदया, पेन्शनच्या संदर्भातील आदेश काढण्यासाठी वित्त विभागाच्या परवानगी आवश्यक असते. कारण ही पैशांची बाब आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रकरणांचा उल्लेख केलेला आहे त्या सर्व प्रकरणांना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. तसेच दि.30/9/1974 च्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात केस प्रलंबित असल्यामुळे त्याबाबतचा निकाल लागल्याशिवाय कोणतीही कार्यवाही करु शकत नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना सांगू इच्छिते की, माननीय मंत्रिमहोदयांनी आपण सांगितलेल्या प्रकरणांच्या संदर्भात, कुणावरही अन्याय होणार नाही याबाबत आश्वासन दिलेले आहे. तसेच माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. मला वाटते की, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी आश्वासन दिल्यामुळे माझे समाधान झाले आहे.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 17 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 59 मिनिटांनी, सोमवार दिनांक 17 एप्रिल, 2006 च्या दुपारी 2.00 पर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही